• पुणे, सोमवार, ७ ऑक्टोबर २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 298 • वर्ष ३ रे, अंक २९८ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS






## बुक्कीत टेंगुळ...!

७० दिवस चाललेल्या बिग बॉसच्या अंतिम फेरीमध्ये रिल स्टार सुरज यांनी बाजी मारून बिग बॉस ग्रँड फिनाले चषक पटकावला.

## मुख्यमंत्र्यांचा विकासाचा धडाका कायम

# विविध कामांचे लोकार्पण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** विधानसभेची निवडणूक लवकरच जाहीर होण्याची शक्यता असून कोणत्याही क्षणी आचारसंहिता लागण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे मुंबई महापालिकेच्या विविध विकासकामांचे लोकार्पण व भूमीपूजन करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सोमवारी विविध ठिकाणच्या सुमारे ५० कामांचे लोकार्पण व भूमीपूजन करण्यात येणार आहे.

दादरमध्ये शिवाजी पार्क मैदान परिसरात भागोजी कीर यांचे स्मारक प्रस्तावित असून त्याच ठिकाणी सायंकाळी ६ वाजता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने कोणत्याही क्षणी आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. तत्पूर्वी मतदारांना आकर्षित करण्यासाठी सत्ताधारी पक्षाने लोकार्पण व भूमिपूजनाच्या कार्यक्रमांचा धडाका लावला आहे.

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणाऱ्या या कार्यक्रमांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री दीपक केसरकर, पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांच्यासह विविध लोकप्रतिनिधींनाही आमंत्रित करण्यात आले आहे. मुंबई महानगरपालिका आणि जिल्हा नियोजन समितीमार्फत केल्या जाणा-या विविध विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन होणार आहे. मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील.

### सुमारे ५० कामांचे लोकार्पण व भूमीपूजन

- मुंबादेवी परिसर, तसेच महालक्ष्मी परिसरातील विकासकामांचे भूमिपूजन, अन्टॉप हिलमधील जगन्नाथ शंकरशेट स्मारकाचे भूमिपूजन, छत्रपती शिवाजी महाराज मैदान परिसरातील भागोजी शेठ कीर स्मारकाचे भूमिपूजन, माहीम कोळीवाडा येथील समुद्र किना-यालगत असलेल्या पदपथ (प्रॉमेनेड) व संरक्षक भिंतीच्या सुशोभीकरणाचे भूमिपूजन; माहीम कोळीवाडा येथील अरुणकुमार वैद्य मार्गालगत पदपथ (माहीम ट्रॅफिक चौकी ते वांद्रे उदंचन केंद्रापर्यंत) सुशोभीकरणाचे भूमिपूजन यांचा प्रामुख्याने समावेश आहे.

### या कामांचाही समावेश

- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसजवळील नगर चौक, फॅशन स्ट्रीट, ग्रँट रोड रेल्वे स्थानक (पश्चिम) येथील 'पिंक टॉयलेट'चे, तसेच महापालिकेच्या १०३ शाळांतील टेरेस गार्डन व सीसीटीव्ही कॅमेरा कामांचे लोकार्पण



## लाडक्या बहिणींसाठी शुभवर्तमान
## ऑक्टोबर महिन्यातच जमा होणार पैसे

**अहिल्यानगर :** 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेची सगळीकडं चर्चा आहे. या योजनेच्या माध्यमातून पात्र महिलांना प्रत्येक महिन्याला १,५०० रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जनसन्मान यात्रेच्या माध्यमातून राज्याचा दौरा आखला असून सध्या ते अहिल्यानगरमध्ये आहेत. अकोले येथे लाडक्या बहिणींशी संवाद साधताना अजित पवार यांनी पुन्हा एकदा बहिणींना लवकरच ओवाळणी मिळणार असल्याचं सांगितलं. » पान ७

## साहित्य संमेलन अध्यक्षपदी डॉ. तारा भवाळकरांची निवड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** दिल्लीत होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिका डॉ. तारा भवाळकर यांची निवड करण्यात आली आहे. पुण्यातील साहित्य परिषदेच्या पत्रकार परिषदेत अध्यक्षांची घोषणा करण्यात आली. लोक संस्कृतीच्या अभ्यासक असलेल्या तारा भवाळकर यांची अध्यक्षपदी निवड झाल्याने, या निर्णयाचे स्वागत होत आहे.

» साहित्य

डॉ. तारा भवाळकर यांचे वय ८३ वर्षे असून, अखिल भारतीय साहित्य महामंडळाच्या अध्यक्ष प्राध्यापक उषा तांबे यांनी त्यांच्या निवडीची घोषणा केली. या सहाव्या महिला अध्यक्ष आहेत. यापूर्वी अरुणा ढेरे यांना हा मान मिळाला होता.

### प्रकाशित साहित्य

- तिसऱ्या बिंदूच्या शोधात
- प्रियतमा
- मरणात खरोखर जग जगते
- मराठी नाटक : नव्या दिशा, नवी वळणे
- मराठी नाट्यपरंपरा : शोध आणि आस्वाद
- यक्षगान आणि मराठी नाट्य परंपरा
- लोकनागर रंगभूमी (माहितीपर)
- लोकपरंपरा आणि स्त्रीप्रतिभा

डॉ. तारा भवाळकर यांचा जन्म १ एप्रिल १९३९ मध्ये झाला. प्रामुख्याने वैचारिक लेखन करणाऱ्या एक मराठी लेखिका म्हणून त्या ओळखल्या जातात. प्राध्यापक म्हणून त्यांनी अनेक वर्ष काम केले आहे. निवृत्त झाल्यावर पुण्यातील ललित कला अकॅडमी आणि मुंबई विद्यापीठ लोककला अकॅडमीमध्ये अतिथी प्राध्यापक देखील होत्या. लोकसाहित्य, लोकसंस्कृती, » पान ७ वर

## शिवरायांच्या स्मारकाला विलंब
## छत्रपती संभाजीराजे झाले आक्रमक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** अरबी समुद्रात बांधण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे काम ८ वर्ष होऊनही सुरु झालेले नसल्याने स्वराज्य पक्षाचे संस्थापक संभाजीराजे छत्रपती आक्रमक झाले आहेत. चला पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जलपूजन केलेले अरबी समुद्रातील शिवस्मारक शोधायला, अशी हाक देत संभाजीराजे यांनी आज मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया परिसरात आंदोलन केले. यावेळी पोलिसांनी कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले.

मुंबईच्या अरबी समुद्रात जगातील सर्वात उंच असे जागतिक दर्जाचे भव्य शिवस्मारक साकारू, अशी स्वप्ने शिवप्रेमी जनतेला दाखवत मागील तीन दशकांत राज्यात अनेक सरकारे आली आणि गेली. २४ डिसेंबर» पान ७ वर

## टेकड्यांवर सर्च लाईट बसविण्याचा निर्णय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बोपदेव घाटात तरुणीवर तिघांनी केलेल्या सामुहिक अत्याचारानंतर आता शहरातील सर्व टेकड्यांवर सर्च लाईट बसविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच सर्व टेकड्यांवर सायरन बसवले जाणार आहे.बोपदेव घाटात रात्री फिरायला आलेल्या जोडप्याला मारहाण करुन शस्त्राचा धाक दाखवून तिघा नराधमांनी तरुणीवर » पान ७ वर

## भूमिगत स्थानकांसाठी निविदा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे मेट्रोने एक अधिसूचना जारी करून मार्केट यार्ड, पद्मावती आणि कात्रज येथील भूमिगत स्थानकांच्या डिझाइन आणि बांधकामासाठी निविदा मागवल्या आहेत. ही स्थानके पुणे मेट्रोच्या पर्पल लाईनच्या स्वारगेट-कात्रज विस्ताराचा भाग आहेत, जी सध्या पिंपरी-चिंचवड महानगरपालिका ते स्वारगेट पर्यंत धावते.

अधिसूचनेनुसार, निविदा दिलेल्या कंपनीला लेटर ऑफ ॲक्सेप्टन्स जारी केल्यानंतर ४२ महिन्यांत प्रकल्प पूर्ण करावा लागेल. याव्यतिरिक्त, अधिसूचनेत असे म्हटले आहे की निविदा सादर करण्याचा शेवटचा दिवस ३ डिसेंबर आहे, तर निविदा ४ डिसेंबर रोजी दुपारी ४.३० वाजता खरेदी विभाग, दिवाणी न्यायालय मेट्रो स्टेशन येथे उघडल्या जातील.

नुकतेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते स्वारगेट-कात्रज विस्तारीकरणाचे भूमिपूजन झाले. » पान ७ वर






## निकषापेक्षा जास्त पाणी वापरामुळे निर्णय

# पालिका करणार सोसायट्यांचा अभ्यास

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

> सोसायट्यांना जादा पाणी का लागते, याचा अभ्यास "तहान' संस्थेच्या माध्यमातून केला जाणार आहे. यात सोसायटीची टाकी, अंतर्गत वितरण व्यवस्था, लिकेज, प्रत्यक्ष वापरले जाणारे पाणी याचा तुलनात्मक अभ्यास केला जाणार आहे. त्यामुळे जादा पाणी का वापरले जाते याची माहिती समोर आल्यास अनावश्यक वाया जाणारे पाणी वाचविणे शक्य होणार आहे."
>
> — नंदकिशोर जगताप प्रमुख, पाणीपुरवठा विभाग



**पुणे :** समान पाणीपुरवठा योजने अंतर्गत शहरात २ लाख ८८ हजारांपैकी आतापर्यंत १ लाख ८० हजारांवर पाण्याचे मीटर बसविण्यात आले आहेत. त्यात प्रामुख्याने सोसायटी आणि खासगी मिळकतींचा समावेश आहे. या मीटरनुसार बिलांची आकारणी केली जात नसली, तरी कोणत्या सोसायटीत किती पाणी वापरले गेले, सोसायटीतील घरे किती, राहणाऱ्या नागरिकांची संख्या किती या माहितीच्या आधारे सोसायटीला किती पाणी आवश्यक आहे व किती दिले जाते याची पालिकेकडून तपासणी केली जाते.



यात अनेक सोसायट्यांचा पाणी वापर निकषांपेक्षाही सुमारे चौपट अधिक असल्याचे समोर आले आहे. त्यानंतर महापालिकेने संबंधित सोसायट्यांना पाणी वापर अधिक असून तो मर्यादित करण्याचे आदेशही दिले आहेत. त्यानंतर सोसायट्याही पुढाकार घेत असल्या, तरी पाणी वापर अधिक असल्याचे समोर आल्याने आता महापालिकेकडून अशा सोसायटयांचा अभ्यास केला जाणार आहे.

समान पाणीपुरवठा योजने-अंतर्गत मोठ्या सोसायट्या आणि बंगल्यांना पाण्याचे मीटर बसविण्यात येत आहेत. या मुळे अनेक ठिकाणी निकषांपेक्षा जास्त पाणी वापरले जात असल्याचे उघड झाले आहे. त्यावर पाणी वापर मर्यादित करण्यासाठी महापालिकेने या सोसायट्यांना नोटीस बजावल्या आहेत. त्यावर अनेक सोसायट्यांनी उपाययोजना केल्या. तरीही पाण्याचा वापर जादाच असल्याचे समोर आल्याने महापालिका या पाणी वापराचा अभ्यास करणार आहे. "तहान' या संस्थेची नेमणूक करण्यात आली आहे.



## रूपालीताई चाकणकर यांचे गौरवोद्गार

# दुर्मिळ होत चाललेलं 'चांगलं' वाचायला देणारा राष्ट्र संचार

**पुणे :** हल्ली वर्तमानपत्र उघडले की जीवनाच्या गडद छायाचे प्रदर्शन जास्त होते. परंतु राष्ट्र संचारमध्ये चांगले वेचून त्याचे 'मनोहरी दर्शन' घडविण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे हे वर्तमानपत्र सर्वात वेगळे आणि स्वतंत्र धाटणीचे वृत्तपत्र म्हणून लोकाभिमुख होत आहे, असे गौरवोद्गार महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपालीताई चाकणकर यांनी काढले. रुपाली चाकणकर यांच्या तीन वर्षाच्या महिला आयोगातील कारकीर्दीचा आढावा घेणारा 'सेंट्रल स्प्रेड पुरवणी विशेषांक' शनिवारी (५ ऑक्टोबर २०२४) प्रकाशित करण्यात आला. याची प्रतिमा रुपालीताई चाकणकर यांना भेट देण्यात आली. त्यावेळी त्या बोलत होत्या.

'या तीन वर्षात अनेक प्रसंग घडले. त्याच्या अनेक बातम्याही आल्या. परंतु, हे सर्व कार्य एका ठिकाणी - एका परिप्रेक्षात असावे, अशी कल्पना केवळ दैनिक राष्ट्र संचारच्याच माध्यमातून पुढे आली. या उपक्रमाच्या पाठीमागे केवळ एका व्यक्तीचे कौतुक नसून, पक्ष म्हणून जी विचारधारा या महाराष्ट्रामध्ये रुजते आहे आणि महिलांचे सर्वांगीण हक्काचे व्यासपीठ म्हणून महिला आयोग किती सक्षमतेने कार्य करत आहे हे मांडण्याचा मनोदय याच्या पाठीमागे होता. अजित दादांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही हे काम करू शकलो आणि त्यांच्याच मार्गदर्शनाखाली हा निरंतर प्रवास सुरू राहील. त्याला योग्य तो न्याय देण्याचा प्रयत्न या निमित्ताने झाला असे त्या म्हणाल्या.



**पुणे :** रुपालीताई चाकणकर यांना राष्ट्र संचारच्या 'सेंट्रल स्प्रेड विशेषांकाची प्रतिमा भेट देताना संजीव ओक आणि प्रशांत गायकवाड.

# मनसे कसबा विभागतर्फे २१०० पेढयांचे वाटप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र नवनिर्माण सेना व महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना कसबा विभाग, पुणे शहर तर्फे 'माझी अभिजात मराठी स्वाक्षरी' हा उपक्रम शनिपार चौकात राबविण्यात आला. केंद्र सरकार कडून मराठी भाषेला 'अभिजात दर्जा' घोषित केल्याबद्दल तब्बल २१०० पेढयांचे वाटप करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.



असंख्य मराठी प्रेमींची अनेक वर्षे मराठी भाषेस अभिजात दर्जा द्यावा ही मागणी होती. ती मागणी पूर्ण झाल्याबद्दल हा आनंदोत्सव पुणेकरांनी साजरा झाला.

यावेळी चितळे बंधू मिठाईवाले संचालक श्रीकृष्ण चितळे, मनसे सरचिटणीस ॲड. गणेश सातपुते, रणजीत शिरोळे, उपाध्यक्ष आशिष देवधर, कसबा विभाग अध्यक्ष गणेश भोकरे, आशिष साबळे, नरेंद्र तांबोळी, प्रल्हाद गवळी, निलेश हांडे, सुरेखा होले, आशुतोष माने, आयोजक वसंत खुटवड, रवि सहाणे, सारंग सराफ आदी उपस्थित होते. नितीन रजपूत, चंद्रकांत राजगुरु यांनी उपक्रमाला सहकार्य केले. आयोजक रवि सहाणे आणि सारंग सराफ म्हणाले, मागील अनेक वर्षांपासून मराठी भाषा दिनी मराठी स्वाक्षरी उपक्रम आम्ही राबवत आहोत. मात्र, आता मराठी भाषेला 'अभिजात दर्जा' घोषित झाल्याने सर्वच मराठी जनतेत आनंदाची लहर आली आहे

राष्ट्रसंचार शैक्षणिक रा

# विद्यार्थ्यांचा वाढता ओढा कौशल्यशिक्षण तसेच तंत्रशिक्षणाकडे

## पॉलिटेक्निक अभ्यासक्रमांचा टक्का वाढला

**पुणे :** तंत्रशिक्षणाची रिकामी राहणारी बाके भरू लागली असून, यंदा तब्बल ८४ टक्के जागावंर विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.कारण पारंपरिक शिक्षणातून रोजगार उपलब्ध होत नसल्यामुळे गेल्या काही वर्षांपासून विद्यार्थ्यांचा ओढा कौशल्यशिक्षण तसेच तंत्रशिक्षणाकडे वाढत चालला आहे. विशेष म्हणजे संगणकासंदर्भातील विविध अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांनी सर्वाधिक पसंती दिली असून संगणक अभ्यासक्रमांच्या उपलब्ध जागांपैकी तब्बल ९२ टक्के जागांवर प्रवेश घेतले आहेत. त्यामुळे राज्यात पॉलिटेक्निक अभ्यासक्रमांचा टक्का चांगलाच वाढल्याचे स्पष्ट झाले आहे. यंदा राज्यात एकूण सुमारे ४०० हून अधिक असलेल्या पॉलिटेक्निक संस्थामध्ये १ लाख १४ हजार २७ इतकी प्रवेश क्षमता होती. तंत्रशिक्षणातील पदविका हा रोजगारक्षम अभ्यासक्रम म्हणून एक उत्तम पर्याय ठरत असल्याने दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी यंदाही या अभ्यासक्रमांना पसंती दर्शवल्याचे दिसत आहे. तब्बल ९५ हजार २४८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.



गत वर्षीच्या तुलनेत ही संख्या नऊ हजारांनी जास्त आहे. गेल्या काही वर्षातील ही प्रवेशाची रेकॉर्डब्रेक आकडेवारी आहे. यामध्ये सर्वाधिक ३१ हजार ४११ विद्यार्थ्यांनी कॉम्प्युटर इंजिनिअरिंग, आयटी आणि डेटा सायन्स आदी अभ्यासक्रमांना घेतला आहे. या अभ्यासक्रमांसाठी ३४ हजार २२१ जागा उपलब्ध होत्या. त्याशिवाय इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग या दोन विषयांनाही यंदा कल अधिक आहे. सिव्हिल इंजिनिअरिंगसाठी सर्वात कमी म्हणजे एकूण असलेल्या जागापैकी ७४ टक्के जागांवर प्रवेश झाले आहेत. राज्यातील पदविका अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी मागील तीन वर्षांपासून चांगला प्रतिसाद दिलेला आहे.

### तब्बल ९५ हजार २४८ विद्यार्थ्यांचा प्रवेश

- यंदा प्रवेशित विद्यार्थ्यांमध्ये वाढ झाली आहे. यंदा राज्यात एकूण सुमारे ४०० हून अधिक असलेल्या पॉलिटेक्निक संस्थामध्ये १ लाख १४ हजार २७ इतकी प्रवेश क्षमता होती. तंत्रशिक्षणातील पदविका हा रोजगारक्षम अभ्यासक्रम म्हणून एक उत्तम पर्याय ठरत असल्याने दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी यंदाही या अभ्यासक्रमांना पसंती दर्शवल्याचे दिसत आहे. तब्बल ९५ हजार २४८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

## कन्यापूजन...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पुणे :** वयोगट ३ ते १२ वर्षांमधील १००० हून अधिक मुली, रंगीबेरंगी ड्रेस, कपाळावर चुनरी, चंद्रकोर, स्तोत्रपठण, लकी ड्रॉ, खाऊ अशा उत्साही वातावरणात शिवदर्शन परिसरातील श्री लक्ष्मीमाता मंदिराच्या प्रांगणात ललिता पंचमीनिमित्त पुणे नवरात्रौ महिला महोत्सव अंतर्गत आज कन्यापूजन कार्यक्रम संपन्न झाला.

# भरतनाट्यम् मधून महिला सबलीकरणाचा संदेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** श्री सरस्वती, श्री महालक्ष्मी आणि श्री महाकाली मातेसमोर भरतनाट्यम् हा शास्त्रीय नृत्यप्रकार सादर करीत स्त्री शक्तीने महिला सबलीकरणाचा संदेश दिला. सारसबागेसमोरील श्री महालक्ष्मी मंदिरात राधिका पारकर आणि ग्रुप तर्फे भरतनाट्यम् नृत्य सादर करण्यात आले. यामध्ये राधीका पारकर यांसह एकूण ९ कलाकारांनी सहभाग घेतला. महिला सबलीकरणाविषयी समाजात जनजागृती व्हावी, याकरिता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



श्री महालक्ष्मी मंदिर, श्री बन्सीलाल रामनाथ अग्रवाल धार्मिक व सांस्कृतिक ट्रस्टच्यावतीने आयोजित सार्वजनिक नवरात्र उत्सवात भरतनाट्यम् कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ट्रस्टचे प्रमुख संस्थापक विश्वस्त राजकुमार अग्रवाल, प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल, विश्वस्त ॲड. प्रताप परदेशी, भरत अग्रवाल, डॉ. तृप्ती अग्रवाल, प्रवीण चोरबेले, हेमंत अर्नाळकर, नारायण काबरा, निलेश लद्दड आदी उपस्थित होते. धार्मिक कार्यक्रमांसोबतच सांस्कृतिक, सामाजिक उपक्रम देखील आयोजित करण्यात आले आहेत. तसेच विविध कंपन्यांमधील एचआर महिलांचा सन्मान देखील झाला.

» Selected

# प्रा. नाथ हरि पुरंदरे विद्यालयात 'लायब्ररी सेटअप' पुस्तकालय



**पुणे :** प्रा. नाथ हरि पुरंदरे प्राथमिक विद्यालयात शारदोत्सवानिमित्त "बालगोकुलम्" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या अंतर्गत अक्षरभारती संस्थेमार्फत विद्यार्थ्यांची कार्यशाळा घेण्यात आली. शाळा नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील असते त्यातूनच विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास व्हावा यासाठी शाळेत 'लायब्ररी सेटअप' पुस्तकालय उद्घाटन सोहळा पार पडला. सायंटिफिक टॉईज या उपक्रमात अतिशय सोप्या प्रयोगातून विज्ञानाबद्दल आवड व जिज्ञासा विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्यात आली. इयत्ता पहिली ते चौथीच्या सर्वच विद्यार्थ्यांना वैयक्तिक लॅपटॉप देण्यात आला तो कसा हाताळायचा याची माहिती प्रात्यक्षिकाद्वारे देण्यात आली. लॅपटॉप हाताळण्यास मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणीत झाला. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी. त्यांचा आत्मविश्वास वाढावा व सर्वांगीण व्हावा यासाठी अक्षरभारती संस्था कार्यरत असते. या संस्थेने प्रशालेला ५६० पुस्तके भेट दिली आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विशाखा भुरके होत्या. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून अक्षरभारतीच्या सदस्या कविता झगडे होत्या. संकल्पना शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. लता घोलप यांची होती. सूत्रसंचालन स्वप्रजा राजगुरू यांनी केले.

# 'वृक्ष संवर्धन पुढील पिढीसाठी आवश्यक': डॉ आनंद केंच



**कर्वेनगर :** वनदेवी टेकडी तसेच सम्राट अशोक विद्यालय येथे रोटरी क्लब पुणे मिड ईस्ट, लॉयन्स क्लब पुणे सहकारनगर व हेन्कल अधेसिव टेक्नॉलॉजीज इंडिया लिमिटेड भारतीय युवक कल्याण केंद्र यांच्या संयुक्त विधमाने १०० देशीवृक्ष लावण्यात आले. तसेच सम्राट अशोक विद्या मंदिर शाळेत परसबाग तयार करण्यात आली. या प्रसंगी नवरात्रनिमित्त नवदुर्गा नारीशक्ती सन्मान म्हणून पत्रकार जागृती कुलकर्णी यांचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी सौ. कुलकर्णी, डॉ. प्रसाद खंडागळे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला व वृक्षांचे महत्व सांगितले. याप्रसंगी रोटरी क्लबचे डॉ राजेंद्र भवाळकर, अक्षय तांगडे लायन्स क्लब अध्यक्ष श्रध्दा हाटे, सतीश जवळकर, हेन्कलच्या मनाली भोसले, कैलास कपुर,भारतीय युवक कल्याणचे विकास माने, विठ्ठल कडू, रवि ननावरे, संतोष वरक, प्रकाश घंटी, मुख्याध्यापिका उपस्थित होते. वनदेवी टेकडीवर गेले ५ वर्ष या संस्था सदर उपक्रम राबवित असुन आता टेकडी हिरवीगार दिसत आहे.

# महावितरण 'अभय योजने'ला मिळतोय चांगला प्रतिसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** थकबाकीमुळे कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित असलेल्या जागेवर व्याज व विलंब आकारासह वीजबिलांची थकबाकी वाढतच जाणार आहे. जागेची मालकी बदलली तरी वीजबिलांची थकबाकी भरावीच लागणार. त्यामुळे सध्याच्या वीजबिल थकबाकीचा प्रश्न निकाली काढण्यासाठी संपूर्ण व्याज व विलंब आकार शुल्काची माफी असलेल्या महावितरण अभय योजनेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. थकबाकी असलेल्या जागेवर सध्या विजेची गरज नसली तरी अभय योजनेचा फायदा घेत वीजबिलांच्या थकबाकीमुक्तीला प्राधान्य देत ४ हजार ११४ ग्राहकांनी नवीन वीजजोडणीची मागणी नसल्याचे अर्जात नमूद केले आहे. तर उर्वरित ५ हजार ५८३ ग्राहकांनी मात्र नवीन वीजजोडणी घेणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

वीजबिलांची थकबाकी असलेल्या एखाद्या जागेची मालकी बदलली तरी नवीन जागा मालक किंवा ताबेदार यांना थकबाकीची रक्कम भरावी लागेल असा निकाल मा. सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. थकबाकी असलेल्या जागेवर पुन्हा वीजपुरवठा पाहिजे असल्यास एरवी सर्वप्रथम संपूर्ण थकबाकीची रक्कम भरणे आवश्यक असते. मात्र आता दि. ३१ मार्च २०२४ पर्यंत थकबाकीमुळे कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित झालेल्या जागा वीजबिलातून थकबाकीमुक्त करण्यासाठी महावितरणने अभय योजनेतून विशेष संधी उपलब्ध करून दिली आहे. या योजनेनुसार एकूण थकीत रकमेतील व्याज व विलंब आकाराची संपूर्ण १०० टक्के रक्कम माफ होणार आहे व केवळ मूळ थकबाकीचाच भरणा करावा लागणार आहे.




### योजनेसाठी केवळ ५७ दिवस शिल्लक

- कृषी व सार्वजनिक पाणीपुरवठा योजना वगळून उर्वरित घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक व इतर वीजग्राहकांसाठी ही अभय योजना आहे. विशेष म्हणजे केवळ मूळ थकबाकीच्या रकमेचा एकरकमी भरणा केल्यास लघुदाब ग्राहकांना आणखी १० टक्के तर उच्चदाब ग्राहकांना ५ टक्के सूट मिळत आहे. किंवा मूळ थकबाकीची सुरवातीला ३० टक्के रक्कम भरून उर्वरित ७० टक्के रक्कम व्याजमुक्त सहा हप्त्यांत भरण्याची देखील सोय आहे. सोबतच मागणीनुसार नवीन वीजजोडणी घेण्याची सोय उपलब्ध आहे. महावितरणच्या फ्रेंचायझी क्षेत्रातील ग्राहकांना देखील ही संधी आहे. ही योजना दि. १ सप्टेंबर ते दि. ३० नोव्हेंबरपर्यंत असल्याने थकबाकीमुक्तीच्या या योजनेचे केवळ ५७ दिवस शिल्लक आहेत.

### अधिक माहितीसाठी

- महावितरण अभय योजनेत सहभागी होण्यासाठी व थकबाकीची रक्कम भरण्याची सोय www.mahadiscom.in ही वेबसाईट व मोबाईल ॲपवर उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी नजीकच्या महावितरण कार्यालयात संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# खोटी माहिती दिल्याने शिष्यवृत्ती झाली रद्द

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. या शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या चार विद्यार्थ्यांनी खोटी माहिती सादर केल्याचे समोर आल्यावर त्यांची निवड रद्द करण्यात आली आहे. पदव्युत्तर विद्यार्थी असलेल्या वर्धा येथील उल्का खोब्रागडे, गोंदिया येथील समीक्षा डोंगरे, रायगड येथील प्राची वानखेडे, पुणे येथील अथर्व कांबळे यांची शिष्यवृत्ती रद्द केली.

विद्यार्थ्यांच्या जागी सर्वसाधारण प्रतीक्षा यादीतील सुशील रणवरे, मयूर थोरात, पल्लवी अमुले, रवी एवळे या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांची निवड करण्यात आल्याची माहिती सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने दिली.

याबाबतचा शासन निर्णय विभागाने जाहीर केला. शासनाने २००३ पासून राजर्षी शाहू महाराज परदेशी शिष्यवृत्ती योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत ७५ विद्यार्थ्यांना ३० ऑगस्ट रोजी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली होती. तसेच ३८ विद्यार्थी प्रतीक्षा यादीत होते.

## सर्वसामान्यांच्या खिशाला फटका

# ऐन सणासुदीला महागाईचा भडका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** घाऊक बाजारात रवा, मैदा आणि आट्याच्या दरात मागील पंधरा दिवसांच्या तुलनेत क्विंटलच्या दरात सुमारे ३०० ते ४००० रुपयांची वाढ झाली आहे. तर किरकोळ बाजारात किलोच्या दरात ५ ते ६ रुपयांनी वाढ झाली आहे. बाजारात मागणीच्या तुलनेत गव्हाची आवक होत नाही. त्यामुळे गव्हासह त्यापासून तयार होणाऱ्या रवा, मैदा आणि आट्याच्या दरात वाढ झाली आहे. येत्या काळात सण आणि उत्सव असल्यामुळे ही दरवाढ कायम राहणार असल्याचा अंदाज मार्केट यार्डातील व्यापाऱ्यांनी वर्तविला आहे.

### दरवाढ का ?

- उत्पादित राज्यात गव्हाचा साठा कमी
- दिवाळीच्या पार्श्वभूमीवर मागणी जास्त
- नवीन गहू बाजारात दाखल होण्यास चार महिन्यांचा वेळ
- सणामुळे रवा, मैदा आणि आटा या पदार्थांना मागणी

दिवसेंदिवस या पदार्थांच्या दरात वाढ सुरूच आहे. शिल्लक गव्हाचे प्रमाण कमी असल्याने वाढलेल्या दरात घट होण्याची शक्यता नाही. उलट जोपर्यंत नवीन गहू बाजारात दाखल होणार नाही, तोपर्यंत दरात वाढच होत राहणार असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. सद्य:स्थितीत भुसार विभागात रवा, मैदा आणि आट्याच्या रोज २० ते २५ ट्रकची आवक होत आहे. जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात नवीन गहू बाजारात दाखल होण्यास सुरुवात होत असते. तोपर्यंत शिल्लक असलेल्या जुन्या गव्हावर सर्वांना अवंलबून राहावे लागणार आहे. एकूण परिस्थिती पाहता नवीन गहू बाजारात दाखल होईपर्यंत रवा, मैदा आणि आट्याचे दर अधिक असल्याचेही सुमीत गुंदेचा यांनी सांगितले.




मार्केट यार्डातील भुसार विभागात पुण्यासह मध्य प्रदेशातून रवा, मैदा आणि आट्याची आवक होत असते. बाजारात राज्यासह पंजाब, हरियाना, मध्य प्रदेश आणि गुजरात येथून गव्हाची आवक होत असते. मात्र, या राज्यात शिल्लक गव्हाचे प्रमाण कमी आहे. त्या तुलनेत ग्राहकांकडून मागणी अधिक होत आहे. त्यातच नवरात्र, दसरा आणि दिवाळीमुळे गव्हासह रवा, मैदा आणि आट्याची मागणी वाढणार आहे.

## आनंदी वैवाहिक जीवनासाठी एकत्र कुटुंब पद्धती पूरक; -डॉ. ज्योत्स्ना कुलकर्णी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे:** 'केवळ सौंदर्य, चांगले वेतन किंवा श्रीमंती नव्हे, तर नात्यांमधील विश्वास, सुसंस्कृतपणा आणि एकत्र कुटुंबपद्धती आनंदी वैवाहिक जीवनासाठी पूरक असते. एकमेकांना सांभाळून घेत, मने जुळली, तर पती-पत्नीचे नाते घट्ट होते,' असे मत युरोकूल हॉस्पिटलच्या संचालिका, लॅप्रोस्कोपिक तज्ज्ञ डॉ. ज्योत्स्ना कुलकर्णी यांनी व्यक्त केले.



ब्रह्मसखी ब्राह्मण महिला वधुवर मंडळातर्फे खास उपवधू-वरांसाठी आयोजित 'प्रत्यक्ष संवाद' कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. ज्योत्स्ना कुलकर्णी व 'देणे समाजाचे' संस्थेच्या प्रमुख वीणा गोखले यांच्या हस्ते झाले. प्रसंगी 'ब्रह्मसखी'च्या संचालिका नंदिनी ओपलकर, गीता सराफ, ज्योती कानोले, तृप्ती कुलकर्णी उपस्थित होत्या. ३५० मुले व १४० मुली असे ४९० विवाहेच्छुक वधू-वर यामध्ये सहभागी झाले होते.

वीणा गोखले म्हणाल्या, "ब्राम्हसखी समाजासाठी काम करतेय याचा आनंद आहे. तरुण वयातील मुलामुलींचे विवाह होणे अवघड होत चालले आहे. अशावेळी लग्नाळू मुलामुलींना समोरासमोर आणून जीवनसाथी निवडण्याची संधी देण्याचा उपक्रम स्तुत्य आहे.

## विद्यार्थ्यांची हिवाळी सत्रातील परीक्षा २२ ऑक्टोबरपासून
# पारंपारिक पद्धतीने परीक्षा पार पडणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सर्व विद्याशाखांमधील सर्व अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष ते अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या हिवाळी सत्रातील परीक्षा २२ ऑक्टोबरपासून पारंपारिक पद्धतीने सुरू होणार आहेत. शैक्षणिक वर्ष २०२४-२५

**» परीक्षा विशेष**

मधील पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या नियमित व अनुशेषित विद्यार्थ्यांच्या लेखी आणि प्रात्यक्षिक परीक्षांचे आयोजन टप्प्या-टप्प्याने करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या अधिकार मंडळांनी घेतलेल्या निर्णयानुसार हिवाळी सत्राच्या (ऑक्टोबर-नोव्हेंबर) परीक्षांचे आयोजन करण्यात आले आहे.

संबंधित परीक्षांची वेळापत्रके विद्यापीठाच्या **'www.unipune.ac.in'** या संकेतस्थळावर टप्प्याटप्प्याने प्रसिद्ध करण्यात येणार आहेत.

त्यामुळे विद्यार्थ्यांनी वेळोवेळी संकेतस्थळावरून माहिती घ्यावी, अशी सूचना विद्यापीठ प्रशासनाने केली आहे.

**हिवाळी सत्राच्या परीक्षांचे वेळापत्रक**

| अभ्यासक्रम | प्रात्यक्षिक परीक्षा | लेखी परीक्षा |
|---|---|---|
| पदविका | १५ ते ३० ऑक्टोबर | १५ ऑक्टोबरनंतर |
| प्रथम वर्ष बी.ए/बी.कॉम/ बी.एस्सी (अभ्यासक्रम-२०१९) | १५ ते ३० ऑक्टोबर | १५ ऑक्टोबरनंतर |
| प्रथम वर्ष बी.ए/बी.कॉम/ बी.एस्सी (अभ्यासक्रम-२०२४) | २० ते ३० नोव्हेंबर | १ डिसेंबरनंतर |
| द्वितीय आणि तृतीय वर्ष बी.ए/बी.कॉम/ बी.एस्सी (अभ्यासक्रम-२०१९) | १५ ते ३० ऑक्टोबर | १२ नोव्हेंबरनंतर |
| एम.ए/एम.कॉम/एम.एस्सी (अभ्यासक्रम २०१९/२०२३) | १२ ते २० नोव्हेंबर | २२ नोव्हेंबरनंतर |



## प्रशासनाकडून दखल; डिव्हायडरला हायलाईटर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

राष्ट्रसंचार IMPACT

**पुणे :** गुजरात कॉलनीकडून जाणाऱ्या मोकाटे जलतरण तलाव रस्त्यावर मधोमध डिव्हायडर आहे. त्या डिव्हायडरवरची उंची खूपच कमी असल्याकारणाने तेथे चार चाकी वाहनांना आणि इतर मोठ्या वाहनांना देखील तो डिव्हायडर दिसून येत नाही. त्यामुळे बऱ्याच वेळा वाहने त्या डिव्हायडरवर चढून अपघातजन्य परिस्थिती होतो.



अशा प्रकारे बरेचसे अपघासत त्या डिव्हायडरमुळे होत असल्यामुळे संबंधितल्या बऱ्याच तक्रारी नागरिकांनी राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष गिरीश गुरनानी यांच्या निदर्शनात आणून दिल्या. या बाबतचे वृत्त दैनिक राष्ट्र संचार मध्ये प्रसिद्ध करण्यात आले. या वृत्त प्रसिद्धीचा इम्पॅक्ट शनिवारी बघायला मिळाला आहे. प्रशासनातर्फे त्या दुभाजकाला पांढऱ्या रंगाने रंगवलेले आहे व अपघात होऊ नये तर त्यावर काळ्या पिवळ्या रंगाचे त्वरित लक्ष जावे असे डिव्हायडर रीफ्लेकटर देखील लावले आहे.

लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी मी व माझी संघटना नेहमीच अग्रेसर आहोत व पुढेही असणार, असे मत गिरीश गुरनानी यांनी व्यक्त केले.

## अवतीभवती
### CITY UPDATE




### लाडू आणि ग्रंथ वाटप करून अभिजात भाषेचा अनोखा आनंदोत्सव साजरा

**वारजे :** साहित्यिक कलावंत प्रतिष्ठान पुणे यांच्या वतीने केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा जाहीर केल्याबद्दल हा आनंद उत्सव साजरा करण्यासाठी वारजे येथे पृथक बराटे उद्यानात २०० ग्रंथ आणि लाडूंचे वाटप करण्यात आले. हे वाटप प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिलीप बराटे आणि प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले .याप्रसंगी बोलताना दिलीप बराटे म्हणाले, अनेक वर्षांच्या लढ्याला हे मोठे यश प्राप्त झाले. मराठी ही मुळातच अभिजात भाषा आहे. ज्ञानोबा तुकोबांची ही भाषा आहे.अनेक लेखक कवींच्या प्रतिभेने समृद्ध झालेली ही भाषा आहे. २००० वर्षांपेक्षा जास्त परंपरा असलेली ही भाषा आहे. साहित्यिक कलावंत प्रतिष्ठानच्या वतीने गेली २३ वर्ष मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून प्रतिष्ठानच्या वतीने पाठपुरावा सुरू होता. आज बारा कोटी जनतेला मोठा आनंद झालेला आहे. याप्रसंगी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे, कार्यवाह वि.दा.पिंगळे, कार्याध्यक्ष डॉ. शैलेश त्रिभुवन, उपाध्यक्ष राजेंद्र वाघ ,खजिनदार संजय भामरे, संचालक अविनाश जाधव डॉ.राजेंद्र थोरात, प्रा. बाबासाहेब जाधव, प्रा. संभाजीराव चौगुले, पी.डी. वाणी आदी मान्यवर उपस्थित होते.

## वाढते अत्याचार रोखण्यासाठी पोलीसांची गस्त वाढवा : डॉ. नीलम गोऱ्हे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : शहरात तसेच परिसरात गेल्या काही दिवसात महिलांवरील अत्याचाराच्या वाढत्या घटना लक्षात घेता पोलीस विभागाने अधिक सतर्क राहून अत्याचाराच्या घटना रोखण्यासाठी पोलीसांची गस्त वाढवावी, असे निर्देश विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले. पोलीस आयुक्त कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत डॉ. गोऱ्हे बोलत होत्या.



यावेळी पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार उपस्थित होते. डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, पुणे शहर आणि परिसरात महिलांवरील अत्याचाराच्या घटना वाढत आहेत. ही बाब अत्यंत चिंताजनक असून पोलीसांनी आरोपींना पकडून त्यांच्यावर तात्काळ कारवाई करावी. बोपदेव घाट, दिवे घाट, वेताळ टेकडी, एनडीए परिसर तसेच अन्य निर्जन स्थळी नागरिकांच्या संरक्षणासाठी गस्त वाढवावी.

निर्जनस्थळी पोलीस चौकी अद्यावत करावे. तसेच या ठिकाणी रात्रीच्या वेळी प्रभावशील प्रकाश झोताची आणि भोंग्यांची व्यवस्था करावी. अशा ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावून वेळोवेळी देखरेख व्हावी. याबाबतची माहिती सुरक्षितेतेच्या दृष्टिने नागरिकांना होणे गरजेचे आहे, अशी सूचना त्यांनी यावेळी दिली. शाळांमध्ये गांभीर्यपूर्वक 'बॅड टच गुड टच' याची कार्यशाळा आणि मार्गदर्शन व्हावे. शहरात नवीन पोलीस ठाणे वाढविण्याबाबत शासन सकारात्मक असून त्यादृष्टीने प्रयत्न सुरू आहेत.

## गरजवंत विद्यार्थ्यांना २५ हजार रूपयांचे शैक्षणिक शुल्क वाटप

**खानापूर:** जिल्हा शिक्षण मंडळाच्या महात्मा गांधी विद्यालयात गरजवंत, हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना सुमारे २५ हजारांचे शैक्षणिक शुल्क वाटप करण्यात आले. यावेळी बाबुराव पासलकर प्रतिष्ठानचे संजय पासलकर म्हणाले विद्यार्थ्यांनी आपल्या कर्तृत्वाने शाळेचा गौरव वाढवावा. गरजवंत विद्यार्थ्यांच्या पाठीशी नेहमीच उभा राहील.



कै. कमल सदाशिव पासलकर, कै.सोपान कृष्णाजी पासलकर, कै.हिरामण बाबुराव पासलकर, कै.मधुकर बाबुराव पासलकर तसेच आप्तस्वकीयांच्या स्मरणार्थ जागर सावित्रीच्या कार्यक्रमातंर्गत बाबुराव पासलकर प्रतिष्ठानच्या माध्यमातून सचिव संजय पासलकर यांनी शैक्षणिक शुल्क भरल्याबद्दल मुख्याध्यापक सुभाष देशमुख यांनी अभिनंदन केले. पासलकर यांनी शैक्षणिक शुल्क भरल्याने विद्यार्थी शैक्षणिक प्रगती करतील असे देशमुख म्हणाले.

प्रास्ताविक जेष्ठ शिक्षक शशिकांत जाधव यांनी केले. जेष्ठ शिक्षिका ज्योत्स्ना गुरव व तन्वी मुसळे या विद्यार्थीनीने शैक्षणिक शुल्क भरल्याबद्दल पासलकरांचे आभार व्यक्त केले.



# बदलत आहे सत्तेची परिभाषा!

सम्राट अशोकाच्या कालखंडापासून ते भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत, १५ ऑगस्ट १९४७ पर्यंत हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत, चांद्यापासून बांद्यापर्यंत आणि लाहोरपासून चित्तरंजनपर्यंत अनेक राजकीय स्थित्यंतरे झाली. पण या स्थित्यंतरानंतरसुद्धा राजकारणाची परिभाषा ही अत्यंत संवेदनशीलपणे प्रत्येक राज्यकर्त्यांनी हाताळली. मध्यंतरीच्या कालखंडात काही मोगल सम्राटांच्या कारकिर्दीत, या उदात्त विचाराच्या परिभाषेला गालबोट लावण्याची, इतकेच नव्हे तर ती उखडून टाकण्याची तत्कालीन मोगल राज्यकर्त्यांनी मोहिम हातात घेतली होती. मात्र, सम्राट अशोकापासून ते महात्मा गांधीपर्यंत भारतीयांच्या अंतःकरणात रुजलेली राजकीय परिभाषा या देशातील जनतेनी कधी ढासळू दिली नाही. हे देशातल्या माणसांचा स्वाभिमान जिवंत असल्याचे लक्षण होते. लोकशाहीची पाळेमुळे जशी खोलवर रुजत गेली, तशी राजकीय परिस्थितीही देशात सातत्याने बदलत गेली. त्यामुळे आमच्या स्वाभिमानाचा आर्त स्वर बनलेली राजकीय परिभाषा तिच्या गर्भितार्थाला ठेच लागून, ती रक्तबंबाळ झाली. विशेषतः गेल्या पंधरा वर्षापासून राजकीय स्थित्यंतरे संपूर्ण देशाभरात बदलत गेली आणि इथेच राजकारणाच्या परिभाषेच्या पवित्र, शुद्ध आणि भारतीय जनतेने आत्मसात केलेल्या परिभाषेला ठेच पोहोचली. गेल्या दहा वर्षात भाजपचे सरकार सत्तेवर आले, त्यापूर्वी जवळ जवळ ३०-४० वर्षे काँग्रेस पक्षांनी दिल्लीचे तख्त समर्थपणे एक हाती पेलले. पुढे इंदिराजींच्या कालखंडात राजकारण या शब्दाच्या परिभाषेला अत्यंत सुक्ष्म वातावरणात परिवर्तनाला सुरुवात झाली. बिहारमधून जयप्रकाश नारायण दिल्लीत आले. देशाचे नेतृत्व करु लागले. त्यांच्या विचारधारेतून सत्ता परिवर्तन झाले. आणि राजकारणाला एक वेगळी दिशा मिळत गेली. हा राजकीय परिभाषेच्या परिवर्तनाचा कालखंड मानावा लागेल. रविंद्रनाथ टागोर, डॉ. राजेंद्र प्रसाद, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या वैचारिक भूमिकेतून निर्माण होत असलेला भारत जसा लोहमार्गाचा ट्रॅक चुकला की, रेल्वेला अपघात होऊ शकतो, तसा परिवर्तनाच्या दिशेला गेला आणि इथेच या विचाराला थोडीशी बगल मिळाली आणि राजकीय परिभाषेचे सूत्र बदलत गेले. गेल्या दहा वर्षाच्यापूर्वी इंदिराजींच्या कारकिर्दीत कर्तृत्वसंपन्न नेतृत्व म्हणून जगात ख्याती पावत असतानाच, सत्तेच्या स्वार्थाला हातातील तीक्ष्ण नखांनी ओरबाडायला सुरुवात केली. निर्लज्जपणाचा कळस झाला. राजकीय भोंदुगिरीचे प्रस्थ माजत चालले. तत्वनिष्ठ, ध्येयनिष्ठ, राष्ट्रीय भक्तीची घेतलेले राजनिष्ठा हे नेतृत्व ग्रामीण भागापासून हळूहळू बदलू लागले आणि संपूर्ण राजकारण स्वार्थाच्या महासागरात बुडून डुंब झाले. पक्षनिष्ठा मातीमोल ठरत चालली. राष्ट्रनिष्ठा पायदळी तुडवली जाऊ लागली आणि अहंकाराचा दर्प राजकारणाची अधिष्ठीत देवता बनत गेली. इथेच राजकारणाची परिभाषा पूर्णपणे बदलली गेली. नुकत्याच लोकसभेच्या निवडणूका झाल्या. त्यातून या परिभाषेचा राजकीय परिवर्तनाचा जो अर्थ काढायला हवा होता, तोही राज्यकर्त्यांना प्राप्त झाला. हे वास्तव मुळीच नाकारता येणार नाही. महाराष्ट्रासह अन्य काही राज्यात विधानसभेच्या निवडणूका दरवाज्यावर येऊन घंटी वाजवायला लागल्या आहेत. संपूर्ण देशात महाराष्ट्राइतके अत्यंत गलिच्छ राजकारण कुठेही पहायला मिळत नाही. हे वास्तवही सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आणि स्पष्ट आहे. भाजपमध्ये आयुष्य घालविलेले कार्यकर्ते, आमदार, खासदार पक्ष तिकीट देत नाही म्हणून निष्ठेला पायदळी तुडवून स्वार्थाची दुसरी विहीर खोदताना, अर्थात दुसऱ्या पक्षात जाण्याची भूमिका घेत आहेत. महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरु, इंदिरा गांधी यांनी ज्या काँग्रेस पक्षाला विकासाच्या गंगोत्रीचे स्वरुप प्राप्त करुन दिले, त्या पक्षाचे आमदार-खासदार निर्लज्जपणे अन्य पक्षात जाऊन उमेदवारीची भीक मागू लागलेले आहेत. हे राष्ट्रीय पातळीवरचे पक्ष सोडा पण बारामतीच्या आधारावर असलेला राष्ट्रवादी पक्ष याच परिभाषेच्या बदलातून निर्माण झाला. ४० आमदार फुटले, दुसरा पक्ष स्थापन झाला. उपमुख्यमंत्री पदाची ऑफर आली. स्वीकारली आणि सगळेच आमदार या बदललेल्या परिभाषेचे दूत बनून राहिले. अगदी कालपरवा स्थापन झालेल्या प्रहार संघटनेचा आमदार मिस्टर पटेल बच्चू कडूंना सोडून अन्य पक्षाच्या दरवाज्यात उमेदरीच्या भिकेचा कटोरा घेऊन उभा राहतो, याला राजकारणाची अवनीती म्हणायची की, राजकारणाच्या बदललेल्या परिभाषेचे स्वरुप म्हणायचे, हे फक्त जनता ठरवू शकते. आता अजून दोन-चार आघाड्या निघाल्यात. आघाड्या स्थापन केल्यानंतर स्वार्थाच्या डबक्यात बुडताना राष्ट्रनिष्ठेची लाज कुणालाच वाटत नाही. याचाच अर्थ राजकीय परिभाषेचे रुपांतर सत्तेच्या परिभाषेत झालेले दिसते. हे वास्तव कसे नाकारता येईल. ज्या पक्षांनी तुम्हाला मान दिला, सन्मान दिला, स्वतःची घरे आणि खिसे भरण्याची संधी निर्माण करुन दिली, त्या सत्तेला तुम्ही लाथ मारुन दुसऱ्या पक्षाच्या दारात जाऊन उमेदवारीचा न्याय मागता? हे दृश्य येऊ घातलेल्या महाराष्ट्रातल्या विधानसभेच्या निवडणूकीच्या निमित्ताने आपल्याला पहायला मिळते. याचा अर्थच स्पष्ट आहे, स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून राजकीय राजकारणाची परिभाषा बदलली आणि या स्वार्थी राजकारण्यांनी तिचा गर्भितार्थच मातीमोल करुन टाकला. पण एक गोष्ट स्वीकारणे गरजेचे आहे. या परिवर्तनाची दखल योग्य असो, अयोग्य असो, जनता घेऊ शकते, याचे प्रत्यंतर येणाऱ्या निकालानंतर आपल्या समोर आल्याशिवाय राहणार नाही.

**गेल्या काही वर्षांपासून पालकांमध्ये केंद्रिय माध्यमिक परीक्षा मंडळाचे आकर्षण वाढताना दिसते आहे. त्यामुळे देशभर या शाळांची आणि विद्यार्थ्यांची संख्या वाढते आहे. देशातील एकूण विद्यार्थी संख्या लक्षात घेता हे प्रमाण फार नाही. या शाळांचे अभ्यासक्रम राष्ट्रीय स्तरावरील असल्याने देशपातळीवरील विविध स्पर्धा परीक्षाही याच अभ्यासक्रमांवर आधारलेल्या असतात. त्यामुळे या परीक्षांमध्ये संबंधित विद्यार्थी यशस्वी होतात. त्यामुळेच आता केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळाला संलग्न असलेल्या शाळांच्या अभ्यासक्रमाच्या धर्तीवर राज्य मंडळाच्या शाळांचा अभ्यासक्रम तयार करण्याची भूमिका पुढे आली आहे. पण यामुळे नेमके काय साधेल?**

# अभ्यासक्रमातील बदलाने काय साधणार?

संदीप वाकचौरे, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ

महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये चमकदार कामगिरी करावी यासाठी केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळाला संलग्न असलेल्या शाळांच्या अभ्यासक्रमाच्या धर्तीवर राज्य मंडळाच्या शाळांचा अभ्यासक्रम तयार करून अमलबजावणी करण्याची भूमिका पुढे आली आहे. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय परीस्थिती लक्षात घेऊन अभ्यासक्रमाचा विचार केला जात असतो. शिक्षण हा समवर्ती सूचीतील विषय आहे. त्यामुळे राज्य आणि केंद्र सरकार शिक्षण विषयक धोरण घेऊ शकते. गेली काही वर्षे सर्वच क्षेत्रांतल्या केंद्रीकरणाच्या विरोधात आवाज उठविला जात आहे. अशा वेळी आपण स्वत:हून केंद्रीकरणाच्या दिशेने जात असल्याचा हा पुरावा म्हणायला हवा.

गेल्या काही वर्षांपासून पालकांमध्ये केंद्रिय माध्यमिक परीक्षा मंडळाचे आकर्षण वाढताना दिसते आहे. त्यामुळे देशभर या शाळांची आणि विद्यार्थ्यांची संख्या वाढते आहे. देशातील एकूण विद्यार्थी संख्या लक्षात घेता हे प्रमाण फार नाही. केवळ अभ्यासक्रमाचा दर्जा म्हणून याकडे पाहिले जात नाही, तर अनेकदा ज्या अधिकाऱ्यांचे कार्यक्षेत्र देश आहे त्यांच्या पाल्यांसाठी हा पर्याय उत्तम आहे. अर्थात या शाळांचे अभ्यासक्रम राष्ट्रीय स्तरावरील असल्याने देशपातळीवरील विविध स्पर्धा परीक्षाही याच अभ्यासक्रमांवर आधारलेल्या असतात. त्यामुळे या परीक्षांमध्ये संबंधित विद्यार्थी यशस्वी होतात हे खरे आहे. त्यामुळे भविष्याच्या दृष्टीने ज्यांना तो मार्ग निवडायचा आहे त्या विद्यार्थ्यांचे पालक आरंभापासूनच केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळाच्या शाळांची निवड करतात. त्यादृष्टीने राज्य सरकारचा निर्णय निश्चितच तर्कसंगत आहे. पण केवळ स्पर्धा परीक्षा हे कोणत्याही शिक्षणाचे उद्दिष्ट असू शकत नाही. त्यापलीकडे अनेक उद्देशासाठी विद्यार्थी शिक्षण घेत असतात. त्या विद्यार्थ्यांचे काय ? असा प्रश्न उरतोच. शेवटी शिक्षण म्हणजे केवळ स्पर्धा परीक्षा नाही. अभ्यासक्रम हा शेवटी आपल्याला उत्तम नागरीक ,समाज व राष्ट्रनिर्मितीसाठी आहे. त्यादृष्टीने विचार करण्याची गरज अलिकडेच्या घटना पाहता अधोरेखित होऊ लागली आहे. त्यामुळे समग्र विकासाच्या दृष्टीने विद्यार्थ्यांचा विकास करण्यासाठीचा विचार केंद्रस्थानी येण्याची गरज आहे.

राज्य सरकारने घेतलेली भूमिका स्पर्धा परीक्षा आणि शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासाठी असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे येत्या काही दिवसात राज्यातील इयत्ता तिसरी ते बारावीच्या वर्गासाठी केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळाच्या धर्तीवरील अभ्यासक्रम राबवण्याचे सूतोवाच करण्यात आले आहे. हा अभ्यासक्रम राबवण्यामागे जी कारणे आहेत त्यात विविध स्पर्धा परीक्षांमध्ये आपले विद्यार्थी मागे पडताहेत हे एक कारण सांगितले जात आहे. अलीकडील काळात देशात विशिष्ट प्रकारच्या अभ्यासक्रमासाठी केंद्रिय स्तरावरून प्रवेश परीक्षा घेण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येत आहे. त्यात अभियांत्रिकी,वैद्यकीय अभ्यासक्रमांसाठी राष्ट्रीय प्रवेश परीक्षा घेण्यात येताहेत. त्यामुळे राज्य आणि केंद्रीय अभ्यासक्रमात समानता असावी असा विचार पुढ येत आहे. राष्ट्रीय स्तरावरून घेण्यात येणा–या परीक्षांचे मूल्यमापन लक्षात घेता अधिकाधिक प्रश्न हे केंद्रीय स्तरावरील अभ्यासक्रमातील घटकांशी निगडीत असतात. राज्य मंडळाच्या विद्यार्थ्यांना त्या परीक्षांना सामोरे जाताना काहीसे कठीण जाते. त्यातून राज्याचा अभ्यासक्रम हा केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळाचा सारखा असला पाहिजे अशी भूमिका घेणारा समूहाचा एक गट आहे. त्यातून सर्व अभ्यासक्रम समान असायला हवा अशी मागणी देखील पुढे येऊ लागली आहे. केवळ केंद्रिय प्रवेश परीक्षांसाठी अशा प्रकारची भूमिका समोर येत असल्याने राज्य मंडळाचा अभ्यासक्रम हा टाकाऊ आहे का ? असाही प्रश्न उपस्थित केला जाऊ लागला. एकीकडे समान अभ्यासक्रम केला गेला तर देशातील ग्रामीण,आदिवासी,डोंगराळ भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे काय ? असा प्रश्न उपस्थित केला जातो. गणितासारखा विषय अवघड जातो. इंग्रजी विषयाचे आकलन होत नाही त्यामुळे माध्यमिक स्तरावर दोन प्रकारचे गणिताचे अध्यापन केले जावे अशा स्वरूपाचा विचार आपल्याच राज्यात केला होता. त्यादृष्टीने सामान्य गणिताचा पर्याय दिला गेला होता. त्यादृष्टीने अमलबजावणीबाबत कार्यवाही करण्यात आली होती. मुळात सर्व विद्यार्थी समान नसतात. प्रत्येक विद्यार्थ्यांची बुद्धीमत्ता भिन्न आहे. अनुभवात समानता नाही. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक परीस्थिती भिन्न आहेत. जग बहुबुद्धीमत्तेच्या वाटेने जाते आहे. असे असताना आता सरसकट केंद्रिय माध्यमिक परीक्षा मंडळाचा अभ्यासक्रम राबविण्याचा निर्णय झाला तर राज्यातील ग्रामीण विद्यार्थ्यांना अडचणीचे ठरण्याचा धोका व्यक्त होत आहे. केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळाचे असणारे सत्र नियोजन आणि आपले राज्यमंडळाचे असणारे सत्र नियोजन यात असणारे अंतर, आंतरक्रिया, अध्यापन,अध्ययन, मूल्यमापन प्रक्रिया हे सारेच बदलावे लागणार आहे. त्यासंदर्भात संबंधितांशी संवाद करणेबाबत सकारात्मक भूमिका सरकारने घेतली आहे. केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळाच्या शाळांमध्ये असणा–या विद्यार्थी संख्येची अट आणि राज्य मंडळाच्या शाळांमध्ये असणा–या विद्यार्थी संख्या यातही अंतर आहे. वास्तवाचे प्रश्न लक्षात घेऊन निर्णय घ्यावा लागणार आहे. त्यामुळे याबाबत भविष्यात अंमलबजावणीच्या दृष्टीने काय घडते हे पाहणे अधिक औत्सुक्याचे ठरणार आहे.

देशात मूल्यमापन करणारी विविध मंडळे आस्तित्वात आहे. देशातील प्रत्येक राज्यात राज्यमंडळे आस्तित्वात आहे. पहिली ते बारावीचा अभ्यासक्रम, मूल्यमापन राज्य सरकार ठरवते. त्याच बरोबर राष्ट्रीय स्तरावर केंद्रिय माध्यमिक परीक्षा मंडळे व आंतरराष्ट्रीय परीक्षा मंडळे देखील अस्तित्वात आहेत. अर्थात राज्य मंडळाचा अपवाद वगळता उर्वरीत मंडळाच्या शाळांची संख्या देशभरातच अत्यंत मर्यादित आहेत. महाराष्ट्रात एकट्या राज्य मंडळाशी संलग्न असणाऱ्या शाळांची जेवढी संख्या आहे त्या आसपास देशात केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळाच्या शाळा आहेत. आंतरराष्ट्रीय मंडळाच्या शाळांची संख्या तर अत्यंत मर्यादित आहेत.

भारतात केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळाच्या शाळांची संख्या सुमारे २८.५ हजारांच्या दरम्यान असल्याचे सांगण्यात येते. महाराष्ट्राचा विचार करता राज्यात केंद्रिय मंडळाच्या सुमारे अकराशे शाळा असल्याचे शासकीय आकडेवारीवरून दिसते आहे. देशात विविध राज्यांचा विचार करता केंद्रिय माध्यमिक परीक्षा मंडळाच्या एक हजारापेक्षा अधिक शाळा असणा–या राज्यांमध्ये केरळ,दिल्ली,हरीयाणा,उत्तर प्रदेश,पंजाब राज्यांचा समावेश आहे. उत्तर प्रदेशात सुमारे २३०० तर दिल्लीत २००० शाळा आहेत. मध्यप्रदेशात ९८४ तर राजस्थानमध्ये ८९० पेक्षा अधिक शाळा आहेत. महाराष्ट्राचा विचार करता राज्याचा शिक्षणाचा विस्तार अधिक मोठा आहे. राज्यात एकूण एक लाख पाच हजार आठशे अठ्ठेचाळीस प्राथमिक शाळा आहेत.माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळांची संख्या २८ हजार ६१२ इतकी आहे. यातील ग्रामीण भागातील शाळांचे प्रमाण ६० टक्क्याच्या आसपास आहे. स्वयं अर्थसहाय्यित खाजगी शाळांचे शेकडा प्रमाण ३५ टक्के इतके आहे. राज्यातील २०२१–२२ मध्ये दर्शित करण्यात आलेल्या शासकीय आकडेवारीनुसार स्वयं अर्थसहाय्यित खाजगी शाळांमध्ये राज्यमंडळाच्या ५ हजार ०९२ शाळा आहेत. १ हजार ०७२ शाळा केंद्रिय माध्यमिक परीक्षा मंडळाच्या शाळा आहेत. आंतरराष्ट्रीय मंडळाच्या ३९३ शाळा आहेत. विविध मंडळाच्या स्वयंअर्थसहाय्यित खाजगी शाळांची एकूण संख्या ६ हजार ५७७ इतकी आहे. यातील ५ हजार ६३९ शाळा या इंग्रजी माध्यमांच्या आहेत. ८२३ मराठी माध्यमाच्या आहेत तर उर्वरीत माध्यमाच्या शाळांची संख्या ११५ इतकी आहे. हा आपल्या राज्याचा सध्याचा शैक्षणिक विस्तार आहे. मुळात केंद्रिय परीक्षा मंडळाच्या अभ्यासक्रमाच्या शाळा या देशात केंद्र सरकारच्या सेवेत असलेल्या आणि देशाचे कार्यक्षेत्र असलेल्या खाजगी कंपन्यांच्या पालकांच्या पाल्यांना अधिक होतो. त्यांच्या पाल्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून देशभरात केंद्रिय माध्यमिक परीक्षा मंडळाच्या शाळा अधिक फायदेशीर ठरतात. त्याचबरोबर आर्थिक दृष्टया उच्चस्तर असलेल्या पालकांच्या पाल्यांसाठी या शाळा प्रतिष्ठा आणि आर्थिक दृष्टया परवडणा–या आहेत.

राज्यातील शाळा केंद्रीय मंडळाच्या अभ्यासक्रमाशी नाते सांगणाऱ्या असायला हरकत नाही; पण त्यातील खरी मेख ही अभ्यासक्रमाची नसून, शिक्षणाचा दर्जा उंचावण्याचा, शिक्षणातील अव्यवस्था दूर करण्याचा, शाळांमधील सुविधा वाढविण्याचा मुद्दा महत्त्वाचा आहे. शिक्षण सेवेतील संस्थांची स्वायत्तता टिकविण्याचा आहे. केवळ केंद्राचा अभ्यासक्रमाचा धडा गिरवला तर गुणवत्ता वाढेल आणि विद्यार्थी स्पर्धा परीक्षांत चमकतील का ? विविध मंडळात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये असलेला मूलभूत फरक लक्षात घेण्याची गरज आहे. केंद्रिय, आंतराराष्ट्रीय मंडळात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, भाषिक परीस्थिती आणि राज्य मंडळातील विद्यार्थ्यांची स्थिती यात प्रचंड अंतर आहे. राज्य मंडळांच्या अधिकाधिक शाळा ग्रामीण,आदिवाशी, डोंगराळ भागातील असून त्या क्षेत्रातील विद्यार्थी संख्या अधिक आहे. राज्यातील अजूनही पहिल्याच पिढीतील विद्यार्थी शाळेत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण अधिक आहे. त्यांची स्वप्ने पुन्हा भिन्न आहेत. आपल्या समाजाला सर्व प्रकारच्या क्षेत्रात स्थान मिळवणाऱ्या अभ्यासक्रमाची गरज आहे. आज स्पर्धा परीक्षांचा विचार केला गेला तर तेथे टक्का वाढेल पण त्यापलिकडे माणूस व समाज म्हणून आवश्यक असणाऱ्या क्षेत्राचे काय करायचे ? सर्व मंडळांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये असणारा सामाजिक फरक दुर्लक्षून चालणार नाही. या पार्श्वभूमीवर केंद्र आणि राज्य मंडळांच्या अभ्यासक्रमांकडे पाहणे आवश्यक आहे. केवळ स्पर्धा परीक्षांचा विचार करून निर्णय होत असताना त्या क्षेत्रात किती विद्यार्थी प्रवेश क्षमता आहे ? किती विद्यार्थी त्या क्षेत्रात आपले करीअर करणार आहेत? त्या संख्येच्या पलिकडे कितीतरी विद्यार्थी आहेत. त्यांच्या भविष्याच्या दृष्टीने विचार करण्याचीही गरज आहे. एकूणच गुणवत्तेच्या दृष्टीने पावले उचलताना केवळ हा बदल पुरेसा ठरणार नाही हेही लक्षात घ्यायला हवे.

## गुड मॉर्निंग

दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

### पंचांग

**सोमवार, दिनांक ७ ऑक्टोबर २०२४**
अश्विन शु.४, अनुराधा, ललिता पंचमी
बाळबाळंतीणीने देवास जाणेस शुभ दिवस.
श्री शके १९४६, विक्रम शोभन २०७९,
क्रोधीनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा ऋतू
**नक्षत्र** : अनुराधा, **योग** : प्रीति, करण : बव
**सूर्योदय** : स.०६.०९ **सूर्यास्त** : सायं.०५.५४ वा.
**राहू काळ : सकाळी** : ७:३० ते ९:००

### दिनविशेष

▶१३३८: प्रसिद्ध भागवतभक्त जोगा परमानंद यांनी बार्शी येथे समाधी घेतली. ▶१६७०: शिवाजी महाराजांनी सुरत सोडून लुटीसह परतीचा प्रवास सुरु केला. ▶१८६६: आधुनिक मराठी काव्याचे प्रवर्तक कृष्णाजी केशव दामले उर्फ केशवसुत यांचा जन्म. ▶१८६७: मादाम क्युरी यांचा जन्म. ▶१९२२: क्रिकेट कसोटीमधील यष्टीरक्षक पद्मनाभ गोविंद उर्फ नाना जोशी यांचा जन्म. रणजीत सामन्यात ते महाराष्ट्राचे कर्णधार होते. ▶१९३०: क्रांतिकारक भगतसिंग यांना फाशीची शिक्षा जाहिर. ▶१९५०: मदर तेरेसांनी कलकत्ता येथे मिशनरीज ऑफ चॅरिटी ही संस्था स्थापना ▶१९७८: भारताचा जलदगती गोलंदाज आणि यंदाचा अर्जुन पुरस्कार विजेता झहीर खान याच जन्म. ▶१९९४: स्वातंत्र्यसैनिक आणि जेष्ठ गांधीवादी विश्वंभरनाथ पांडे यांची इंदिरा गांधी एकात्मता पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

### राशीभविष्य

▲ **मेष** : वरिष्ठांची मर्जी सांभाळा. ▲ **वृषभ** :महत्वाचे निर्णय शक्यतो टाळा. ▲ **मिथुन** :दुसऱ्यावर विसंबून राहू नका. ▲ **कर्क** :कष्टाच्या मानाने लाभ कमी होईल. ▲ **सिंह** : मूड रोमँटिक बनेल. ▲ **कन्या** : थकवा जाणवेल. ▲ **तुळ** : युक्तीप्रयुक्तीने कामे कराल. ▲ **वृश्चिक** : कुटूंबाच्या गरजा भागवाल. ▲ **धनु** : प्रचंड उत्साहाने कामे कराल. ▲ **मकर** : एकाचा राग दुसऱ्यावर काढू नका. ▲ **कुंभ** : अचानक आर्थिक लाभ लागेल. ▲ **मीन** : मानसन्मान लाभेल.

### चिंतन

एका शिष्याने रामकृष्ण परमहंस यांना एक शंका विचारली. ती शंका अशी होती की, गंगेत स्नान केल्याने पाप धुतले जातात का? जर ते खरे असेल तर पापी माणसाने एकदाच गंगेत स्नान केले तर तो पुण्यवान का होत नाही? स्वामी म्हणाले– गंगा पवित्र आहे. पाप नष्ट होते. पण पापी मनुष्य पवित्र होत नाही. कारण त्याचे पाप किनाऱ्यावरच उभे असते. आंघोळ केल्यानंतर तो परत किनाऱ्यावरच येतो तेव्हा तिथे उभे राहिलेले त्याचे पाप त्याच्या मनात पुन्हा शिरलेले असते. या पापभावना समूळ नष्ट झाल्याशिवाय काहीच उपयोग नाही. पाप भावना नष्ट करा.

### व्यक्तीविशेष

#### कवी केशवसुत

कवी केशवसुतांचा जन्म ७ ऑक्टोबर १८६६ रोजी गणपतीपुळ्याजवळील मालगुंड येथे झाला. विद्यार्थी दशेपासून काव्यलेखन करणाऱ्या कृष्णाजींना काव्यरत्नावली मासिकाचे संपादक नारायण नरसिंह फडणीस यांच्या सूचनेवरून केशवसूत नाव घेतले. या कवीने आपल्या कवितांतून स्त्री पुरुषांतील प्रेम, निसर्ग, सामाजिक बंडखोरी व गूढ अनुभूतींचा आविष्कार केला. स्फूर्ती, कवितेची प्रयोजन, आम्ही कोण? प्रतिभा या त्यांच्या महत्त्वाच्या कविता. वर्डस्वर्थचा प्रभाव असणाऱ्या केशवसुतांनी भृंग, पुष्पाप्रत, फुलपाखरु अशा निसर्गकविता लिहिल्या. 'तुतारी', 'नवाशिपाई', 'गोफण केली छान', या कवितांतून आपले क्रांतिकारी सामाजिक विचार ओजस्वीपणे मांडले. झपूर्जा ही त्यांची गूढ अनुभूती व नाविन्यपूर्ण अभिव्यक्तीची कविता. 'म्हातारी', 'हरपले श्रेय', या त्यांच्या गूढ गुंजनात्मक कविता. अशा कवी केशवसुतांचे ५ नोव्हेंबर १९०५ रोजी हुबळी येथे प्लेगने निधन झाले.

### बोधकथा

#### मांजरात शक्ती आहे का?

शरद काही कामासाठी घराबाहेर पडला. तेव्हा काही अंतर गेल्यावर त्याला एक मांजर आडवे गेले. शरद मनात कचरला, तो म्हणाला, अरे देवा आता काम काही होणार नाही, अपशकून झाला. त्याचे हे बोलणे जवळूनच जाणाऱ्या एका साधू पुरुषाने ऐकले. ते साधू पुरुष शरदच्या जवळजाऊन म्हणाले, अरे बाळा मांजर एवढे शक्तीशाली कधी झाले? जे माणसाचे महत्वाचे काम बिघडवू शकेल? बाळा, मांजराच्या जवळ जर खरोखरच माणसाचे काम असफल करण्याचे सामर्थ्य असते तर सर्वांनी शत्रूंशी लढाई करण्यासाठी मोठे सैन्य उभे करण्याएवजी मोठ मोठ्या सत्ताधाऱ्यांनी मांजरेच पाळली नसती का? म्हणजे शत्रू चाल करणार असेल तर सोडा मांजर, जेणेकरुन शत्रूचे काम असफल होईल.' साधूंचे म्हणणे ऐकून शरदने विचारले, 'असे असेल तर मग अपयशाची कारणे कोणती? त्यावर साधू हसून म्हणाले, 'अपयशाला अंतर्गत आणि बहिर्गत अशी दोन कारणे असू शकतात. एक तर मनुष्याचे प्रत्यक्ष प्रयत्न कमी पडतात आणि दुसरी गोष्ट कार्य यशस्वी होईलच अशी मनातून शंभर टक्के खात्री नसते. पण अशा कमजोर मनस्थीतीत कार्यारंभ केल्यानंतर मन अस्थिर होते. अशा परिस्थितीत कुत्री, मांजरे, गिधाडे, घुबड, साप किंवा इतर अनेक कुठल्यातरी प्राण्याचे तोंड दिसले किंवा ते समोरुन गेले आणि काम अयशस्वी झाले तर सारे खापर त्या प्राण्यांवर किंवा व्यक्तीवर फोडले जाते. स्वत:च्या कमकुवत बाजूंकडे बघण्याची तसदी तो घेत नाही. पण अपयशाचे खरे कारण मात्र जाणून घेतले तर अशा अंधश्रधांना थारा राहणार नाही.'' शरदला त्या साधूंचे म्हणणे पटले. त्या दिवसापासून त्याने मनात अशा लहान –मोठ्या अंधश्रद्धांना थारा देण्याचे सोडून दिले.

### जिज्ञासा

#### जंपिंग जीन्सची जनक

काही दिवसांनंतर तिने अनुवंश शास्त्राचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. तिची बुद्धीमत्ता बघून पदवीपूर्व वर्गात असतानाच शिक्षकांनी पदवी अभ्यासक्रम करण्याचे निमंत्रण तिला दिले. १९२३ मध्ये ती बीएससी झाली. वनस्पती शास्त्रातील सायटॉलॉजी या विषयावर ती अभ्यास करू लागली. त्याच काळात मक्याच्या गुणसुत्रांचा सुक्ष्म अभ्यास करण्यासाठी तिने एक विशेष तंत्र विकसित केले. वर्षभरातच तिने पीएचडी मिळवली. पुढील तीन–चार वर्ष ती त्याच संस्थेत अध्यापन करत होती. पुढे तिने गुणसुत्रांचे क्रॉसिंग केल्यास माहिती आणि अनुवंशिक बाबींचे आदानप्रदान होऊ शकते हे सिद्ध केले. राष्ट्रीय शिष्यवृत्ती मिळाल्यानंतर मिसोरी विद्यापीठात आणि नंतर बर्लिनच्या कॅन्सर विल्हे इन्स्टीट्यूटमध्ये अध्ययन सुरू केले. तिचे निरीक्षण चालू असतानाच मक्याच्या गुणसुत्रात गतीमन अनुवंशिक तत्व असतात हे तिला दिसले. मक्याची रोपे लावून निरीक्षण केले असता दोन जुळ्या रोपांची पाने विरुद्ध दिशेने वाढत हे तिला दिसले. एका रोपात अनुवंशिक गुणांवर संशोधन करण्यात आले त्याला जंपिंग जीन्स तत्व असे म्हटले गेले. एखाद्या जीवाणूंमधील जीन्सचा दुसऱ्या जंपिंग जीन्सवर होणारा संयोग प्रतिजैविकाद्वारे कसा रोखता येईल यासाठी बार्बराचे संशोधन उपयोगी ठरले. जंपिंग जीन्स तत्वाची जननी म्हणून बार्बरा मॅकक्लिंटाक हे नाव प्रसिद्ध आहे. **(उत्तरार्ध)**

### सामान्यज्ञान

#### ग्लोबल पोझिशनिंग सिस्टीम

अलीकडे, जीपीएस हा शब्द वारंवार कानी पडत असतो. जीपीएस म्हणजेच 'ग्लोबल पोझिशनिंग सिस्टीम.' जीपीएस म्हणजे आधुनिक काळातील दिशादर्शक यंत्रणा असं म्हटलं, तरीही ते चुकीचं ठरणार नाही. सोप्या भाषेमध्ये सांगायचं झालं, तर जीपीएसमुळे जगात कुठेही आपल्याला आपली निश्चित जागा कळते. ही सेवा अगदी मोफत असते. यासाठी कुठेही मासिक शुल्क किंवा काही भरावं लागत नाही. जीपीएससाठी लागतो तो फक्त उपग्रहांकडून आलेले सिग्नल पकडण्यासाठी बनवला गेलेला एक ट्रान्समीटर. यालाच 'जीपीएस रिसिव्हर' असंही म्हणतात. आता हे सिग्नल्स कसे येतात? तर पृथ्वीच्या भोवताली २४ उपग्रह सतत फेऱ्या मारत असतात. (क्रमशः)

### सोडवा सुडोकू

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक : ४५९**


| | | | |
|---|---|---|---|
| | | 4 | 2 |
| 4 | | | 1 |
| | | | |
| | 1 | 2 | 4 |

**क्रमांक : ४५८ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | 2 | 3 | 1 |
| 1 | 4 | 2 | 3 |
| 3 | 1 | 4 | 2 |
| 2 | 3 | 1 | 4 |

### हास्यविनोद

**गृहस्थ** : डॉक्टर, माझ्या मुलाने चावी गिळली हो... **डॉक्टर**: चावी गिळून किती वेळ झाला? **गृहस्थ**: दहा दिवस झाले असतील. **डॉक्टर** : काय?.... दहा दिवस? इतक्या दिवसांनी तुम्ही त्याला माझ्याकडे आणताय? **गृहस्थ**: एतके दिवस आमच्याकडे डुप्लिकेट चावी होती ना...पण, ती आजच हरवली बघा.



### म्हणींचे अर्थ

**भिंतीला कान असतात**

कोणत्याही गुपित गोष्टी हळू आवाजात, शेजारी कोणी नाही हे पाहून बोलाव्यात, हे सांगण्यासाठी ही म्हण वापरली जाते. असं सांगताना भिंतीलाही कान असतात ती ऐकेल हे समोरच्याला सांगताना ही म्हण वापरतात.

### महिलायन

#### मधुमेही स्त्रियांसाठी आहार

मधुमेहाचे वाढते प्रमाण लक्षा घेऊन तो टाळण्यासाठी आहाराचीही काळजी घेतली पाहिजे. विशेषतः स्त्रिया आहाराकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे त्यांना हा आजार होण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे प्रत्येक स्त्रीने आहाराबाबत सजगपणे काळजी घ्यायला हवी.

भारतात मधुमेहींची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. यामध्ये स्त्रियांचे प्रमाणही लक्षणीय आहे. आपल्या आजाराबाबत जागरूक राहून स्त्रियांनी मधुमेह नियंत्रणात आणला पाहिजे. कुटुंबाची काळजी घेण्याबरोबरच स्वतःचीही पुरेशी काळजी घेतली तर मधुमेही स्त्रियांनाही दीर्घकाळ चांगले आयुष्य जगता येऊ शकते. मधुमेह झाला असल्यास आहाराबाबत काटेकोरपणे नियम पाळावेत. अर्थात, त्याचा बाऊ करून घेऊ नये. दिवसातून तीन ते चार वेळा काही तरी खावे. यामध्ये तीन वेळा पुरक आहार आणि दोन वेळा हलके स्नॅक्स यांचा समावेश असावा. प्रथिने आणि कार्बोहायड्रेट्सचे योग्य प्रमाण आहारात आवश्यक आहे. त्यासाठी नुसता ब्रेड खाण्यापेक्षा त्यासोबत अंडे घ्यावे. भाजीसोबत डाळही घ्यावी. यामुळे साखरेचे प्रमाण योग्य राहते. कारण कार्बोहायड्रेट्सची साखर लवकर तयार होते. तर, प्रथिनांमुळे साखर हळूहळू तयार होते. त्यामुळे दीर्घ काळपर्यंत पोट भरल्यासारखे वाटते. परिणामी जास्त अन्न खाल्ले जात नाही. जास्त तेलकट, तुपकट पदार्थ खाणे टाळावे. आहारामध्ये लो ग्लायसिमिक इंडेक्स असणारे म्हणजे शरीरात गेल्यानंतर हळूहळू ग्लोकोजमध्ये रुपांतरीत होणारे पदार्थ समाविष्ट केले पाहिजेत. यामध्ये हिरव्या पालेभाज्या, सोया, मुगडाळ, काळे चणे, राजमा, ब्राऊन राईस, अंड्यातील सफेद भाग इत्यादी पदार्थांचा समावेश करावा. खाण्यात वीस टक्के फायबर असावे. ते मिळण्यासाठी कणिक मळताना ती चाळू नये. कोंडा पोटात जाणे आवश्यक असतो. तसेच राजमा, स्प्राऊट्स इत्यादी पदार्थ खावेत. कारण यामधून प्रथिने आणि फायबर्स दोन्ही मिळतात. **(पूर्वार्ध)**

### बालांगण

#### मदनगड

दुर्दम्य इच्छाशक्तीला साद घालणारा एक किल्ला अहमदनगर जिल्ह्यात अकोले तालुक्यात आहे मदनगड. अलंक आणि कुलंगगड या किल्ल्यातील मध्यफळीचा मानकरी असणारा मदनगड चढण्यासाठी गिर्यारोहक अनुभवी असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर रोप, हर्निस, कॅरॅबिनर आणि डिसेंडर अशा गिर्यारोहणाच्या साधनांच्या मदतीने चढावा लागतो. त्यामुळे जे दुर्गप्रेमी दुर्दम्य इच्छाशक्तीच्या बळावर झट्या देऊन गगनाला भिडलेल्या मदनगडाच्या माथ्यावर पाय रोवण्यात यशस्वी होतात ते खऱ्या अर्थाने निखळ यशाचे मानकरी ठरतात. या गडाच्या चारी बाजूंनी खोलच खोल दऱ्या असल्यामुळे या गडास तटबंदी आणि बुरूज बांधण्यासाठी गरजच भासलेली नाही. त्यामुळे याच्या माथ्यावर शिबंदीच्या घरट्याचे चौथरे, पाण्याची टाकी आणि गुहा एवढेच अवशेष पाहायला मिळतात. शिवकाळात १६७० साली हा गड मराठ्यांच्या ताब्यात आला.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

# विश्ववेध

## गुरुच्या चंद्रावर खाऱ्या पाण्याचा महासागर



आपल्या ग्रहमालिकेत गुरू आणि शनी हे दोन ग्रह सर्वात मोठ्या आकाराचे आहेत. तसेच त्यांच्या चंद्रांची संख्याही मोठीच आहे. गुरुच्या चंद्रांची संख्या ९५ असून, शनीला तब्बल १४५ चंद्र आहेत ! गुरूच्या चंद्रांपैकी युरोपा, गिनीमीडसारखे चंद्र तसेच शनीच्या चंद्रांपैकी टायटन, एन्सिलाडससारखे चंद्र खगोलशास्त्रज्ञांच्या कुतूहलाचा विषय बनलेले आहेत. शनीच्या टायटन या चंद्रावर पृथ्वीप्रमाणेच नद्या, सरोवरे आणि समुद्र आहेत. तसेच नासाच्या हबल दुर्बिणीला गुरूचा सर्वात मोठा चंद्र असलेल्या गिनीमीडवरही बर्फाच्या शिखराखाली खाऱ्या पाण्याचा महासागर सापडलेला आहे.

पृथ्वीच्या पृष्ठभागावर जेवढे पाणी आहे त्यापेक्षा जास्त पाणी या गिनीमीड नावाच्या चंद्रावर आहे, असा दावा संशोधकांनी केला आहे. पृथ्वीसारखी वसाहत योग्य ठिकाण शोधण्यासाठी द्रव स्वरूपातील पाणी ओळखणे गरजेचे आहे. नासाच्या वॉशिंग्टन येथील विज्ञान मोहिमा संचालनालयाचे सहायक प्रशासक जॉन ग्रन्सफेल्ड यांनी सांगितले की, हा शोध म्हणजे हबल दुर्बिणीच्या दृष्टिकोनातून एक मैलाचा दगड आहे. गिनीमीडवर बर्फाच्या टोपीखाली मोठा महासागर असून, त्यामुळे तेथे पृथ्वीसारख्या जीवसृष्टीस अनुकूल स्थिती असू शकते. गिनीमीड हा आपल्या सौरमालेतील सर्वात मोठा नैसर्गिक उपग्रह असून, त्याला स्वतःचे चुंबकीय क्षेत्रही आहे. त्यामुळे ध्रुवीय प्रारणे निर्माण होतात. तापलेल्या विद्युतभारित वायूच्या स्वरूपात ती रिबीनप्रमाणे चमकताना दिसतात. गिनीमीडच्या उत्तर व दक्षिण ध्रुवांवर हा परिणाम दिसतो. गिनीमीड हा गुरूच्या जवळ असल्याने तो गुरूच्या चुंबकीय क्षेत्राच्या प्रभावाखाली येतो. जेव्हा गुरूचे चुंबकीय क्षेत्र बदलते तेव्हा गिनीमीडचे हे प्रारण क्षेत्र म्हणजे रिबिनीसारखा वायूंचा प्रवाह मागे पुढे होत असतो. अशा दोन रिबिनीसारख्या प्रारण प्रवाहांची हालचाल बघून वैज्ञानिकांनी गिनीमीडच्या कवचाखाली खाऱ्या पाण्याचा महासागर असण्याची शक्यता व्यक्त केली आहे. या सागराची जाडी १०० किलोमीटर असावी व तो पृथ्वीच्या महासागरापेक्षा दहा पट खोल असावा. गिनीमीडवर महासागर असल्याची शंका १९७० मध्ये वैज्ञानिकांना आली होती. नासाच्या गॅलिलिओ मोहिमेत २००२ मध्ये गिनीमीडचे चुंबकीय क्षेत्र मोजण्यात आले होते व तो त्याबाबतचा एक पुरावा होता. आता नवीन निरीक्षणे अतिनील किरणांच्या मदतीने केली असून, त्यात पृथ्वीच्या वातावरणाबाहेर असलेल्या हबल दुर्बिणीचा वापर केला आहे. त्या दुर्बिणीमुळे अतिनील प्रकाश रोखला जात असतो. जर्नल ऑफ जिओफिजिकल रिसर्च-स्पेस फिजिक्स या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झालेले आहे.

## गोष्ट एका स्काय डायव्हिंगची



सोशल मीडियावर सध्या एक व्हिडीओ तुफान व्हायरल होत आहे. या व्हिडीओत एक तरुणी स्काय डायव्हिंग करताना दिसत आहे. पण, स्काय डायव्हिंग करण्याआधी ही महिला चक्क विमानाच्या दरवाजात उभं राहून ओठांना लिपस्टिक लावताना दिसत आहे. काही तरी हटके करत प्रसिद्ध होण्यासाठी लोकं वाट्टेल ते करतात. या तरुणीनेही प्रसिद्धीसाठी वेगळाच मार्ग निवडलाय. या तरुणीचा अंदाज लोकांना चांगलाच आवडला आहे. अनेक लोकांनी या तरुणीचं कौतुक केलंय तर काही युजर्सने प्राण जाए पर मेकअप न जाये अशी प्रतिक्रिया दिली! काहींनी निक्की तांबोळीच्या थाटात बाईऽऽऽकाय हा प्रकार असेही म्हटले ! व्हायरल होण्याऱ्या या व्हिडीओत एक तरुणी विमानातून स्काय डायव्हिंग करण्यासाठी सज्ज असल्याचं दिसतंय. स्काय डायव्हिंग [illegible] लागणारी सर्व तयारी तिने केली आहे. पण, विमानातून उडी मारण्याआधी तिने केलेल्या एका गोष्टीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. विमानाच्या दरवाजात हवेत लटकलेल्या अवस्थेत असतानाही ती ओठांना लिपस्टिक लावताना दिसत आहे. लिपस्टिक लावल्यानंतर तिने कॅमेरासमोर छानसी पोझ दिली आणि त्यानंतर तिने खाली उडी मारली. हा व्हिडीओ इन्स्टाग्रामवर शेअर करण्यात आला आहे. तरुणीचा हटके अंदाज नेटकऱ्यांना भलताच आवडला आहे. आतापर्यंत हा व्हिडीओ दहा लाखांहून अधिक लोकांनी पाहिला आहे. यावर अनेकांनी कमेंट्सही केल्या आहेत. एका युजरने म्हटलंय लग्नाला जायचं असो की स्काय डायव्हिंग करायचं असो, काही तरुणींसाठी मेकअप महत्त्वाचा आहे. तर एका महिलेने म्हटलं, आमच्या मुलींसाठी मेकअप आधी बाकीची कामं नंतर. आकाशात उडणाऱ्या विमानातून उडी मारणं आणि पॅराशूटच्या मदतीने सुरक्षितपणे जमिनीवर उतरणं याला स्काय डायव्हिंग म्हणतात. स्काय डायव्हिंग हा साहसी प्रकार आहे. दरवर्षी लाखो लोकं स्काय डायव्हिंगचा आनंद लुटतात. पण, स्काय डायव्हिंग हा केवळ साहसी प्रकारच नाही, तर अनेक जण यात आपलं व्यावसायिक करिअरही करतात.

## पार्किंगमध्ये कार शोधण्याला पूर्णविराम!

आधुनिक काळात अनेक सुखसुविधा निर्माण झालेल्या आहेत; पण त्यांच्या जोडीने काही छोट्याशा वाटणाऱ्या पण वैताग आणणाऱ्या कटकटीही आहेत. उदा. मोबाईल फोन ही सुविधा आणि चार्जिंगची कटकट! या यादीतील एक ठळक उदाहरण म्हणजे कारची सुविधा आणि पार्किंगची कटकट. तुमच्यापैकी असे अनेक जण असतील जे पार्किंगमध्ये कार कुठे उभी केली, हे विसरतात. पीलर नंबर लगेच आठवत नाही. अशावेळी पूर्ण पार्किंगभर कार शोधत बसावे लागते. विशेषतः मॉल, विमानतळ आणि इतर सार्वजनिक कार पार्किंगच्या ठिकाणी अशी परिस्थिती ओढावते. त्यामुळे काम राहिले बाजूला; पण कार शोधण्यातच बराच वेळ जातो. अशाने खूप चिडचिड होते. पण, आता काळजी करू नका? कारण कारमध्ये भविष्यात एक असं फीचर पाहायला मिळणार आहे, ज्याने पार्किंगमधील तुमची कार काही क्षणात तुमच्या समोर येऊन उभी राहील. विश्वास बसत नसेल, तर टेस्ला कंपनीचे मालक एलन मस्क यांनी पोस्ट केलेला व्हिडीओ एकदा पाहा. यात पार्किंगमधील कार कशापद्धतीने




चालकासमोर जाऊन उभी राहते, हे दाखवण्यात आले आहे.

एलन मस्क यांची इलेक्ट्रिक कार कंपनी टेस्ला आपल्या वाहनांमध्ये एक नवीन फीचर जोडणार आहे, ज्यामध्ये ऑटोमॅटिक ड्रायव्हिंग टेक्नॉलॉजीच्या मदतीने कार आपोआप मालकापर्यंत पोहोचेल. कंपनीचे सीईओ एलन मस्क यांनी त्यांच्या एक्स अकाऊंटवर एका व्हिडीओद्वारे उदाहरण देऊन याची घोषणा केली आहे. ऑटोमॅटिक ड्रायव्हिंग तंत्रज्ञानावर काम करणाऱ्या मस्क यांनी त्यांच्या पोस्टमध्ये सांगितले की, ते टेस्ला वाहनांमध्ये एका नवीन फीचरवर काम करत आहेत, ज्यामध्ये ॲक्च्युअली स्मार्ट समन फीचरच्या मदतीने टेस्ला कार तुम्हाला कॉम्प्लेक्स पार्किंगमध्येही आपोआप शोधून काढेल. म्हणजेच, जर तुम्हाला पार्किंगमध्ये उभी असलेली तुमची कार शोधण्यात अडचण येत असेल, तर हे नवे तंत्रज्ञान फक्त तुमच्यासाठी आहे. त्यांनी पुढे लिहिले की, स्मार्ट समन फीचरसह टेस्ला कार आता कॉम्प्लेक्स पार्किंग लॉटमधून स्वतःच आपल्या कारचा मालक शोधेल. या फीचर अंतर्गत टेस्ला कार पार्किंग एरियाच्या ३९ फूट आत किंवा बाहेर जाऊ शकणार आहे. पर्सनल ड्राईव्ह आणि पार्किंग एरिया अशा ओळखीच्या आणि अंदाज लावता येण्याजोग्या क्षेत्रांसाठी हे खास फीचर डिझाईन केले आहे. एलन मस्क यांनी ड्रायव्हर एआयच्या एका पोस्टवरील उत्तरात स्मार्ट समन शी संबंधित ही पोस्ट शेअर केली आहे.

## महाकाय बाह्यग्रह

आपल्या सौरमालिकेबाहेरील हजारो ग्रहांचा आतापर्यंत शोध लावण्यात आलेला आहे. त्यापैकी काही बाह्यग्रह अतिशय वैशिष्ट्यपूर्णही आहेत. संशोधकांनी परस्पर टोकाचे ऋतू असलेला अधिक घन व जास्त वस्तुमानाचा एक बाह्यग्रह शोधून काढलेला आहे. या ग्रहावर तेथील हिवाळ्यात ५०० अंश सेल्सिअस तापमान असते ! सेंटर फॉर ॲस्ट्रॉनॉमी ऑफ हायडेलबर्ग युनिव्हर्सिटी या संस्थेचे मॉरिसिओ ओरिटिझ व मॅक्स प्लांक इन्स्टिट्यूट फॉर ॲस्ट्रॉनॉमी या हायडेलबर्ग येथील संस्थेचे सिमोना सिसेरी यांनी सांगितले की, हा ग्रह गुरूपेक्षा वस्तुमानाने सहा पट जास्त आहे व त्याचा आकार मात्र तेवढाच आहे. या ग्रहाच्या कक्षांचा आकार मात्र वेगळा असून, या ग्रहाचे नाव केप्लर ४३२ बी असे असून, तो एका मोठ्या ताऱ्याभोवती फिरत आहे. २० कोटी वर्षांनंतर हा लाल महातारा त्या ग्रहाला गिळण्याची शक्यता आहे.

आतापर्यंत सापडलेले अनेक ग्रह हे त्यांच्या मोठ्या ताऱ्यांभोवती फिरत आहेत व केप्लर ४३२ बी या ग्रहाची कक्षा लंबवर्तुळाकार आहे. त्यामुळे तो इतर ग्रहांपेक्षा वेगळा आहे, असे कोनिंगशूल वेधशाळेचे डॉ. डेव्हिड गैंडोल्फी यांनी सांगितले. ते म्हणाले की, केप्लर ४३२ बी ज्या ताऱ्याभोवती फिरत आहे त्यातील अणुइंधन संपत आले आहे व तो प्रसरण पावत आहे. त्याची त्रिज्या सूर्याच्या चार पट असून, ती आणखी मोठी होण्याची शक्यता आहे. हा तारा लालसर असून, त्याला रेड जायंट असे म्हटले




आहे. विशिष्ट कक्षेमुळे केप्लर ४३२ बी हा ग्रह मातृताऱ्याच्या अगदी जवळ आहे त्यामुळे तेथे तापमानातील फरक प्रचंड आहे. तेथील वर्ष पृथ्वीच्या ५२ दिवसांइतके असून, थंडीत तेथील तापमान ५०० अंश सेल्सिअस असते तर उन्हाळ्यात ते १००० अंश सेल्सियस असते, असे कोर्निंगशूल वेधशाळेचे डॉ. साबिन रेफर्ट यांनी म्हटले आहे.

केप्लर ४३२ बी हा नासाच्या केप्लर सॅटेलाईट मिशनने अधिक्रमण ग्रह ठरवला होता, त्यात तो मातृताऱ्या समोरून जाताना दिसतो व त्यामुळे ताऱ्याचा प्रकाश कमी होतो. दोन्ही संशोधक गटांनी अंदासुसिया, स्पेन येथील कलार अल्टो वेधशाळेतील २.२ मीटरच्या दुर्बिणीने त्याचे निरीक्षण केले आहे. जर्नल ॲस्ट्रॉनॉमी ॲंड ॲस्ट्रोफिजिक्स या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झाले आहे.

## छतावर उभारली कारची प्रतिकृती

पश्चिम बंगालच्या मुर्शिदाबाद जिल्ह्यातील समशेरगंजमधील हाजी रबीउल शेख यांनी त्यांच्या तीन मजली घराच्या छतावर कारची प्रतिकृती तयार केली आहे. ही लाल रंगाची कार पहिल्यांदा दुरून पाहिल्यास खरी कार असल्याचा भास होतो. मात्र, ती सिमेंट, वाळू आणि विटांनी बनवलेली आहे. या प्रतिकृतीने नेटिझन्सचे लक्ष वेधून घेतले आहे. ६२ वर्षीय हाजी रबीउल शेख यांनी सांगितले की, ही प्रतिकृती तयार करण्यासाठी २.५ लाख रुपये खर्च झाले.

काकुरिया गावातील असीम नावाच्या गवंडीच्या मदतीने, त्यांनी एक महिना मेहनत घेऊन हे शिल्प तयार




केले. ही कार केवळ देखाव्यासाठी नसून, छतावरून घरात पिण्याचे पाणी पुरवण्याची पाईपलाईन या शिल्पात बसवली आहे. या अनोख्या निर्मितीमुळे गावात येणारे प्रवासी, पादचारी थांबून कारचे कौतुक करतात. काही जण या निर्मितीची थट्टा करतात, तर काहींनी तिच्या कल्पकतेची स्तुती केली आहे.

## सर्वात सुंदर महिलांचा देश

वर्ल्ड पॉप्युलेशन रिव्ह्यूनुसार कोणत्या देशात महिला कुठे जास्त सुंदर आहेत, याचा तपशील बी स्कॉलरली या अहवालातून जाहीर केला गेला असून, या यादीत तुर्कीला प्रथम पसंती देण्यात आली आहे. ब्राझीलचे नाव या यादीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. जगातील बहुतेक सुपरमॉडेल्स ब्राझीलमधून येतात. याबाबतीत फ्रान्स तिसऱ्या क्रमांकावर आहे. येथील महिला त्यांच्या सौंदर्यासोबतच



फॅशन सेन्स साठीही ओळखल्या जातात. या यादीत रशियाचे नाव चौथ्या क्रमांकावर आहे. नतालिया वोदियानोवा आणि स्वेतलाना यांच्यासह अनेक अभिनेत्री आणि मॉडेल्सनी आपले सौंदर्य सिद्ध केले आहे. भारतीय महिला सहाव्या क्रमांकावर आहेत. ऐश्वर्या राय बच्चन, सुष्मिता सेन आणि प्रियांका चोप्रा यांच्यासह अनेक अभिनेत्री यात आघाडीवर आहेत.

## प्रयोग वायरलेस वीजवहनाचा

विद्युतपुरवठ्यासाठी तारांचा वापर केला जातो, हे आपल्याला माहिती आहेच. मात्र, बिनतारी वीजवहनही होऊ शकते, हे तुम्हाला माहिती आहे का? तसा एक प्रयोग जपानमध्ये यशस्वी करण्यात आला होता. सूक्ष्मलहरींच्या साहाय्याने अचूक लक्ष्यापर्यंत बिनतारी वीजवहन करण्यात जपानमधील एका संशोधकाला यश आले होते. त्यामुळे भविष्यात अणू, औष्णिक तसेच जलविद्युत प्रकल्पांइतकीच पुरेशी वीज तयार करता येईल, अशी अपेक्षा संशोधकांनी व्यक्त केली होती.



५५ मीटर लांब अंतरावरील वीजसंचात सूक्ष्मलहरींच्या मदतीने १.८ किलोवॅट इतक्या क्षमतेचे वीजवहन अगदी अचूक पद्धतीने करण्यात संशोधकांना यश आले. सूक्ष्मलहरींचे थेट वीजप्रवाहात रूपांतर करण्यात आले. पश्चिम जपानमधील ह्योगो येथे हा प्रयोग झाला. उच्च क्षमतेच्या सूक्ष्म लहरींना तारांचा वापर न करता त्या छोट्या लक्ष्यापर्यंत पोहोचवण्याचा जगातील हा पहिलाच प्रयोग होता.अवकाशातील संशोधनासाठी सूर्यकिरणांपासून मिळणारी वीज वापरली जाते. यात भूस्थानक कक्षेत सौरऊर्जा एकत्रित करून नंतर तिचे पृथ्वीवरील वीजसंचात वहन केले जाते.

या प्रयोगाने सौरऊर्जा निर्मितीचे स्वप्न सत्यात उतरू शकते, असा विश्वास संशोधकांनी व्यक्त केलेला आहे. पृथ्वीवरील सौरऊर्जा पटलांना काही मर्यादा असतात; परंतु कृत्रिम उपगृहावर आधारित सौरऊर्जा पटलांना हवामान बदलांमुळे कोणतीही अडचण येत नाही. अशी पटले २४ तास वीज संचय करत असतात. हा प्रयोग अंमलात आणायचा झाल्यास पृथ्वीपासून अंदाजे ३५ हजार किलोमीटर अंतरावर वीजसंचय कक्ष बसवून सूक्ष्मलहरींच्या साहाय्याने सौरऊर्जेचे वहन करणे शक्य होईल, अशीही माहिती संशोधकांच्या एका गटाने दिली. याशिवाय उर्जेचीही समस्या सुटण्यास मदत होणार असल्याचे संशोधकांनी सांगितले.

## बुरशीपासून विमानइंधन!



जेट विमानांच्या इंधनाबाबतही वेळोवेळी नवेनवे संशोधन होत असते. त्यामध्ये काही भन्नाट प्रकारही असतात. सडकी फळे, माती व कुजणारी पाने यांच्यावर नेहमी आढळणाऱ्या काळ्या बुरशीपासून जेट विमानाचे इंधन तयार करण्याचा मार्ग अमेरिकी वैज्ञानिकांनी शोधून काढलेला आहे. त्यामुळे विमानांसाठी किफायतशीर इंधन तयार करणे भविष्यात शक्य होणार आहे. अतिशय आश्वासक असे हे संशोधन आहे, असे वॉशिंग्टन स्टेट युनिव्हर्सिटीचे प्राध्यापक बिरगिट एरिंग यांनी सांगितले. बुरशीवर आधारित इंधन हे आगामी काळात उपलब्ध होणार आहे यात शंका नाही व त्यात प्रचंड संधी आहेत. संशोधकांनी ॲस्पिरगिलस काबरेनॅरियस आयटीइएम ५०१० या बुरशीपासून हायड्रोकार्बनची निर्मिती केली आहे. हायड्रोकार्बन हा पेट्रोलियम इंधने व हवाई इंधनांचा प्रमुख घटक असतो. ओटचे पीठ, गव्हाचे कूस व मक्याच्या पिकातील कचरा यावर ही बुरशी वाढते. एरिंग यांच्या गटाने यापूर्वी ॲस्पिरगिलस बुरशीपासून वितंचके तयार केली होती, त्याचबरोबर इतर उपउत्पादने तयार करण्यातही यश आले होते. त्यामुळे त्यांनी आता ए. काबरेनॅरियस आयटीइएम ५०१० या बुरशीपासून जैवइंधन तयार करण्याच्या दिशेने संशोधन सुरू केले. अमेरिकेच्या ऊर्जा खात्याच्या पॅसिफिक नॉर्थवेस्ट नॅशनल लॅबोरेटरीत त्यांनी ए. काबरेनॅरियस या बुरशीतही जनुकीय बदल घडवून आणले होते. संशोधनानुसार बुरशी जीवाणूंचा हल्ला झाल्यानंतर त्यांच्याशी मुकाबला करण्याच्या उद्देशाने हायड्रोकार्बनची निर्मिती करते. शैवाल व काही जीवाणूंमध्ये जनुकीय संकेतांकनाचा वापर करून अधिक हायड्रोकार्बन निर्मितीचा वैज्ञानिकांचा प्रयत्न आहे. 'फंगल बायॉलॉजी' या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झालेले आहे.

## शास्त्रीय संगीत मेंदूस्नेही



संगीत ही केवळ एक कला नाही. त्यामध्ये त्यापेक्षाही अधिक काही तरी निश्चितच आहे. आपल्याकडे नादब्रह्म ही संकल्पना आहे. सृष्टीचा प्रारंभच ओंकार नामक नाद शब्दाने झाला, असे आपल्याकडे मानले जाते. भारतीय अभिजात संगीताचा उगमच सामवेदातून झालेला आहे. अलीकडच्या काळात संगीतकलेकडे एक थेरपी म्हणूनही पाहिले जाते. भारतातील असो किंवा परदेशातील, मनाला सुखावणारे अभिजात किंवा शास्त्रीय संगीत आरोग्यासाठी उपयुक्त ठरते.

दररोज वीस मिनिटे मोझार्टचे संगीत श्रवण केल्यास मेंदूचे कार्य सुधारते, अध्ययन व स्मृती यांच्यात चांगला फरक दिसून येतो, असे एका संशोधनात दिसून आले होते. शास्त्रीय संगीताने मेंदूतील डोपॅमाईन हे रसायन स्रवण्यास ज्या जनुकांची मदत होत असते त्यांचे कार्य सुधारते तसेच त्याचे वहन व्यवस्थित होते. मेंदूतील जे संदेशवहन न्यूरॉन्सच्या सिनॅप्ससिस सर्किट मार्फत चालू असते, त्यामुळे अध्ययन सुधारते व स्मृती वाढते तसेच मेंदूचा ऱ्हास करणाऱ्या जनुकांना लगाम बसतो. संगीत अध्ययनाशी संबंधित काही जनुके असतात, त्याचबरोबर काही पक्षी गोड गातात. त्यांच्यातही ही किमया जनुकांनी साधलेली असते. त्यांच्या अनेक प्रजातीत संगीत आकलनाची प्रक्रिया उत्क्रांत होताना दिसते, संगीत आकलन हे मेंदूचे सर्वात अवघड कार्य असते व ते न्यूरॉन्समधील व शारीरिक बदलांमुळे शक्य होत असते. असे असले तरी संगीताचा मानवी मेंदूवर होणारा परिणाम तपासण्यात आला नव्हता. शास्त्रीय संगीताने जनुकांचे आविष्करण सुधारते, जे संगीत जाणतात किंवा जाणत नाहीत तरी ऐकतात त्यांनाही त्याचा सारखाच फायदा होतो. डब्ल्यू.ए. मोझार्टच्या व्हायोलिन संगीत मैफली एनआर ३, जी मेजर, के २१६ या वीस मिनिटांच्या आहेत; पण त्या ऐकल्याने डोपॅमाईनचे स्रवण वाढते. स्मृती वाढते तसेच मेंदूतील सिनेप्सिस नावाची न्यूरॉन सर्किटस (मंडले) चांगली काम करतात.

पार्किन्सन आजार ज्यांना असतो त्यांच्यात सायन्युक्लेन अल्फा नावाचे जनुक महत्त्वाची भूमिका पार पाडते, ते मेंदूच्या एका विशिष्ट जोडणीच्या भागात असते. त्याच्या अतिक्रियाशीलतेने व उत्परिवर्तनाने हा रोग होतो; पण या जनुकामुळेच पक्षी संगीताचे आकलन करून घेऊ शकतात व संगीताच्या आकलनाशी त्यांचा जवळून संबंध आहे.

## आठ महिन्यांत बलात्काराच्या १६३ घटना

# महिला सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** बलात्काराच्या घटनांनी राज्यात चिंतेचे वातावरण असतानाच पिंपरी-चिंचवडमध्ये ओळखीचे लोक, नातेवाईक, मित्र या लोकांकडून महिलांच्या असहायेचा फायदा घेत बलात्कार केल्याच्या घटना घडत आहेत. जानेवारी ते ऑगस्ट २०२४ या आठ महिन्यांच्या कालावधीत बलात्काराचे १६३ गुन्हे दाखल झाले आहेत. दरम्यान, पोलिसांनी या सर्व गुन्ह्यांतील आरोपींना अटक करत गुन्ह्यांची उकल केली आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील वाढलेली गुन्हेगारी कमी करण्यासाठी शहरात २०१८ मध्ये पोलिस आयुक्तालयाची स्थापना करण्यात आली. गुन्हेगारी टोळ्यांना संपविण्यासाठी पोलीस आयुक्तांनी शेकडो टोळ्यांवर मकोका कारवाई केली. त्यामुळे शहरातील टोळ्यांही संपत चालल्या आहेत.

एकीकडे या प्रकारची गुन्हेगारी कमी होत असली तरी, अद्यापही शहरातील महिलांच्या सुरक्षीततेचा प्रश्न तसाच आहे. ओळखीचे लोक, नातेवाईक, मित्र, प्रियकर यांच्याकडून महिलांवर अत्याचार केल्याच्या घटना घडत आहेत. शहरात आयुक्तालयाच्या स्थापनेनंतर घरफोडी, वाहन चोरी, हाणामरी, दरोडा, खून अशा अनेक प्रकारच्या गुन्हांना आळा बसला. गुन्ह्यांची संख्या कमी झाली. मात्र, लग्नाच्या अमिषाने, प्रेमाच्या जाळ्यात ओढून तसेच ब्लॅकमेल करून महिलांवर बलात्कार केले जात आहेत. गेल्या आठ महिन्यांत या प्रकारच्या १६३ घटना घडल्या आहे. पोलिसांनी या सर्व गुन्ह्यांतील आरोपींना अटक केली आहे.

● **तांत्रिक गुन्हे**

पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत घडणाऱ्या बलात्काराच्या गुन्ह्यांतील ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुन्हे हे तांत्रिक आहेत. काही वर्षांपूर्वी केलेला बलात्कार, प्रेम संबंध होते; कालांतराने लग्नास नकार दिला. प्रियकराबरोबर पळून गेल्यानंतर घरच्यांनी सांगितले म्हणून दाखल झालेला गुन्हा. अशा प्रकारच्या गुन्ह्यांना तांत्रिक गुन्हे म्हणतात. शहरात सध्या या गुन्ह्यांचे प्रमाण जास्त आहे.

● **हिंजवडी-म्हाळूंगेतील घटनेने शहर हादरले**

शहरातील म्हाळूंगे परिसरातील एका उच्चभ्रू सोसायटीतील ८५ वर्षीय महिलेवर इलेक्ट्रिशनचे काम करणाऱ्या २३ वर्षीय तरुणाने बलात्कार केला. आरोपीने या वृद्ध महिलेला तीच्या फ्लॅट समोरून ओढून नेत तीचे तोंड दाबून आणि मारहाण करत तीच्यावर बलात्कार केला. या घटनेने संपूर्ण शहर हादरले होते.



**बलात्काराच्या गुन्ह्यांची आकडेवारी**

● जानेवारी ते ऑगस्ट २०२४
एकूण बलात्कार १६३
गुन्ह्यांची उकल १६३

● जानेवारी ते डिसेंबर २०२३
एकूण बलात्कार २५४
गुन्ह्यांची उकल २५४

● जानेवारी ते डिसेंबर २०२२
एकूण बलात्कार २४३
गुन्ह्यांची उकल २४१

● जानेवारी ते डिसेंबर २०२१
एकूण बलात्कार १७१
गुन्ह्यांची उकल १७०

## खाऊ गल्लीचा मुहूर्त लांबणीवर



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने इंदूर शहराच्या धर्तीवर आकुर्डी रेल्वे स्टेशनसमोरील मोकळ्या जागेत प्रशस्त अशी खाऊ गल्ली (फुड मॉल) सुरू केली आहे. ही खाऊ गल्ली बांधून तयार झाली आहे. मात्र तेथील टपऱ्या भाडेतत्त्वावर देण्यास महापालिका प्रशासनाकडून चालढकल केली जात आहे. त्यामुळे खाऊ गल्लीस मुहूर्त कधी लागणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. इंदूर शहराच्या धर्तीवर तत्कालीन आयुक्त राजेश पाटील यांनी खाऊ गल्लीची संकल्पना आणली. आकुर्डी रेल्वे स्टेशनच्या मोकळ्या जागेत महापालिकेने पहिली खाऊ गल्ली बांधली आहे. त्यासाठी ३ कोटी ७० लाख २३ हजार ६०३ रुपये खर्च करण्यात आला आहे. तेथे एकूण ४९ गाळे आहेत. त्याचा आकार १९० चौरस फूट आहे. खाऊगल्लीची निविदा डिसेंबर २०२२ मध्ये काढण्यात आली. त्याचे काम दीड वर्षानंतर पूर्ण झाले आहे. बांधकाम तसेच विद्युत विभागाने काम पूर्ण झाल्याचे भूमि आणि जिंदगी विभागास मार्च २०२४ मध्ये कळविले आहे. हे गाळे भाडे तत्त्वावर द्यावयाचे आहेत. त्याचा प्रस्ताव आयुक्तांसमोर ठेवण्यात आला आहे. त्यांची मान्यता मिळालानंतर ते गाळे भाडे तत्त्वावर देण्यात येणार आहेत; मात्र त्या कामकाजासाठी चालढकल केली जात असल्याने तयार झालेले गाळे धूळखात पडून आहेत. महापालिकेने बांधलेल्या गाळ्यांची सोडत कधी काढली जाणार आहे. सोडत लॉटरी पद्धतीने होणार की गाळे भाडेतत्त्वावर देण्यात येणार, अशी विचारणा नागरिक, सामाजिक कार्यकर्ते व माजी नगरसेवकांकडून केली जात आहे. त्याबाबत भूमि आणि जिंदगी विभागाकडे विचारण केली जात आहे.

## » Selected



दापोडी येथील काटे वृंदावन सोसायटी मधील उत्साही महिला वर्गाने रविवारी केशरी रंगाची साडी परिधान करून नवरात्रोत्सव साजरा केला.

## व्हीपीएसमध्ये रंगला महाभोंडला



**पिंपरी :** विद्या प्रसारिणी सभेच्या व्हीपीएस हायस्कूलमध्ये नवरात्रोत्सवानिमित्त विद्यार्थिनींसाठी महाभोंडल्याचे आयोजन करण्यात आले. प्राथमिक व माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला.

प्राचार्य उदय महिंद्रकर, उपमुख्याध्यापक सुहास विसाळ, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मंगल जाधव, पर्यवेक्षक विजय रसाळ, श्रीनिवास गजेंद्रगडकर, पर्यवेक्षिका क्षमा देशपांडे, शिक्षक प्रतिनिधी ज्योती डामसे, शिक्षकेतर प्रतिनिधी संजीवनी आंबेकर आदींच्या उपस्थितीत गजाच्या चित्राची पूजा करत महाभोंडल्याची सुरुवात झाली. महाभोंडल्यानिमित्त कलाशिक्षक विक्रम शिंदे यांनी गजाचे सुंदर चित्र काढले. सांस्कृतिक विभाग प्रमुख धनंजय काळे, योगेश कोठावदे, संजय पालवे, वैभव सूर्यवंशी, जयवंत सिसोदे, संकेत कवडे, श्रीकांत म्हसकर, आदींनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

## मावळमधील शाळेत मतदार जनजागृती

**मावळ :** मावळ तालुका तहसील कार्यालय महसूल विभाग यांच्यावतीने सोमाटणे येथील तुळजा भवानी विद्यालयात मतदार जनजागृती या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उपक्रमाची सुरवात

प्रभातफेरी काढून करण्यात आली. यावेळी मुलांनी मतदार जनजागृती संबंधित पोस्टर तयार करून लोकांचे लक्ष आकर्षित केले. नवनवीन घोषणा तयार करून, मतदान करणे ही आपली जबाबदारी आहे आणि ती प्रत्येक मतदार नागरिकाने प्रामाणिकपणे पार पाडली पाहिजे, असे यात लिहिले होते.

मतदार जागृती संबंधित चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आयोजित करून घराघरांमध्ये मतदान जागृती करण्यात आली. यावेळी तलाठी अभिषेक शेलार, सुबोध शिंदे, राजू आगळे, तुळजाभवानी विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र गिरीगोसावी, सुरेश सुतार, कौमूद खुडे, सुरेश घारे, वैशाली केंगले आदी उपस्थित होते.

## आर.आर.आर. केंद्राचे उद्घाटन

**पिंपरी :** महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त महापालिकेच्या वतीने सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये 'स्वभाव स्वच्छता-संस्कार स्वच्छता' हे अभियान राबून स्वच्छता मोहीम आयोजित करण्यात आली. तसेच यावेळी 'ड' क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत पिंपळे गुरव येथील लिनिअर गार्डन येथे उभारण्यात आलेल्या आर.आर.आर केंद्राचे उद्घाटनही करण्यात आले.

आर.आर.आर केंद्राअंतर्गत नागरिकांनी ज्या निरूपयोगी वस्तू जमा केल्या आहेत, त्या वस्तू गरजूंना देण्यात येतील. वस्तूंना रिसायकल, रियूज, रिड्युस करण्यासाठी म्हणजेच आपल्याकडील वस्तूंच्या पुन:वापरासाठी या केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. नागरिकांनीही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शवून आपल्याकडील जुने कपडे, खेळणी, भांडी, बूट, चप्पल, पर्स, बॅग्स, इलेक्ट्रॉनिक वस्तू, पुस्तके इ. निरूपयोगी वस्तू आरआरआर केंद्रावर जमा करण्याचे आवाहन यावेळी महापालिकेच्या वतीने करण्यात आले.

## रोडरोमिओंच्या त्रासाला कंटाळून मुलीची आत्महत्या

**पिंपरी :** रोडरोमिओंच्या त्रासाला कंटाळून एका १२ वर्षीय मुलीने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही धक्कादायक घटना भोसरी ६ जून रोजी घडली. वडिलांनि दिलेल्या तक्रारीनंतर दोन जणांना अटक करण्यात आली आहे. क्षितीज लक्ष्मण पराड (वय २०, रा. भोसरी) आणि तेजस पांडूरंग पठारे (वय १९, रा. चऱ्होली) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत मयत मुलीच्या वडिलांनी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांच्या १२ वर्षीय मुलीने ६ जून रोजी सकाळी साडेसात वाजताच्या सुमारास राहत्या घरामध्ये दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. फिर्यादी यांनी आसपासच्या सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली.

तसेच मुलीच्या खिशात मिळालेल्या मोबाइल नंबर यावरून आरोपी पराड आणि पठारे यांनी तिचा वारंवार पाठलाग केला. तसेच तिचा लैंगिक छळ केल्याने तिने आत्महत्या केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. भोसरी पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेत.

**राष्ट्रसंचार वाहतूक कोंडी रा**

## निगडी ते पिंपरी चालकांचा प्रवास 'कोंडीत'

**पिंपरी :** निगडी ते पिंपरी या मार्गावर मेट्रोचे काम सुरू असून यासाठी ठिकठिकाणी बॅरिकेड्स उभारले आहेत. त्यामुळे हा रस्ता अरुंद झाला आहे. अशातच यामार्गावर अनेक वाहन चालक बेशिस्तरित्या वाहने उभी करतात. यातून मार्ग काढताना वाहन चालकांना कसरत करावी लागत आहे.

जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर वाहनांची वर्दळ असते. निगडीपासून पुण्यापर्यंतच्या मार्गावर वाहनांची संख्या आणखी वाढते. अशातच निगडी ते पिंपरी या मार्गावर मेट्रोचे काम सुरु असल्याने रस्ता अरुंद झाला आहे. त्यामुळे मुख्य रस्त्यासह सेवा रस्त्यावरही वाहनांची गर्दी होते. दरम्यान, या रस्त्यावर बेशिस्तरित्या वाहने उभी केल्यास वाहतूक कोंडीमध्ये भर पडते. निगडीतील भक्ती-शक्ती चौक परिसर, दिवंगत मधुकरराव पवळे उड्डाणपूल परिसर, बजाज गेट समोर, खंडोबा माळ चौक परिसर, काळभोरनगर भुयारी मार्ग या भागातील रस्त्यावर वाहनांच्या रांगा लागलेल्या असतात. तसेच, प्रवासी घेण्यासाठी बॅरीकेड्सला लागूनच रिक्षाही उभ्या केलेल्या असतात. सेवा रस्त्यावरून जाणाऱ्या इतर वाहनांना रस्ता शिल्लक राहत नसल्याने वाहतूक कोंडी होते. त्यामुळे बेशिस्त नागरिकांवर कारवाई करण्याची मागणी होता आहे.

निगडी ते पिंपरी या मार्गावर मेट्रोचे काम सुरु असल्याने बॅरिकेड्स उभारलेले आहेत. यामुळे रस्ता काहीसा अरुंद झाला आहे. दरम्यान, या मार्गावर इतर वाहने उभी राहिल्यास वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. अशाप्रकारे बेशिस्तरित्या रस्त्यावर उभ्या असलेल्या वाहनांवर सतत कारवाई केली जात आहे. वाहन चालकांनी शिस्त पाळणे आवश्यक असल्याचे मत नागरिक करत आहेत.



## पासिंग आउट...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा




**पिंपरी :** राजर्षी शाहू (स्वायत्त) अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या २०२४ साली उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ पार पडला

### राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयाचा निरोप समारंभ संपन्न

# कौशल्याचा विकास करा- कुलपती डॉ धांडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** आज समाजात सर्वजनशिलता (क्रिएटीव्हीटी) लोप पावत चालली आहे. आयुष्यात तुमचे स्वतःचे असे कौशल्य आत्मसात करून त्याला विकसित करा. त्याचा सातत्याने सराव करा,त्यात तुम्ही प्रगती साधाल. असा विश्वास उज्जैन येथील अवंतिका विद्यापीठाचे कुलपती तथा आयआयटी कानपुरचे माजी संचालक पद्मश्री डॉ संजय धांडे यांनी व्यक्त केला . ताथवडे येथील राजर्षी शाहू (स्वायत्त) अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या २०२४ साली उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ (पासिंग आऊट) निगडीतील गदीमा नाट्यगृहात संपन्न झाला. यावेळी ते बोलत होते. यावेळी नॉर ब्रेम्से टेक्नॉलॉजी सेंटर इंडिया कंपनीच्या मनुष्यबळ आणि प्रशासन विभागाचे संचालक नीरजकुमार गुप्ता, संचालक प्रा. सुधीर भिलारे, जेएसपीएम विद्यापीठाचे अध्यक्ष् डॉ. रवी जोशी, जेएसपीएमचे संचालक अनिल भोसले, संचालक जेएसपीएम, कॅम्पचे पितामह पी.पी विटकर,संचालक डॉ संतोष भोसले, उपप्राचार्य डॉ. अविनाश देवस्थळी, ट्रेनिंग प्लेसमेंट ऑफिसर डॉ. संतोष बोर्डे, डॉ.अविनाश बडधे व सर्व प्राध्यापक वर्ग उपस्थित होते . या कार्यक्रमामध्ये महाविद्यालायातून २०२४ साली उत्तीर्ण झालेल्या सर्व पदवी व पदव्युत्तर विध्यार्थ्यांचा विशेष मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी अनिकेत कुमार याला सर्वोत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार म्हणून एक लाख रुपये रकमेचा तर योगिता लामा हिला बेस्ट आउटगोइंग स्टुडंट्स हा पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. तसेच यावेळी पूर्वा जमदाडे, ऋतुजा ननावरे, प्रिया शेळके, योगेश डोंगरे, गणेश बडेकर, नेहा मोहिते, सपना निकम, सिद्धांत पायगुडे, ऋतुजा भोसले, ऋषिकेश परगडे, आकांक्षा लबडे, निरूपमा... जानवी पाटील, अजित निकम, अर्पिता आलने, नेहा फडतरे या टॉपर विद्यार्थ्यांना सुवर्णपदक देवून सन्मानित केले.

### आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार

# घरकुल समस्या सोडवण्यासाठी 'फास्ट ट्रॅक'वर उपाययोजना!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** चिखली घरकूल येथील पायाभूत सोयी-सुविधा आणि समस्यांबाबत 'फास्ट ट्रॅक' वर उपाययोजना करण्यात येतील, असे आश्वासन महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिले आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, राज्य शासन आणि केंद्र शासनाने आर्थिक दुर्बल घटकांतील नागरिकांना घर मिळावे. या उद्देशाने २००८ मध्ये 'जेएनएनयुआरएम' अंतर्गत चिखली से. १७/१९ नेवाळे वस्ती या ठिकाणी ६ हजार ७२० घरांची निर्मिती करण्याची योजना आणली आहे. २०१४ मध्ये या प्रकल्पातील लाभार्थींना घरांचे वाटप करण्यात आले. मात्र, प्रकल्पाच्या 'डिझाईन'प्रमाणे सोयी-सुविधा विकसित झालेल्या नाहीत. त्यामुळे घरकुलच्या रहिवाशांना नाहक त्रास सहन करावा लागतो आहे.

या पार्श्वभूमीवर भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी, घरकुलमधील प्रतिनिधी यांची एकत्रित बैठक घेण्यात आली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते निलेश नेवाळे, घरकुल फेडरेशनचे अध्यक्ष सुधाकर धुरी, उपोषणकर्ते अशोक मगर यासह सामाजिक कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, चिखली घरकुल प्रकल्पाची निर्मिती करताना तेथील भौगोलिक स्थिती आणि भविष्यात वाढणारी लोकसंख्या आणि परिसराचा विकास याचा विचार करुन प्रकल्प उभारला नाही. त्यामुळे मुख्य रस्त्यापेक्षा सखल भागात प्रकल्प उभारला आहे.



> चिखली घरकूलमधील पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्यासाठी आणि प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रशासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा करीत आहोत. प्रकल्पाला तांत्रिक व भौगोलिक अडचणींमुळे काही समस्या वर्षानुवर्षे रखडलेल्या आहेत. आज घरकूल येथील शिष्टमंडळासोबत आयुक्त व प्रशासकीय अधिकारी यांच्यासोबत सविस्तर चर्चा केली. तसेच, घरकुलच्या समस्या कालबद्ध नियोजन करून मार्गी लावण्याबाबत सूचना केली आहे. घरकुलमधील सर्वसामान्य नागरिकांना सक्षमपणे सोयी-सुविधा देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.
> - **महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

## हिंदू स्वाभिमान प्रतिष्ठानचे समाजभूषण पुरस्कार प्रदान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** हिंदू स्वाभिमान प्रतिष्ठानच्यावतीने देण्यात येणारा एकनाथ नाणेकर स्मृती समाजभूषण पुरस्कार शिवशंभो विचार मंचचे प्रांत संयोजक शिरीष महाराज मोरे देण्यात आला. तर संजय आर्य स्मृती समाजभूषण पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार सातुर्डेकर यांना प्रदान करण्यात आला. हिंदू स्वाभिमान प्रतिष्ठानच्यावतीने नवरात्रोत्सव व विजयादशमीनिमित्त रविवारी (ता. ६) सायंकाळी पाच वाजता हिंदू शौर्य दिन-विराट हिंदू मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात पुरस्कार वितरण करण्यात आले. या कार्यक्रमात सर्वोच्च न्यायालयाचे वकील अ‍ॅड. अश्विनी कुमार उपाध्याय यांचे 'एक भारत-श्रेष्ठ भारत' या विषयावर प्रबोधन पर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गप्पाष्टककार डॉ. संजय उपाध्ये, हिंदू स्वाभिमान प्रतिष्ठानचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल आदी उपस्थित राहणार आहेत. राजाभाऊ गोलांडे, कैलास बारणे, दत्तात्रेय सूर्यवंशी, अतुल आचार्य, बोरसे, शिवाजी रेड्डी उपस्थित होते.

### शहरात १३४ ज्येष्ठ नागरिक संघ कार्यरत

# महापालिका उभारणार ज्येष्ठ नागरिक भवन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने शहरात ज्येष्ठ नागरिक भवन उभारणार असून विविध सोयी सुविधांनी युक्त असे भवन हे ज्येष्ठ नागरिकांसाठी त्यांच्या हक्काचे व्यासपीठ ठरणार आहे.

महापालिकेच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या जेष्ठ नागरिक भवनामध्ये त्यांच्यासाठी भव्य ऑडिटोरियम, सुसज्ज पार्किंग सुविधा, हॉल, ज्येष्ठ नागरिक संघासाठी स्वतंत्र कार्यालय, अशा अनेक सोयीसुविधा या भवनामध्ये नागरिकांसाठी उभारण्यात येणार आहेत. तसेच विविध योजना, उपक्रम, कार्यक्रम आणि जेष्ठ नागरिकांच्या दृष्टीने आवश्यक सर्व पायाभूत सोयीसुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, अशी माहिती महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.





जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृह येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते.

**शहरात १३४ ज्येष्ठ नागरिक संघ कार्यरत**

● शहरातील ज्येष्ठ नागरिकांसाठी १३४ ज्येष्ठ नागरिक महासंघ कार्यरत असून ज्येष्ठ नागरिक संघांना दरवर्षी समाज विकास विभागामार्फत भेटवस्तू देण्यात येतात. सन २०२२-२३ यावर्षी ११६ ज्येष्ठ नागरिक संघाना एलईडी टीव्ही देण्यात आले होते. तर सन २०२३-२४ यावर्षी १०२ ज्येष्ठ नागरिक संघांना साऊंड सिस्टिम व २६ ज्येष्ठ नागरिक संघांना प्रत्येकी १ टेबल व ५० खुर्च्या देण्यात आलेल्या होत्या.

#रा

## विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी गुंतवणूक

# पालिकेच्या शाळेत मिळणार इंग्रजीतून शिक्षण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने फुगेवाडी येथे उभारण्यात आलेली ही माध्यमिक इंग्रजी शाळा केवळ एक इमारत नसून विद्यार्थ्यांसाठी एक आशेचा किरण आहे. महापालिका शाळांमध्ये एक सकारात्मक बदल घडवून आणण्याचा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आणखी बळ देण्यासाठी आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी केलेली ही गुंतवणूक आहे. भविष्यात या शाळेतील विद्यार्थी शहराचे नाव उंचावतील, असा विश्वास आयुक्त शेखर सिंह यांनी व्यक्त केला.

### २३८ विद्यार्थींना मिळणार इंग्रजीचे शिक्षण

● चिंचवड महापालिकेच्या लोकमान्य टिळक विद्यामंदिर, फुगेवाडी येथील शाळेच्या नवीन इमारतीमध्ये आयटीच या संस्थेद्वारे इयत्ता ८ वी ते १० वीची इंग्रजी माध्यमिक शाळा सुरु करण्यात आली आहे. शाळा चालण्यासाठी आयटीच संस्थेला महापालिकेच्या वतीने आवश्यक वर्ग खोल्या, भौतिक सुविधा तसेच वीज व पाणी पुरवठा अशा सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या गेल्या आहेत.

● फुगेवाडी येथे नव्याने सुरु करण्यात आलेल्या ही इंग्रजी शाळा चालवण्याची पूर्ण जबाबदारी ही संस्था घेणार आहे. त्यामध्ये शाळेचे रोजचे संचलन, शाळा मुख्यध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी निवड, शिक्षक प्रशिक्षण, शिक्षण पध्दती, प्रगती मूल्यमापन इत्यादी सर्व कार्य व यासाठी आवश्यक खर्च आयटीच संस्था देणगीदार संस्थांमार्फत करणार आहे. आयटीच संचलित शाळेमध्ये एस.एस.सी. अभ्यासक्रम शिकवला जाणार असून केवळ महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांनाच येथे प्रवेश घेता येणार असून एकूण २३८ विद्यार्थी येथे शिक्षण घेत आहेत.



### 'ब्लेंडेड लर्निंग लॅब'ची सुविधा

● शाळेमध्ये ब्लेंडेड लर्निंग लॅबची सुविधा आहे. विद्यार्थ्यांमध्ये असलेले शैक्षणिक अंतर भरून काढण्यासाठी या लॅबचा उपयोग केला जात आहे. शिक्षक मुलांना वर्गात एकाच पातळीचे शिक्षण देऊ शकतात. काही विद्यार्थ्यांना ते सोपे वाटू शकते किंवा काहींना ते अवघड वाटू शकते. यामुळे काही विद्यार्थ्यांचा सराव हा कमी पडतो. या लॅबच्या आधारे विविध ॲप व तंत्रज्ञांचा वापर केल्यामुळे विद्यार्थी त्यांना गरज असलेल्या शैक्षणिक पातळीवर शिकू शकतात. विद्यार्थ्यांची प्राथमिक भाषा इंग्रजी नसल्यामुळे किंवा त्यांच्या आस-पास इंग्रजी भाषेचा वापर अतिशय कमी असल्यामुळे त्यांची इंग्रजी भाषा विकसित होण्यास वेळ लागतो. एका शिक्षकाला ते साध्य करणे अवघड असते. लॅबच्या माध्यमातून तंत्रज्ञाच्या वापरामुळे विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी भाषेमध्ये वाचन व ऐकण्याचे आकलन त्वरेने विकसित होण्यास मदत होईल.

महापालिकेच्या वतीने फुगेवाडी येथील लोकमान्य बाळगंगाधर टिळक विद्यामंदिर शाळेच्या नवीन इमारतीमध्ये ८ वी ते १० वी मधील विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी माध्यमाची शाळा उभारण्यात आली आहे. या शाळेचे उद्घाटन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. या उद्घाटन समारंभास अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, उमेश ढाकणे, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, मुख्याध्यापक राहुल अडवानी, आयटीच संस्थेच्या संचालक नेहा वैद्य, सिनियर गव्हरमेंट पार्टनरशिप असोसिएट गितेश शिनगारे, शंकर शिर्के, महेंद्र भोर, बजाज ग्रुप सीएसआर अध्यक्ष कुरूष इराणी तसेच आयटीच संस्थेचे प्रतिनिधी आणि शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते.

आयुक्त शेखर सिंह म्हणाले, महापालिकेच्या सध्या २ इंग्रजी माध्यमांच्या प्राथमिक शाळा कार्यरत आहे. या शाळा शिक्षण विभागामार्फत चालविण्यात येतात. माध्यमिक शाळांची तरतूद नसल्याने इयत्या नववी आणि दहावीच्या शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना खाजगी शाळांचा पर्याय शोधावा लागतो. यामध्ये विद्यार्थ्यां-ची गळती होण्याची शक्यता फार असते. तसेच महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांना खाजगी शाळांच्या वातावरणात रुळायला व त्यांच्या शिक्षण पद्धती आत्मसात करण्यासाठी अनेक अडचणी येऊ शकतात. विद्यार्थ्यांना येणाऱ्या या समस्या दूर करण्यासाठी महापालिकेच्या वतीने सार्वजनिक - खाजगी भागीदारीतून ८ वी ते १० वी मधील विद्यार्थ्यांसाठी फुगेवाडी येथे माध्यमिक शाळा सुरू करण्यात आलेली आहे.

# चिंचवडमध्ये भाजपचाच विजय, बॅनरबाजी चर्चेत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पिंपरी :** विधानसभा निवडणुकीचे बिगुल केव्हाही वाजणार आहे. महायुती आणि महाविकास आघाडीमधून अनेक जण इच्छुक आहेत. चिंचवड मतदारसंघात भाजपचे निष्ठावंत मानले जाणारे माजी नगरसेवक शितल उर्फ विजय शिंदे यांनी मतदार संघात एकनिष्ठ पक्षाचा निर्धार विजयाचा... अशा आशयाचे होर्डिंग लावले आहेत.भाजपचा बालेकिल्ला असणाऱ्या चिंचवडमध्ये भाजपचाच विजय या होर्डिंगवरील वाक्याने खरच पक्षश्रेष्ठी चिंचवडमधून नवीन चेहऱ्याला संधी देणार का ? अशा चर्चा रंगली आहे.

चिंचवड विधानसभा मतदारसंघात भाजपकडून विद्यमान आमदारासह, शहराध्यक्ष, माजी नगरसेवक आणि भाजपमधील विशेषतः राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) यांच्या मुशीत तयार झालेले नेते इच्छुक आहेत.चिंचवड विधानसभा मतदारसंघात २०१४ पासून सलग तीन आमदार निवडून येत अबाधितपणे भाजपचे कमळ फुलले आहे. घराणेशाहीला भाजपच्या अनेक नगरसेवकांनी विरोध केला आहे. दहा ते पंधरा नगरसेवकांचा वेगळा गट तयार होऊन प्रसंगी बंडाच्या पवित्र्यात आहे.

भाजप व आरएसएसकडून चिंचवड विधानसभा मतदारसंघासाठी उमेदवारी देताना नवीन चेहरा देण्याच्या हालचाली सुरू केल्या असल्याचे चर्चांना जोर असताना शितल उर्फ विजय शिंदे यांच्या नव्याने फ्लेक्सबाजीमुळे एकनिष्ठ पक्षनिष्ठ नेतृत्वासाठी काही घडामोडी सुरू आहेत असे दिसते.

चिंचवड विधानभेत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा मोठा प्रभाव आहे. भाजपला मानणारा मतदार मोठ्या प्रमाणावर असल्याने आगामी विधानसभा निवडणुकीत संघाच्या विचाराचा आमदार चिंचवडसाठी हवा आहे अशी चर्चांना जोर धरला आहे. विद्यमान आमदारसह शहराध्यक्ष व अनेक माजी नगरसेवकांनी उमेदवारी मागितली आहे.

# तलाठी कार्यालयासमोर पूरग्रस्तांचे आंदोलन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** शहरातील पूरग्रस्त मदत न मिळाल्याबद्दल आंबेडकर कॉलनी, रमाईनगर, भाटनगर, बौद्धनगर, संजय गांधीनगर, रिव्हर रोड जवळील पूरग्रस्तांना पिंपरीतील तलाठी कार्यालयासमोर आंदोलन केले.

शहरातील पूरग्रस्तांच्या बँक खात्यात तातडीची मदत अद्याप जमा झालेली नाही. सरकारने मदत करण्याचे जाहीर केले होते. या घोषणेनंतर एक महिना उलटून गेला तरी अजूनही पूरग्रस्तांना तातडीची मदत मिळालेली नाही. स्थानिक नेत्यांनी पाहणी केली. मात्र, यातून पूरग्रस्तांच्या हाती काहीच लागले नाही.

शहरात अतिवृष्टीला सुरुवात झाली. कमी कालावधीत पडलेला प्रचंड पाऊस झाल्याने शहरावर महापुराचे संकट आले होते. लोकांच्या घरात पाणी शिरल्याने पूरस्थिती भयावह झाली. शेकडो लोकांचे स्थलांतर करावे लागले. लोकांना पुराचा फटका बसला. इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेकांचे एटीएम कार्ड, पासबुक पुरात वाहून गेले आहेत. सरकारकडून मदतीत होणाऱ्या दिरंगाईबद्दल पूरग्रस्तांकडून प्रचंड नाराजी व्यक्त होत आहे. या आंदोलनात सागर कसबे, पप्पू पवार, पप्पू कांबळे, संकेत वाघमारे, अभि कसबे, भरत मीरपगार आदींनी सहभाग घेतला.

पान १ वरून

## साहित्य संमेलन अध्यक्षपदी डॉ. तारा भवाळकरांची निवड

लोकपरंपरा आणि लोककला विषयांचे लेखन आणि गाढा अभ्यास आहे. लोकसंस्कृती, नाट्यसंशोधन, संतसाहित्य, एकांकिका, ललित लेखन, लोककला आणि स्त्री जाणिवांवर भाष्य करणारे लेखन त्यांनी केले आहे. मराठी विश्वकोश, मराठी वाङ्मयकोश आणि मराठी ग्रंथकोश या महत्त्वाच्या कार्यातही त्यांचे योगदान आहे. संमेलनाध्यक्षाची निवड करण्यासाठी आधी साहित्य महामंडळाने पुण्यात शनिवारी आणि रविवारी महाराष्ट्र साहित्य परिषदेत बैठक घेतली होते. या बैठकीत विविध नावांवर चर्चा करण्यात झाली. त्यात महामंडळाचे पदाधिकारी तसेच साहित्य महामंडळाच्या घटक संस्था, संलग्न संस्था आणि समाविष्ट संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीत तीन दिवसांचे कार्यक्रम, ग्रंथ दालन, ग्रंथ आदी विषयांवर चर्चा झाली. घटक संस्थांकडून साहित्य महामंडळाकडे प्राप्त झालेल्या नावावर चर्चा करून भवाळकर यांची निवड करण्यात आली आहे. आज पत्रकार परिषद घेऊन त्यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे.

## लाडक्या बहिणींसाठी शुभवर्तमान ऑक्टोबर महिन्यातच जमा होणार पैसे

सध्या सणासुदीचा काळ आहे. हीच बाब लक्षात घेऊन राज्य सरकारने ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्याचे पैसे ऑक्टोबर महिन्यातच देण्याचे ठरवले आहे. राज्य सरकारने 'लाडकी बहीण योजने'चे जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर महिन्याचे पैसे महिलांच्या खात्यात वितरीत केले आहेत. आता ऑक्टोबर आणि नोव्हेंबर असे दोन महिन्याचे पैसे 'येत्या आठ दिवसात' लाडक्या बहिणींच्या खात्यात जमा होणार असल्याची माहिती अजित पवार यांनी यावेळी दिली.

## भूमिगत स्थानकांसाठी निविदा

ऑगस्टच्या सुरुवातीला, महाराष्ट्र सरकारने या संपूर्ण भूमिगत मेट्रो मार्गासाठी २,९५४ कोटींच्या सुधारित आर्थिक योजनेला मंजुरी दिली. या मंजुरीमुळे या मेट्रो मार्गाच्या कामाला गती मिळेल, असे पुण्याचे केंद्रीय राज्यमंत्री खासदार मुरलीधर मोहोळ यांनी म्हटले आहे. स्वारगेट ते कात्रज या ५.४६४ किमी अंतरावर गुलटेकडी मार्केट यार्ड, पद्मावती (साईबाबा नगर) आणि कात्रज या तीन स्थानकांचा समावेश असेल. या विस्तारामुळे पद्मावती, गुलटेकडी, मार्केट यार्ड, धनकवडी, बिबवेवाडी, बालाजी नगर, साईनाथ नगर, कात्रज आणि आंबेगाव येथील रहिवाशांना फायदा होणार आहे.

## शिवरायांच्या स्मारकाला विलंब

२०१६ रोजी भाजप - शिवसेना प्रणित महायुती सरकारने अत्यंत भव्यदिव्य कार्यक्रमाचे आयोजन करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अरबी समुद्रात शिवस्मारकाचे जलपूजन केले. स्मारकाच्या कामांस सुरुवात झाल्याचे बोलले गेले. शासनाच्या रेकॉर्डवर या स्मारकासाठी कोट्यवधी रुपये खर्च देखील झाले आहेत. येत्या काही दिवसांत या जलपूजन कार्यक्रमास आठ वर्षे पूर्ण होतील, मात्र अरबी समुद्रातील हे शिवस्मारक अद्यापही कुठे दिसत नाही. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जलपूजन केलेले अरबी समुद्रातील शिवस्मारक शोधायला चला, असे आवाहन संभाजीराजे यांनी केले होते.

## टेकड्यांवर सर्च लाईट बसविण्याचा निर्णय

सामुहिक अत्याचार केला होता. या घटनेमुळे संपूर्ण राज्यात खळबळ उडाली. दोन दिवस अगोदर अशाच प्रकारे तरुणीचे अपहरण करुन तिचा विनयभंग करणाऱ्या प्रकार घडला होता. बाणेर येथील टेकडीवर फिरायला आलेल्यांना लुबाडण्यात आले होते. या सर्व घटना लक्षात घेऊन सर्व टेकड्यांवर सर्च लाईट बसविण्यात येणार आहे.

याबाबत सह पोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांनी सांगितले की, टेकड्यांवर होणाऱ्या चोऱ्या, लुट थांबविण्यासाठी पुण्यातील सर्व टेकड्यांवर सर्च लाईट बसविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जेथे वीजपुरवठा नाही, अशा टेकडीवर पोलीस मदत केंद्र उभारले जाईल. तेथे पोलीस वाहनांना सर्च लाईट देण्यात येईल. ती वाहने अशा टेकडीवर असतील. महापालिकेला सांगून या टेकडीवर वीज पुरवठा करण्यात सांगण्यात येणार आहे. जेथे जेथे अशा घटना झाल्या, त्या टेकडीवर सर्च लाईट उभारले जातील.



# जागतिक सांकेतिक भाषादिन साजरा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** जागतिक सांकेतिक भाषा आणि जागतिक कर्णबधीर दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका दिव्यांग भवन फाऊंडेशनतर्फे आयोजित कार्यक्रमाची सुरुवात दिव्यांग भवन येथे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या जनजागृतीपर पथनाट्याने झाली. त्यानंतर पिंपरी चिंचवड महानगरपालिका भवनापासून दिव्यांग भवन फाऊंडेशनपर्यंत जनजागृती फेरी काढण्यात आली. या फेरीची सुरुवात समाजविकास विभागाचे सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, श्रीनिवास दांगट यांनी झेंडा दाखवून केली. याप्रसंगी सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे यांनी सांकेतिक भाषा शिकणे ही काळाची गरज असून सर्वांनी ती भाषा आत्मसात करावी, असे मत व्यक्त केले.

जनजागृती फेरीत चिंचवड कर्णबधीर विद्यालय निगडी, सी.आर. रंगनाथन महाविद्यालय विश्रांतवाडी, पिंपरी चिंचवड कर्णबधीर असोसिएशन, फीन संघटना महाराष्ट्र यांसारख्या अनेक संस्था आणि दिव्यांग भवनचे कर्मचारी "शब्द जेव्हा मुखातून न येई, सांकेतिक संवादच आधार होई", "हातात हात द्या विशेष मुलांना साथ द्या" असे नारे देत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

चिंचवड कर्णबधीर विद्यालय, निगडीच्या विद्यार्थ्यांनी सांकेतिक भाषेत ईशस्तवन सादर करून कार्यक्रमाचा उत्साह आणखी वाढविला. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. स्वाती सदाकळे यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले आणि कर्णबधिर व्यक्तींच्या हक्कांवर, सांकेतिक भाषेच्या महत्त्वावर प्रकाश टाकला. याप्रसंगी अंबु गिरी, पांडुरंग गर्जे, परशुराम बसवा यांनी मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त केले.

## १७ हजार ५०० घरात डेंग्यूच्या अळ्या

# पिंपरी चिंचवडकरांचे आरोग्य धोक्यात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी-चिंचवड :** शहरात डेंग्यू रुग्णांची संख्या वाढत असून, आतापर्यंत १७८ जणांना डेंग्यूची लागण झाली आहे. चिकुनगुनियाचे ३४ रुग्ण आहेत. शहरातील १७ हजार ५०० घरांमध्ये डेंग्यूच्या अळ्या आढळल्या आहेत. संबंधित घरमालकांकडून तसेच इतर ठिकाणांहून एकूण ७७ लाख ४८ हजारांचा दंड वसूल करण्यात आला आहे.



पिंपरी-चिंचवड शहरात जूनपासून डेंग्यूबाधित रुग्णांची संख्या वाढत आहे. ठिकठिकाणी पाणी साचून डासांची उत्पत्ती होण्यास पोषक वातावरण निर्माण होत आहे. डासांमुळे अनेकांना डेंग्यू, मलेरिया, झिका व चिकुनगुनिया या आजारांची लागण होत आहे. या आजारांच्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून शहरात घरोघरी जाऊन तपासणी करण्यात आली. आतापर्यंत नऊ लाख १० हजार ९९८ घरांची तपासणी करण्यात आली आहे. त्यापैकी १७ हजार ४५६ घरांत डासांच्या अळ्या आढळल्या आहेत.

शहरातील दुकाने, व्यावसायिक ठिकाणे, मोकळ्या जागा अशा ४१ लाख ४५ हजार ८१८ ठिकाणांची तपासणी करण्यात आली आहे. त्यापैकी २२ हजार ३११ ठिकाणी डासांच्या अळ्या आढळल्या आहेत. शहरातील २६४९ वाहन दुरुस्ती, भंगार दुकानांची तपासणी करण्यात आली आहे. २५३६ बांधकाम प्रकल्प तपासण्यात आले. त्यापैकी ३७९१ जणांना नोटीस बजावण्यात आली आहे, तर १७८५ जणांवर दंडात्मक कारवाई केली आहे. त्यातून एकूण ७७ लाख ४८ हजारांचा दंड वसूल करण्यात आला आहे. शहरात डेंग्यू रुग्णांची वाढ होत असल्यामुळे कंटेनर सर्वेक्षणाची मोहीम सुरू आहे. शहरातील बांधकाम प्रकल्प, घरे तपासण्यात येत आहेत. डेंग्यूच्या अळ्या सापडल्या, तर नागरिकांना नोटीस देण्यात येत असून दंडही वसूल केला जात आहे. नागरिकांनी आपल्या परिसरात कुठेही स्वच्छ पाणी साचणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागाचे साहाय्यक आयुक्त अजिंक्य येळे यांनी केले. आतापर्यंत ३६ हजार २७९ जणांची तपासणी केल्यानंतर ४३१३ जण डेंग्यू संशयित आढळले होते.

#रा

## Selected



## विद्या मंदिर शाळेतील विद्यार्थीनींना मोफत सायकल वाटप

**पवनानगर :** पवना विद्या मंदिर शाळेत पाच किलोमीटरपेक्षा जास्त अंतरावरुन पायी चालत येणाऱ्या १५ गरीब व गरजू मुलींना रोटरी क्लब ऑफ तळेगाव एमआयडीसीच्या मोफत सायकल वितरित करण्यात आल्या. यावेळी नूतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळाचे सचिव संतोष खांडगे, रोटरी क्लब ऑफ तळेगाव एमआयडीसीचे अध्यक्ष मिलिंद शेलार, सचिव राजेंद्र पंडित, डॉ. अशोक दाते, अजय पाटील, प्राचार्य भाऊसाहेब आगळमे व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी बोलताना संतोष खांडगे म्हणाले की, विद्यार्थी शिक्षण घेत असताना त्यांचा वेळ जाऊ नये यासाठी अनेक सेवाभावी संस्था मदत करत असतात. या सुविधांचा लाभ घेऊन विद्यार्थ्यांनी भारताचा एक जबाबदार नागरिक होऊन वंचितांच्या सेवेसाठी तयार रहावे. तर, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी जास्तीत जास्त वेळ भेटत नाही, कारण त्यांना पायपीट करून शाळेत यावे लागते. यामुळे या सायकलींचे वाटप करण्यात आल्याचे मिलिंद शेलार यांनी सांगितले.

## चेंबूरमधील आगीत ७ जणांचा मृत्यू

**मुंबई :** चेंबूरमधील सिद्धार्थ कॉलनीत एका घरात भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. यामध्ये एकाच घरातील ७ जणांचा मृत्यू झाला असून इतर नागरिकांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. पहाटे घडलेल्या या घटनेमुळे संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आज पहाटे साडेचार ते पाच वाजेच्या सुमारास ही घटना घडली. चेंबूरमधील सिद्धार्थ कॉलनीतील एका घरात शॉर्ट सर्किट झाल्यामुळे ही आग लागल्याची माहिती समोर आली आहे. घरातील सर्व सदस्य झोपेत असताना ही आग लागली. जाग येताच स्थानिकांच्या मदतीने आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र तोपर्यंत आगीने रौद्र रुप धारण केले होते. त्यामुळे गुप्ता परिवारातील ७ जणांचा आगीत होरपळून मृत्यू झाला.

**शिवडीच्या भारत इंडस्ट्रिअल इस्टेटमध्येही भीषण आग**

शिवडीच्या भारत इंडस्ट्रिअल इस्टेटमध्येही आज पहाटे भीषण आग लागल्याची घटना घडली. इंडस्ट्रिअल एस्टेटच्या तिसऱ्या मजल्यावर ही आग लागली. घटनेची माहिती मिळताच १० फायर इंजिन आणि १० पाण्याचे टँकर घटनास्थळी दाखल झालेत. आग विझविण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. या दुर्घटनेत कोणीही जखमी किंवा मृत्यू झाल्याची माहिती समोर आलेली नाही.

## संजौली अवैध मशिदीचे तीन मजले पाडण्याचे आदेश

**शिमला :** हिमाचल प्रदेशातील शिमला येथील संजौलीच्या अवैध मशिदीप्रकरणी तीन मजले पाडण्याचे आदेश दिले आहेत. न्यायालयाने मशीद पाडण्यासाठी २ महिन्यांची मुदत दिली आहे. आता याप्रकरणाची सुनावणी २१ डिसेंबरला होणार आहे. मशीद समिती आणि वक्फ बोर्डाने मशिदीचे वरचे तीन मजले आपल्या स्वखर्चाने पाडून घ्यावेत, असे न्यायालयाने आपल्या आदेशात म्हटले आहे. इमारतीच्या उर्वरित काही भागाचा निर्णय घेतला जाईल. संजौली येथे मशिदीचे बांधकाम सुरू झाल्यानंतर संपूर्ण वाद निर्माण झाला होता. हे विशेष त्यानंतर याप्रकरणी तक्रारी करण्यात आल्याने अवैध बांधकामासंबंधित निर्णय घेण्यात आला आहे. याप्रकरणात मिळालेल्या माहितीनुसार, संजौली येथे मशिदीचे बांधकाम २००९ मध्ये सुरू झाले होते. २०२१० सालापासून मशिदीच्या बांधकामावर वाद सुरू झाला. दरम्यान, बेकायदेशीर बांधकाम रोखण्यासाठी महापालिकेकडून एकूण ३८ नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. आता १४ वर्षानंतर याप्रकरणाबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

## भारत-पाक चर्चा होणार नाही

**नवी दिल्ली :** भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्या पाकिस्तान दौऱ्याची चर्चा सध्या सुरू आहे. एससीओच्या बैठकीत सहभागी होण्यासाठी ते इस्लामाबादला जाणार आहेत. या भेटीबाबत विचारले असता ते म्हणाले की, या काळात पाकिस्तानसोबत कोणतीही चर्चा होणार नाही. 'हम आपके हैं कौन' आणि 'हम साथ साथ हैं' या हिंदी चित्रपटांच्या कोणत्या शीर्षकांमध्ये भारत-पाकिस्तान संबंधांचे अचूक वर्णन कराल, असे विचारले असता, ते म्हणाले की, आधी मला तिथून परत येऊ द्या, मग तुम्ही त्याबद्दल विचारा. परराष्ट्रमंत्री म्हणाले, मी पाकिस्तानला जाणार आहे, हे तुम्हाला माहीत आहे. मी सध्या चित्रपटाचे नाव जाहीर करणार नाही. मी परतल्यावर मला विचारा. मी समजावून सांगतो. जयशंकर यांनी शांघाय सहकार्य संघटनेच्या (एससीओ) बैठकीसाठी इस्लामाबाद दौऱ्यावर असताना पाकिस्तानसोबत द्विपक्षीय बैठक होण्याची शक्यता फेटाळून लावली.

## श्री संत संताजी जगनाडे महाराज : तीर्थक्षेत्र विकास आराखड्याचा शुभारंभ

# मंदिराचे स्मारक देखणं करु : अजित पवार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाघोली:** सुदुंबरे (ता.मावळ) येथील संत जगनाडे महाराज यांनी जगद्गुरू संत तुकाराम महाराजांची गाथा लिहिली. त्यामुळे तिचा प्रसार झाला.त्यांचे स्मारकाचे काम हाती घेतले आहे.सुदुंबरे गावातील श्री संत संताजी जगनाडे महाराज मंदिराचं स्मारक अतिशय देखणं करू. हेरीटेजचा दर्जा देऊ. ६६ कोटींच्या खर्चास मंजुरी दिली आहे.त्यासाठी निधी कमी पडला तर आणखी देऊ, अशी घोषणा राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केली.



सुदुंबरे(ता.मावळ) येथे जगनाडे महाराज मंदिर विकास आराखाडा स्मारकाचे भूमिपूजन करताना उपमुख्यमंत्री अजित पवार, आमदार सुनील शेळके, संस्थेचे अध्यक्ष शिवदास उबाळे, सह मान्यवर.

सुदुंबरे येथील संत संताजी महाराज जगनाडे येथील तीर्थक्षेत्र विकास आराखड्याचा भूमिपूजन सोहळा शुक्रवारी (दि.०४) रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते सुदुंबरे गावात पार पडला.त्यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी खासदार रामदास तडस,मावळचे आमदार सुनील शेळके,संत जगनाडे महाराज संस्थेचे अध्यक्ष शिवदास उबाळे,विश्वस्त मंडळ,ग्रामस्थ तसेच राज्यभरातून आलेला तेली जनसमुदाय मोठ्या संख्येने उपस्थित होता.

अजित पवार पुढे बोलताना म्हणाले, राज्यातील तेली समाजासाठी आर्थिक विकास महामंडळाची स्थापन करण्याचा निर्णय आज झालेल्या झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतला आहे. त्यामुळे तेली समाजातील घटकांची सामाजिक व आर्थिक उन्नती होईल. तसेच युवकांना देखील शिक्षणासाठी फायदा व्हावा यासाठी हे महामंडळ काम करेल. तसेच भर कार्यक्रमातच त्यांनी स्मारकाचं काम उत्तम करण्याचा ठेकेदाराला दम भरला. जगनाडे महाराज यांच्या कार्याला त्यांनी अभिवादन करताच 'जय संताजी' चा नारा सर्वत्र गुंजला.



## शिक्रापुरातून युवकाचे अपहरण करुन बेदम मारहाण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** शिक्रापूर ता. शिरूर येथून एका युवकाचे जुन्या भांडणाच्या वादातून अपहरण करुन निर्जन स्थळी घेऊन जाऊन त्याला बेदम मारहाण करत, त्याच्याजवळील पैसे व सोन्याची चैन काढून घेत पोलिसांत तक्रार केली तर मर्डर करण्याची धमकी दिल्याची घटना घडल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे तब्बल बत्तीस युवकांवर गुन्हा दाखल करत अठरा जणांना अटक करण्यात आली आहे.

शिक्रापूर ता. शिरुर येथील येवले चहा जवळ विराज ढमढेरे हा उच्च शिक्षण घेणारा युवक मित्रांसमवेत उभा असताना जुन्या तीन वर्षापूर्वीच्या झालेल्या वादातून तसेच या आठवड्यात गादीला कट मारल्याच्या रागातून तब्बल वादातून टोळक्याने विराज याला मारहाण करत त्यांच्या जवळील एका कार मध्ये बसवून रांजणगाव गणपती बाजूला निर्जन स्थळी घेऊन जात, एका युवकाने मोबाईल मध्ये आम्हाला भाई बॉल, सोरी बॉल अशी शुटींग काढून घेत त्याला निर्जन स्थळी घेऊन जाऊन जुन्या भांडणाच्या वादातून शिवीगाळ, दमदाटी करत लाकडी दांडके, काठी, फायटरने बेदम मारहाण केली, यावेळी प्रशांत रसाळ याने भाई कोण आहे तुला कळेल का असे म्हणून विराजच्या खिशातील पैसे व सोन्याची चैन काढून घेऊन कासारी फाटा येथे आणून सोडले, त्यांनतर विराज याने घडलेला प्रकार वडिलांना सांगत पोलीस स्टेशन गाठले,

# 'आचार्य'मध्ये रंगला गुरुजनांचा कृतज्ञता सोहळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** बारामती येथील १७२९ आचार्य अ‍ॅकॅडमीमध्ये गांधीजयंतीदिवशी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा आचार्य कृतज्ञता आयोजित करण्यात आला होता. पुण्यासह राज्याच्या विविध जिल्हयातून आलेल्या शिक्षकांच्या साक्षीने हा सोहळा रंगतदार झाला.




१७२९ आचार्य अ‍ॅकॅडमी दहावीनंतर विद्यार्थ्यांना जेईई, नीट किंवा एनडीए या प्रवेशपरीक्षा उर्तीण होण्यासाठी प्रशिक्षित करते. परंतू दहावीपर्यंत या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया त्यांच्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळेतील शिक्षकांनी उत्तम तयार केलेला असतो. त्यामुळे 'आचार्य ' त्यावर कळस चढवू शकते. त्यामुळे या शिक्षकांबाबत कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

चांगली माणसे शोधणे आणि त्यांना एकत्र आणणे हा या सोहळ्याचा उद्देश असल्याचे आचार्यचे सीएसओ बापु काटकर यांनी प्रास्ताविकात सांगितले. असंख्य जबाबदाऱ्या पार पाडणाऱ्या शिक्षकांचेही कौतुक झाले पाहिजे असे यावेळी बोलताना संचालक प्रवीण ढवळे यांनी सांगितले. गावागावात जाणारी आचार्य शिक्षण वारी, प्रत्येक रविवारी दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी घेतले जाणारे मोफत ऑनलाईन सेमिनार, आठवीमध्ये स्कॉलरशीप मिळविलेल्या निवडक विद्यार्थ्यांना संपूर्ण फी माफी, माजी सैनिकांच्या मुलांना फी सवलत, स्त्री सुरक्षा कार्यक्रम, विद्यार्थ्यांचे कौन्सिलिंग अशा ' आचार्य ' मध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती यावेळी प्रविण ढवळे यांनी दिली.

सामाजिक भान राखणारा अशा उपक्रमाचे आयोजन केल्याबाबत आचार्यचे संस्थापक ज्ञानेश्वर मुटकूळे व संचालक सुमीत सिनगारे, कमलाकर टेकवडे आणि प्रवीण ढवळे यांचे सन्मानमुर्ती शिक्षकांनी आभार व्यक्त केले.

# बारामतीत अल्पवयीन मुलीवर बलात्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**बारामती :** महिला व अल्पवयीन मुलींवर अत्याचारांच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे. दोन अल्पवयीन मुलींवर अत्याचार झाल्याची घटना ताजी असतानाच पुन्हा बारामतीत अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. महाविद्यालयात जाणाऱ्या अल्पवयीन मुलीला धमकी देत कारमध्ये बसवून निर्जनस्थळी नेत तिच्यावर कारमध्ये बलात्कार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आलाय. याप्रकरणी पिडीत अल्पवयीन मुलीने शहर पोलीसांकडे फिर्याद दिली आहे. शारदानगर, माळेगाव येथे रस्त्याच्या बाजूला निर्जनस्थळी हा प्रकार घडला. पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, याप्रकरणी अनिरुध्द उर्फ दादा भालचंद्र त्रिकुंडे (रा. चंद्रमणीनगर, बारामती) याच्या विरोधात शहर पोलिस ठाण्यात शारिरिक शोषण, पॉक्सो, अनुसुचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा आदी कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पिडीतेने दिलेल्या फिर्यादीनुसार पिडीत मुलगी ही महाविद्यालयात येत असताना आरोपी महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ येत असे. तेथे पिडीतेला बोलावून कारमध्ये



बसवून सोबत घेवून जात होता. तसेच महाविद्यालय सुटल्यावर गेटवरूनच तो तिला कारमध्ये जबरदस्तीने बसवून निर्जनस्थळी नेत होता. तेथे तिला मारून टाकीन अशी धमकी देऊन कारमध्येच तिच्याशी जबरदस्तीने शारीरीक संबंध प्रस्थापित करत असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.



## विकासकामे चालू असताना ग्रामस्थांनी लक्ष देणे गरजेचे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कारेगाव :** गावातील विविध विकासकामे दर्जेदार होण्याकरिता कामे चालू असताना ग्रामस्थांनी लक्ष देणे गरजेचे असल्याचे मत आमदार ॲड अशोक पवार यांनी व्यक्त केले. शिरुर तालुक्यातील कर्डेलवाडी व सरदवाडी येथील विविध विकासकामांच्या भूमिपूजनप्रसंगी आमदार ॲड पवार बोलत होते.

या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष युवकचे अध्यक्ष तुषार दसगुडे,खरेदी विक्री संघांचे माजी संचालक सर्जेराव दसगुडे,संभाजी भुजबळ, सुरेश पाचर्णे,कर्डेलवाडीच्या सरपंच लता कर्डीले, सदस्य किशोर कर्डीले, सरदवाडीच्या सरपंच लक्ष्मीबाई जाधव, आदिसह ग्रामस्थ उपस्थित होते. शिरुर हवेलीतील उर्वरित विकासकामे करण्यासाठी येत्या विधानसभा निवडणुकीत पुन्हा संधी देण्याचे आवाहन आमदार ॲड पवार यांनी यावेळी केले.

## बाजार समितीमध्ये शासकीय उडीद व सोयाबीन खरेदी केंद्र

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** बारामती कृषि उत्पन्न बाजार समितीने हंगाम २०२४-२०२५ मध्ये केंद्र शासनाचे हमीदर खरेदी केंद्र सुरू करणे बाबतच्या प्रस्ताव दि. ९/९/२०२४ रोजी मा. जिल्हा उपनिबंधकसो, पुणे व मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे सादर केला होता. त्यानुसार केंद्र शासनाने निश्चित केलेल्या किमान आधारभूत किंमत खरेदी योजने अंतर्गत नाफेड मार्फत मुग, उडीद व सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्र बारामती साठी मंजुर झाले असुन त्याकरिता शेतकरी नाव नोंदणी प्रक्रिया दि. १ ऑक्टोबर २०२४ च्या पत्रानुसार सुरू झाली असल्याची माहिती बाजार समितीचे सभापती सुनिल पवार व उपसभापती निलेश लडकत यांनी दिली. सदर केंद्रावर नाफेड मार्फत सोयाबीन प्रति क्विंटल रू. ४८९२/- व उडीद रू. ७४००/- आणि मुग रू. ८६८२/- प्रति क्विंटल या हमीदराने शासन खरेदी करणार आहे.

# नवीन गावरान बटाट्याची मोठी आवक

**नवरात्रोत्सवामुळे उत्तर भारतात मोठी मागणी**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**महाळुंगे :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण मार्केट मध्ये नवीन तळेगाव बटाट्याची आवक सुरु झाली आहे. या बटाट्याला बाजारात मोठी मागणी आहे. विशेषतः उत्तर भारतात मोठी मागणी आहे. नवरात्र उत्सवात उपवासाला याच बटाट्याला सर्वाधिक पसंती असल्याने



चाकण ( ता. खेड) मार्केट मध्ये उत्तरभारतात निघालेला नवीन बटाटा. ( छाया : रत्नेश शेवकरी ,चाकण )

मोठ्या प्रमाणावर चाकण मार्केट मधून उत्तर प्रदेशात या बटाट्याची पाठवणी सुरु आहे.

चाकण मार्केट मध्ये शनिवारी (दि. ५ ) नवीन गावरान बटाट्याची २ हजार पिशवी म्हणजेच १ हजार क्विंटल आवक होऊन प्रतीक्विंटलला २ हजार २०० ते ३ हजार १०० रुपये भाव मिळाल्याचे बाजार समिती प्रशासनाकडून सांगण्यात आले. बटाटा खेड तालुक्यातील पश्चिम डोंगराळ भागातील पाईट, कोये, साबुर्डी, औदर, औंढे, सुपे अनावळे, सायगाव, वेताळे येथील आहे.

## पालेभाज्यांची भरपूर आवक: एकूण उलाढाल ४ कोटी ३० लाख रूपये

# कांदा, रताळी, बटाटा व मिरचीच्या दरात वाढ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये कांदा, रताळी, बटाटा व हिरव्या मिरचीच्या दरात वाढ झाली आहे. पालेभाज्यांची भरपूर आवक झाली. जनावरांच्या बाजारात जर्सी गाय, म्हैस व बैल यांच्या संख्येत घट झाली. एकूण उलाढाल ४ कोटी, ३० लाख रुपये झाली. चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक १,५०० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत



ही आवक ४०० क्विंटलने वाढली. कांद्याचा कमाल भाव ५,००० रुपयांवर पोहोचला. बटाट्याची एकूण आवक २,५००क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक २७५ क्विंटलने वाढली. बटाट्याचा कमाल भाव ३,१०० रुपयांवरून ३,५०० रुपयांवर पोहोचला. लसणाची एकूण आवक ३० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक स्थिर राहिली. लसणाचा कमाल भाव २८,००० रुपयांवर स्थिरावला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ३३५ क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ३ हजार रुपयांपासून ते ५ हजार ५०० रुपयांपर्यंत भाव मिळाला.

**शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे :**

कांदा - एकूण आवक - १,५०० क्विंटल. भाव क्रमांक - १. ५,००० रुपये, भाव क्रमांक २. ३,५०० रुपये, भाव क्रमांक ३. २,००० रुपये.

बटाटा - एकूण आवक - २,५०० क्विंटल. भाव क्रमांक १. ३,५०० रुपये, भाव क्रमांक २. ३,००० रुपये, भाव क्रमांक ३. २,५०० रुपये.

**फळभाज्या :** फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे -

टोमॅटो - ९८ क्विंटल ( ३,००० ते ५,००० रू. ), कोबी - १३५ क्विंटल ( १,००० ते १,५०० रू.), फ्लॉवर - १५५ क्विंटल ( १,५०० ते २,५०० रु.), वांगी - ८४ क्विंटल ( २,००० ते ३,००० रु.), भेंडी - ८२ क्विंटल ( २,००० ते ३,००० रु.), दोडका - ६४ क्विंटल ( ३,००० ते ४,००० रु.), कारली - ७४ क्विंटल ( २,५०० ते ३,००० रु.), दुधीभोपळा - ३८ क्विंटल ( १,००० ते २,००० रु.), काकडी - ६४ क्विंटल ( १,००० ते २,५०० रु.), फरशी - १४ क्विंटल ( ३,००० ते ४,००० रु.), वालवड - ७४ क्विंटल ( २,००० ते ३,५०० रुपये), ढोबळी मिरची - ७८ क्विंटल ( ४,००० ते



६,००० रु.), चवळी - ३४ क्विंटल ( २,५०० ते ३,५०० रु.), शेवगा - १० क्विंटल ( ७,००० ते ११,००० रु.), गाजर - २० क्विंटल ( २,४०० ते ४,००० रु.), गवार - १८ क्विंटल (४,००० ते ८,००० )

**पालेभाज्या :** चाकण येथील बाजारात पालेभाज्यांची एकूण आवक जुड्यांमध्ये व भाज्यांना मिळालेले भाव पुढीलप्रमाणे -

मेथी - एकूण ९ हजार ५२० जुड्या ( ८०० ते १,५०० रुपये ), कोथिंबीर - एकूण १३ हजार ४६० जुड्या ( २०० ते १,००० रुपये,), शेपू - एकूण ४ हजार ३२० जुड्या ( ५०० ते १,२०० रुपये ), पालक - एकूण ११ हजार ५४० जुड्या ( ५०० ते १,५०० रुपये),.

**जनावरे :** चाकण येथील जनावरांच्या बाजारात विक्रीसाठी आलेल्या ५२ जर्शी गाईपैकी ३७ गाईची विक्री झाली.( १०,००० ते ४०,००० रु.), १३० बैलांपैकी ११० बैलांची विक्री झाली.( १०,००० ते ४०,००० रु.), १६० म्हशीपैकी १३५ म्हशींची विक्री झाली.( २०,००० ते ८०,००० रु.), ६ हजार ९१० शेळ्या - मेंढ्यापैकी ६,६६५ शेळ्यांची विक्री झाली.

#रा

## Selected



शिरुर येथे वन्यजीव सप्ताहात जीवदान दिलेले उदमांजर.

## शिक्रापूरात वन्यजीव सप्ताहात उदमांजराला जीवदान

**शिक्रापूर :** शिक्रापूर ता. शिरुर येथील पाबळ चौकातील शेखर मेडिकलचे संचालक शेखर दातखिळे हे सकाळच्या सुमारास उघडत असताना शटरच्या बाहेरील बॉक्स मध्ये कोणतातरी प्राणी बसल्याचे नागरिकांना दिसले, त्यांनी याबाबतची माहिती निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे अध्यक्ष शेरखान शेख यांना दिली, त्यांनतर सर्पमित्र अमोल कुसाळकर, शुभम वाघ यांनी तातडीने येथे धाव घेत पाहणी केली असता बॉक्समध्ये उदमांजर असल्याचे निदर्शनास आले, त्यांनतर सदर उदमांजरा बाबतची माहिती वनविभागाच्या अधिकाऱ्यांना देत उदमांजराला निसर्गाच्या सानिध्यात मुक्त करण्यात आले, तर याबाबत बोलताना नेहमीच वेगवेगळ्या प्राणी पक्षांना जीवदान देत असताना वन्यजीव सप्ताहात उदमांजराला जीवदान दिल्याने समाधान वाटत असल्याचे निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे अध्यक्ष शेरखान शेख यांनी सांगितले.



## 'मी सेवेकरी सोशल फाऊंडेशन'च्या वतीने आरोग्य शिबिराचे आयोजन

**राजगुरूनगर :** खेड तालुक्यातील श्री क्षेत्र कन्हेरसर येथे मी सेवेकरी सोशल फाऊंडेशन, आदित्य बिर्ला हॉस्पिटल आणि जगदंब प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या वाढदिवसानिमित्त सेवेकरी फाऊंडेशनचे सुधीर मुंगसे यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. याचे उदघाटन राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे खेड तालुकाध्यक्ष हिरामण सातकर यांनी केले. अशा शिबीरांमुळे समाजात आरोग्यविषयक जागरूकता वाढविण्यास मोठा हातभार लागत असल्याचे आयोजक मुंगसे यांनी केले. या शिबिरात सुमारे 376 जणांची आरोग्य तपासणी करण्यात आली, तर 67 जणांनी रक्तदान केले.



## युवा सेनेच्या वतीने शिबिरांचे आयोजन

**रांजणगाव गणपती :** नागरिकांना शासनाच्या विविध योजनांची माहिती व्हावी व त्याचा लाभ घेता यावा यासाठी रांजणगाव येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार युवा सेनेच्या वतीने विविध शिबिरांचे आयोजन करण्यात येत असल्याची माहिती युवा सेना जिल्हाप्रमुख बापूसाहेब शिंदे यांनी दिली.आज पर्यंत या शिबिराच्या माध्यमातून लाडकी बहीण योजना, शेतकरी सन्मान निधी विधवा परिचत्या पेन्शन, श्रावण बाळ योजना, मतदान कार्ड दुरुस्ती व नवीन नाव नोंदणी तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी, व शेतकऱ्यांना विविध योजना मिळवून देण्याचे काम या शिबिरांमार्फत करण्यात आले असून यापुढेही नागरिकांना या शिबिरांच्या माध्यमातून या सेवा उपलब्ध करून दिले जातील नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन रांजणगाव विविध कार्यकारी सोसायटीचे माजी चेअरमन व शिवसेनेचे युवा सेना जिल्हाप्रमुख बापूसाहेब शिंदे यांनी केले आहे.

## आमदार दत्तात्रय भरणे यांचे आश्वासन

# मच्छिमार बांधवांचे जीवन समृद्ध करणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी देवकर :** उजनी जलाशयातील गोरगरीब मच्छिमारांचा मासेमारी व्यवसाय मासळी विना रसातळाला गेला होता. येथील मच्छिमार बांधवांच्या मागणीनुसार मी उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून दोन कोटी रुपये मंजूर करून उजनी जलाशयात मत्स्यबीज सोडण्याची वहिवाट गेल्या वर्षीपासून सुरू केली आहे. ती यापुढे वर्षेनूवर्षे सुरू राहील. उजनी जलाशय तीन जिल्ह्यात पसरला असून, यापुढील काळात पुणे, सोलापूर व नगर या तीन जिल्ह्यातून सहा कोटी रुपयांपेक्षा अधिक रुपयाचे मत्स्यबीज यात सोडून येथील मासेमारी व मासेमारी व्यवसायवर आधारित असणाऱ्या मच्छिमार बांधवांचे जीवन समृद्ध करणार असल्याची ग्वाही माजी मंत्री व इंदापूर तालुक्याचे आमदार दत्तात्रय भरणे यांनी पळसदेव येथे मत्स्यबीज संचयन करतेवेळी बोलताना दिली.



पळसदेव येथे मत्स्यबीज सोडताना आमदार दत्तात्रय भरणे कार्यक्रमास उपस्थित मच्छिमार जनसमुदाय.

दत्तात्रय भरणे म्हणाले आयुष्यात पद, सत्ता येते, जाते. मात्र, सत्तेचा उपयोग सर्वसामान्य आणि गोरगरीब जनतेसाठी केला तर हीच सर्वसामान्य गरीब जनता मरेपर्यंत त्याचे स्मरण ठेवते. यामुळे मी माझ्या हातातील सत्तेचा पुरेपूर उपयोग गोरगरिबांसाठी केला असून, तीच माझी ताकद आहे.

पळसदेव येथे पहिल्या टप्प्यात मत्स्यबीज सोडण्याचा शुभारंभ आमदार दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते करण्यात आला. उजनी मच्छिमार संघटनेचे प्रमुख मार्गदर्शक भरत मल्लाव, कुंभरगावच्या सरपंच उज्वला ताई परदेशी, आजोतीचे माजी सरपंच संजय दरदरे, मत्स्यव्यवसाय विभागाचे प्रादेशिक उपआयुक्त विजय शिखरे, सहाय्यक आयुक्त अर्चना शिंदे, उजनी धरण व्यवस्थापन विभागाचे कार्यकरी अभियंता रावसो मोरे, मेघराज कुचेकर पाटील, अनिल नगरे, राहुल नगरे आदींच्या हस्ते मत्स्यबीज सोडण्यात आले.

यावेळी मच्छिमार बांधवांनी इंदापूर तालुक्यातील बंद झालेले फिशरीज डिमार्टमेंट पुन्हा सुरू करावे, मासळी पकडण्यासाठी लागणारी जाळी, होडीसाठी अनुदान तात्काळ मजूर करून द्यावे अशा मागण्या सभेत केल्या. आमदार भरणे यांनी वरिष्ठांशी बोलून त्या तात्काळ मजूर करून देण्याची ग्वाही दिली. त्यावेळी उपस्थित हजारो बांधवांमधून एकच जल्लोष झाला.

एकेकाळी उजनी जलाशय म्हणजे मोठ्या मासळीचे आगार म्हणून राज्यात त्याचा नावलौकिक होता. मात्र, मधल्या २८ वर्षाच्या कार्यकाळात हे कोठेतरी संपुष्टात आले होते. आपण यात जातीने लक्ष घालून कटला, रोहू, मृगल यासारखे स्कार्प जातीचे मासे सोडून कमी झालेल्या मासळींची संख्या वाढवली. त्यामुळे खवय्ये आणि पर्यटकांची संख्या वाढून इंदापूर तालुका हा मोठया मासळीचा बोलबाला असणारा तालुका बनवणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

मच्छिमार नेते भरत मल्लाव म्हणाले शासन उजनी जलाशयात मत्स्यबीज सोडून मासळी व्यवसायला चालना देत आहे. तसेच त्याद्वारे जलाशयातील प्रदूषण कमी करण्याचा प्रयत्न करीत आहे. काही आडदांड तसेच परप्रांतातील मच्छिमारांच्या अंगात जास्तच खुमखुमी असल्याने ते वडाप व इतर बेकायदेशीर पद्धतीने लहान मासे मारून उजनीचे वाळवंट करण्याचा प्रयत्न करीत आहेत. मात्र, त्यांची ही मस्ती आता जास्त दिवस टिकणार नसून, त्यांनाही वेळीच प्रशासनाच्या माध्यमातून पायबंद घातला जाणार आहे, असे आश्वासन मल्लाव यांनी दिले.

## शिक्रापूर भागात राजकीय लोकांच्या शाळेंचे चालले काय ?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** शिक्रापूर ता. शिरुर नजीक असलेल्या जातेगाव बुद्रुक येथे राष्ट्रवादीच्या एका पदाधिकाऱ्याची तर कासारी येथे भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्याची आणि तळेगाव ढमढेरे येथे कॉंग्रेसच्या एका पदाधिकाऱ्याची खाजगी शाळा असून जातेगाव येथील राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्याच्या महाविद्यालयच्या आतमध्ये एका युवकाने अल्पवयीन युवतीचा विनयभंग केला तर कासारीतील भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्याच्या शाळेमध्ये एका शाळकरी अल्पवयीन युवकाने स्कोर्पिओ कार शाळेच्या आवाराच्या आतमध्ये आणून भरधाव वेगाने बाहेर जाताना दुचाकीहून चाललेल्या एका दाम्पत्याला धडक बसून अपघात होऊन दुचाकीचालक जखमी झाला मात्र यावेळी युवकाच्या कुटुंबियांची व स्थानिकांची धक्काबुक्की झाली मात्र पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने अनर्थ टळला.

## Selected



### जातेगाव बुद्रुकच्या माजी विद्यार्थ्यांची शाळेबाबत कृतज्ञता

**शिक्रापूर :** जातेगाव बुद्रुक ता. शिरुर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील माजी विद्यार्थ्यांनी शाळेबाबत कृतज्ञता व्यक्त करत शाळेच्या नवीन बांधकामासाठी एक्कावन हजारांचा निधी संकलित करुन शाळेच्या पदाधिकाऱ्यांकडे सुपूर्त केला आहे.

जातेगाव बुद्रुक ता. शिरुर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील २००८ ते २००९ मध्ये सातवीचे शिक्षण घेतलेले माजी विद्यार्थी सोशल मिडीयाच्या माध्यमातून एकत्र आले, सर्व मित्रांच्या चर्चेतून आपण शाळेसाठी काहीतरी करण्याची भावना व्यक्त करत सर्व माजी विद्यार्थ्यांनी काही रक्कम संकलित करत माजी छपन्न विद्यार्थ्यांनी सर्वांनी एक्कावन हजार रुपयांचा निधी संकलित करुन नुकतेच शाळेचे मुख्याध्यापक विजय गायकवाड, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हनुमंत पवार यांच्याकडे सुपूर्त केला तर माजी विद्यार्थ्यांनी शाळेबाबत दाखवलेल्या प्रेमाबद्दल मुख्याध्यापक विजय गायकवाड यांनी सर्व माजी विद्यार्थ्याचे कौतुक करत माजी विद्यार्थ्यांनी राबवलेला उपक्रम कौतुकास्पद असल्याचे देखील विजय गायकवाड यांनी सांगितले.

### पोलिसांच्या परवानगीशिवाय शेतकऱ्यांनाही कोयता नाही

**पुणे:** गेल्या काही वर्षांत पुणे, पिंपरी-चिंचवड शहरांसह संपूर्ण जिल्ह्यातच कोयता गँगने धुमाकूळ घातला आहे. या कोयता गँगवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून पोलिसांनी शहर आणि जिल्ह्यातील सर्व हार्डवेअर आणि शेती अवजारे विक्री करणाऱ्या दुकानदारांना सक्त सूचना दिल्या आहेत की, पोलिसांची परवानगी घेतल्याशिवाय कुणालाही कोयता विक्री करू नये.

पुणे, पिंपरी-चिंचवड, चाकण, मुळशीसह संपूर्ण जिल्ह्यातच कोयता गँगची प्रचंड दहशत आहे. पण याचा परिणाम थेट शेतकऱ्यांवर झाला आहे. जिल्ह्यातील कोणत्याही हार्डवेअर अथवा शेती अवजारांच्या दुकानात शेतकरी शेतीकामासाठी कोयता खरेदी करायला गेल्यावर त्याला पोलिसांचे पत्र असेल तरच कोयता विकत मिळेल, असे सांगितले जात आहे.इतकेच नाही तर अनेक दुकानदारांनी पोलिसांची ससेमिरा नको म्हणून कोयता विक्रीसाठी ठेवणेच बंद केले आहे. परिणामी शेतकऱ्याची मोठी अडचण होऊ लागली आहे. ग्रामीण भागात आजही शेतीच्या अनेक कामांसाठी, सरपण, लाकूडफाटा तोडण्यासाठी कोयत्याशिवाय पर्याय नाही. परंतु हा कोयता घेण्यासाठी शेतकऱ्यांना मोठे मद्राविडी प्राणायाम करावे लागत आहेत. शंभर-दोनशे रुपयांचा कोयता घेण्यासाठी पोलिस ठाण्याची पायरी चढावी लागत आहे. तर अनेक दुकानदारांनी थेट कोयत्यांची विक्रीच बंद केली आहे. त्याचा थेट परिणाम मात्र शेतकऱ्यांवर होत आहे.

### दौंड-हडपसर डेमू आता पुणे रेल्वेस्थानकापर्यंत

**पुणे :** सर्व प्रवाशांना दिलासा मिळाला असून ०१५२२- दौंड-हडपसर ही डेमू रेल्वे आता पुणे रेल्वेस्थानकापर्यंत जाणार आहे. याबाबत मध्य रेल्वे सल्लागार समिती सदस्य अ‍ॅड. कृपाल पलूसकर यांनी या निर्णयाबाबत रेल्वे प्रशासनाचे आभार मानले आहेत.

दौंड-पुणे-दौंड असा रेल्वे प्रवास करणाऱ्या करणाऱ्या हजारो प्रवाशांना डेमू रेल्वेने फक्त हडपसर रेल्वेस्टेशनपर्यंत जाता येत होते. त्यापुढे पर्यायी वाहनांनी पुण्यात पोहचावे लागत होते. दौड-हडपसर डेमू रेल्वे ही हडपसर स्थानकापर्यंत धावत होती. त्यामुळे पुण्यात शिक्षणासाठी येणारा विथ्यार्थी वर्ग, नोकरी व व्यवसायासाठी येणार ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी, सरकारी तसेच खासगी कर्मचारी यांची गैरसोय होत होती. ग्रामीण रेल्वे प्रवासी व प्रवासी संघटनेने आपल्याकडे विषय मांडला होता. त्यानुसार या मागणीसाठी एक वर्षांपासून रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू होता, त्याला यश आले असल्याचे मध्य रेल्वे सल्लागार समिती सदस्य अ‍ॅड. कृपाल पलूसकर यांनी सांगितले.

# अ‍ॅन्टी करप्शनचे अधिकारी प्रत्येक तालुक्यात जाणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आता महिन्याभरात अ‍ॅन्टी करप्शनचे अधिकारी पुणे जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात एक दिवस जाणार आहेत. तेथील शासकीय विश्रामगृहात सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत उपस्थित राहणार आहेत. शासकीय नोकरांच्या भ्रष्टाचाराविषयी तक्रार करायची असेल तर त्यांना पुण्याला यावे लागते हे टाळण्यासाठी व लोकांशी थेट संपर्क व्हावा, यासाठी आता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग लोकांपर्यंत जाणार आहे.

**लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी उपस्थित राहणार असलेले तालुक्याचे ठिकाण आणि दिवस**

- **भोर** – मंगळवार ८ ऑक्टोबर
- **लोणावळा** – बुधवार ९ ऑक्टोबर
- **बारामती** – गुरुवार १० ऑक्टोबर
- **राजगुरुनगर** – शुक्रवार ११ ऑक्टोबर
- **नारायणगांव** – शनिवार, १२ ऑक्टोबर
- **दौंड** – रविवार, १३ ऑक्टोबर
- **सासवड** – सोमवार १४ ऑक्टोबर
- **शिरुर** -शनिवार, १९ ऑक्टोबर
- **इंदापूर** -रविवार, २० ऑक्टोबर
- **जुन्नर** – रविवार २७ ऑक्टोबर

याबाबत लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे पुणे विभागाचे पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी सांगितले की, भ्रष्टाचारी लोकसेवकांवर अंकुश राहून लोकांची कामे व्हावीत, यासाठी आता लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने पुढाकार घेतला असून लोकांमध्ये जाण्याचे निश्चित केले आहे. अनेकदा लोकांना शंका असते की आपण तक्रार दिली तर, आपले काम होणार नाही. आपली अडवणूक केली जाईल. आमचे अधिकारी लोकांच्या शंकांचे निरसन करतील. या लोकसंवादाची प्रसिद्धी प्रत्येक तालुक्यात करण्यात येणार आहे. त्यासाठी हँडबिले, स्टिकर तयार करण्यात आली आहेत. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे काम कसे चालते, याची माहिती आमचे अधिकारी लोकांना देतील. तेथे आलेल्या लोकांना माहितीपट दाखविण्यात येईल. लोकांच्या तक्रारीची दखल घेतली जाईल.

नागरिकांनी या वेळी अ‍ॅन्टी करप्शन ब्युरोच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांच्याकडील माहिती/ तक्रारी सादर करु शकतात.



# तुळजाभवानी मंदिरात आकर्षक सजावट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कारेगाव :** घटस्थापनेच्या दिवशी तुळजापूर, जि. धाराशिव येथील तुळजाभवानी मंदिर गाभारा व परिसरात तुळजाभवानी मातेचे भक्त व शिरुर तालुक्यातील प्रगतिशील शेतकरी नानासाहेब दिनकरराव पाचुंदकर यांच्या वतीने देशी विदेशीविविध रंगांच्या फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली. महाद्वारासमोर फुलांच्या सहाय्याने साकारलेल्या तुळजाभवानी मातेने आणि मंदिर व परिसरातील फुलांच्या सजावटीने भाविकांचे लक्ष वेधून घेतले.

नवरात्रौत्सवात या मंदिरातील फुलांच्या सजावटीचे पाचुंदकर कुटुंबियांचे यंदा १५ वे वर्षे आहे. तुळजाभवानी मातेच्या सिंहासनासह मुख्य गाभारा, सिंह गाभारा, चोपदार दरवाज्यासह संपूर्ण मंदिरात विविध रंगी देशी विदेशी फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली. पाचुंदकर कुटुंबियांच्या वतीने तुळजाभवानी मातेची साडी चोळी बांधली. त्यानंतर मंदिर संस्थांनच्या वतीने पाचुंदकर यांचा देवीची प्रतिमा देवून सत्कार करण्यात आला.

- आई वडिलांच्या श्रद्धेपोटी कुलस्वामीनी तुळजाभवानी देवीची आपण सुगंधी फुलांच्या माध्यमातून दरवर्षी सेवा करत असल्याचे उद्योजक ज्ञानेश्वर पाचुंदकर यांनी सांगितले. तुळजाभवानी मंदिराप्रमाणेच पंढरपूर येथील विठ्ठल रुख्मिणी मंदिर, आळंदीचे संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर, कोल्हापूरची अंबाबाई,जेजुरीचा श्री खंडोबा व अष्टविनायक रांजणगाव गणपती येथील महागणपती मंदिरात पाचुंदकर कुटुंबियांकडून दरवर्षी फुलांची सजावट करण्यात येते.

# विद्या प्रतिष्ठानमध्ये वन्यजीव सप्ताह उत्साहात संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** वन्यप्राणी आणि त्यांचा अधिवास सुरक्षित राहावा याकरिता जनजागृती करण्याच्या उद्देशाने विद्या प्रतिष्ठानच्या कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने दि. ४ व ५ ऑक्टोबर रोजी रेस्क्यु दौंड या स्वंयसेवी संस्थेच्या सहकार्याने जैवविविधता छायाचित्रांचे प्रदर्शन व सहजीवनावर आधारित माहितीपट दाखवून मोठ्या उत्साहात वन्यजीव सप्ताह साजरा केला.



'सहजीवनाद्वारे वन्यजीव संरक्षण' ही यावर्षीची देशभरातील वन्यजीव सप्ताहाची संकल्पना आहे. वन्यप्राण्यांच्या अधिवासात होणाऱ्या मानवी घुसखोरीमुळे, वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे वन्यप्राणी त्यांच्या अधिवासातून बाहेर पडतात. अधिवासाचा ऱ्हास, अवैध शिकार, विकास प्रकल्प यांमुळे वन्यप्राण्यांच्या अधिवासासह त्यांचे अस्तित्वदेखील धोक्यात आले आहे. त्यामुळे वन्यजीवांविषयी आजच्या तरुण पिढीमधे जनजागृती करण्याच्या उद्देशाने महाविद्यालयात वन्यजीव सप्ताह साजरा केला. सहजीवन अत्यंत महत्त्वाचे असून त्यावर रेस्क्यू दौंड या संस्थेचे अध्यक्ष नचिकेत अवधानी यांनी उत्तम पद्धतीने विद्या प्रतिष्ठानच्या शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये स्लाईड शो व व्हिडिओच्या माध्यमातून तसेच जैवविविधतेचे छायाचित्र प्रदर्शनाच्या माध्यमातून जनजागृती केली. तसेच मानवी वसाहतीत आढळून आलेल्या, जखमी झालेल्या, विहिरीत पडलेल्या प्राण्यांना सुरक्षितपणे बाहेर काढून त्यांना त्यांच्या अधिवासात परत सोडण्याचे काम या संस्थेचे स्वयंसेवक मोठ्या प्रमाणात करतात. यासाठी लागणाऱ्या प्राथमिक साहित्याचेही प्रदर्शन या ठिकाणी भरवलेले होते.

जैवविविधता छायाचित्रांमध्ये प्रामुख्याने बिनविषारी व विषारी सापांच्या जाती, विविध पक्षी, पाली रंगीत बेडकं, कोळी, लांडगे, सांबर, तरस, बिबट्या इ.चे स्वतः नचिकेत अवधानी यांनी त्यांच्या कॅमेऱ्यातून टिपलेल्या १००हून अधिक छायाचित्रांचे प्रदर्शन लक्षवेधी ठरले. शाळा व महाविद्यालयातील जवळपास पाच हजार विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी या प्रदर्शनास दोन दिवसात भेट दिली.

योगायोगाने दुसऱ्या दिवशी बारामती परिसरामध्ये मन्यार, नाग, धामण, घोरपड व निरा परिसरात आढळून आलेल्या तरस या जंगली प्राण्यास पकडून रेस्क्यू टीमने परत त्यांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात सोडून दिले. रेस्क्यु दौंड ही स्वयंसेवी संस्था, वन्यजीवांच्या संरक्षण व संवर्धनासाठी अतिशय उत्तम काम करणारी स्वयंसेवी संस्था म्हणून गेले १७ वर्ष या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत आहे. अवधानी यांच्याबरोबर विलास वाघचौरे शारदा राजगुरूव, दत्तात्रय राजगुरूव, श्रेयस कांबळे, श्रीकांत देशमुख, प्रशांत कौलकर, अभिलाष बनसोडे, अक्षय गांधी तसेच बारामती विभागातील वनविभागाच्या अधिकारी वैशाली शिंदे, सौ रणसिंग व इतर कर्मचारीही सहभागी झाले होते.

तरुण पिढीला याचे महत्त्व कळावे म्हणून शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना यात सामावून घेतले असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भरत शिंदे यांनी केले. डॉ. रवींद्र गायकवाड, शेखर फडतरे महाविद्यालयातील इतर शिक्षक व विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून सहकार्य करून वन्यजीव सप्ताह यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# खेड बाजार समितीची निवडणूक गुरुवारी होणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** राज्याचे पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी आपल्या अधिकाराने स्थगित केलेली पुणे जिल्ह्यातील खेड कृषी उत्पन्न बाजार समितीची सभापती व उपसभापती पदाची निवडणूक आता मुंबई उच्च न्यायालयाचे आदेशाने गुरुवारी (दि.१०) रोजी होत आहे. लागलेल्या निवडणुकीत सभापती व उपसभापती कोण होणार यापेक्षा आ.मोहिते गड राखणार की विरोधक बाजार समिती ताब्यात घेणार याकडे तालुक्यातील जनतेचे लक्ष वेधले असून राजकीय जाणकारांच्या नजरा मात्र होणाऱ्या निवडणुकीकडे लागल्या आहेत.



विधानसभा निवडणूकपूर्वी होत असलेल्या बाजार समितीच्या सभापती, उपसभापती निवडणुकीतच आमदार दिलीप मोहितेंना शह द्यायचा या उद्देशाने मोहिते गटाचे तीन संचालक विरोधकांनी फोडले आहेत.त्यामुळे १८ संचालकांपैकी ११ संचालकांचे भक्कम संख्याबळ असलेल्या मोहितेंचे तीन संचालक अचानक विरोधकांना मिळाल्याने आमदार मोहिते अल्पमातात आल्याचे बोलले जात आहे.विरोधकांना तीन संचालक मिळाल्याने त्यांचे ७ वरून १० संख्याबळ झाल्याची चर्चा तालुक्यात जोरात आहे. सभापती,उपसभापती पदाची निवडणूक २८ सप्टेंबरला लागताच विरोधकांनी आमदार गटाचे तीन संचालक फोडून एकूण १० संचालक सध्या राजकीय सहलीवर आहेत.संचालक फोडून नेल्याने आमदार मोहितेंनी राजकीय ताकद वापरून पणन मंत्री सत्तार यांच्याकडून निवडणुकीला पुढील आदेश मिळेपर्यंत (दि. २७) रोजी स्थगिती मिळविली.परंतु विरोधकांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली असता (दि.३) रोजी न्यायालयाने सभापती व उपसभापती पदाची निवडणूक (दि.१०) रोजी घेण्याचा आदेश केल्याने निवडणूक होणार आहे.आमदार मोहितेंचे तालुक्यातील असलेले विरोधक एकवटल्याने या निवडणुकीत मोठी चुरस निर्माण झाली. कोणाचे सभापती, उपसभापती होणार ? बाजार समितीची सत्ता विरोधकांच्या हातात जाणार का ? राजकीय मुरब्बी मोहिते पाटील ऐन वेळी कोणता डाव टाकणार ? याकडे संपूर्ण तालुक्यातील जनतेमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

बाजार समितीचे एकूण १८ संचालक असून आमदार मोहिते गटाकडे सध्या आमदार दिलीप मोहिते, सभापती कैलास लिंभोरे, उपसभापती विठ्ठल वनघरे, हनुमंत कड,जयसिंग भोगाडे, पप्पूदादा टोपे, सागर मुऱ्हे,कमल कड असे ८ संचालक राहिले आहेत.तर विरोधी गटात अशोक राक्षे, सयाजी मोहिते, महेंद्र गोरे,सोमनाथ मुंगसे, विजयसिंह शिंदे, अनुराग जैद,रणजित गाडे,माणिक गोरे, सुधीर भोमाळे, क्रांती सोमवंशी हे १० संचालक एकत्र आहेत. येत्या गुरुवारी (दि.१०) रोजी होणाऱ्या बाजार समितीचे सभापती व उपसभापती निवडणुकीची चर्चा सध्यातरी तालुक्यात चांगलीच रंगली आहे.

**जाहीर समन्स**
**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा)**
**पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्थेचे सहकारी फेडरेशन लि., पुणे**
बारामती विभागीय कार्यालय : मयुरेश्वर अपार्टमेंट, पहिला मजला,
भिगवण रोड, मु. पो. बारामती, ता. बारामती, जि. पुणे. फोन (०२११२) २२९५३२

**निरा नागरी सहकारी पतपेढी मर्या.** अर्जदार
**पत्ता : निरा ता. पुरंदर, जि. पुणे.**
विरुद्ध जाब देणार

| क्र. | प्रतिवादीचे नाव | प्रतिवादी क्र. | दावा क्र. | दावा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १) | सोमनाथ नामदेव गडदरे, गडदरवाडी, ता. बारामती, जि. पुणे | १ | ५९७/२४ | ३०४७१५/- |
| २) | सागर दादासो गलांडे, गडदरवाडी, ता. बारामती, जि. पुणे | २ | ५९६/२४ | १५७६७२/- |

सदर दाव्याचे कामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील प्रतिवादींना रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहे. परंतू प्रतिवादी यांना समन्स रुजू न झाल्याने / त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्याने जाहीर समन्स देत आहोत.

उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने दिनांक ११/१०/२०२४ रोजी ११.३० वाजता दाव्यासंबंधी कागदपत्रांसह आपण या न्यायालयात हजर रहावे.

या नोटीशीद्वारे उपरोक्त प्रतिवादी यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

म्हणून आज दिनांक २७/९/२०२४ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह हा जाहीर समन्स दिला आहे.

शिक्का

सही
(श्री एस. एम. तांदळे)
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा)
पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्थेचे
सहकारी फेडरेशन लि., पुणे

O.S. No.185/2017
**IN THE COURT OF THE HON'BLE PRINCIPAL CIVIL JUDGE AND J.M.F.C. BELAGAVI, AT BELAGAVI**

**Between:**
1) Shri. Somangouda S/o Basalingappagouda Patil Since deceased by L.Rs.
....Plaintiffs
**And:**
1) Shri. Aravind S/o Lingangouda Patil And others
....Defendants

**CITATION**

**Defendants No.4A:**
Smt. Vanita W/o Basangouda Patil, Age: 70 years, Occ: Household Work, R/o. B.T.Kavade Marg, Saupan Park, Ghorpade, Pune-Maharashtra

Whereas, the plaintiff above named have filed the top numbered suit against you for partition and separate possession in the house properties and open space situated at Bhendigeri village, Tq. & Dist: Belagavi in the Court of the Hon'ble Principal Civil Judge and J.M.F.C., Belagavi. Therefore, I, hereby summoned to appear before this Hon'ble Court in person or through authorized advocate on the **16th day of October 2024 at 11.00 am** to answer the claim.

Take notice that in default of your appearance on the date mentioned above the case will be heard and decided in your absence.

Given under my hand and seal of the Court on this 19th day of Sept. 2024.

**By order of the Court**

Sd/-
**Bench Clerk**

Sd/-
**Shirestadar**
Principal Civil Judge and J.M.F.C. Belagavi

Sd/-
(**P.K.Bagi**)
Advocate for Plaintiff

COURT SEAL

## नितीन गडकरींसह भाजपचे दिग्गज नेते प्रचार मैदानात

# भाजपचे महा जनसंपर्क अभियान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**मुंबई :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपने चांगलीच कंबर कसली आहे. अशातच भाजपचा कालपासून नागपुरात महाजनसंपर्क अभियान सुरू झाले. या अभियानाच्या माध्यमातून भाजपचे नेते आणि कार्यकर्ते सामान्य नागपूरकरांच्या घरी जाऊन संपर्क साधत आहेत. या अभियानाच्या माध्यमातून केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांची माहिती मतदारांना देत भाजपसाठी पाठिंबा मागितला जात आहे. अभियानाच्या पहिल्याच दिवशी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, निवडणूक प्रभारी कैलास विजयवर्गीय हे पूर्व नागपूरमधील रामपेठ परिसरात लोकांच्या घरी जाऊन पाठिंबा मागत असल्याचे दिसून आले आहे.

● **अभियानातून केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांची देणार माहिती**

याच अभियानाच्या माध्यमातून भाजप कार्यकर्ते मतदारयाद्यांमधील नावांची तपासणी ही करणार आहे. कोणाचे नाव मतदार यादीत आहेत? ते सध्या त्याच पत्त्यावर राहतात का? काहींचे मृत्यू झाले आहेत का? तसेच लोकसभा निवडणुकीच्या काळात काहींचे नाव मतदार यादीतून डिलीट करण्यात आले आहेत का? याचा आढावाही भाजप कार्यकर्ते या अभियानाच्या माध्यमातून घेतील.

विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नागपूरात विदर्भातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली होती. त्यामध्ये अमित शाह यांनी सी ग्रेडचे बूथ बी ग्रेड मध्ये आणि बी ग्रेडचे बूथ ए ग्रेड मध्ये आणण्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावे, असे आवाहन केले होते. त्याच पार्श्वभूमीवर भाजपने नागपुरातील प्रत्येक घरापर्यंत पोहोचून संपर्क साधण्याचा अभियान सुरू केला आहे.

● **दिग्गज नेत्यांचाही सहभाग**

विधानसभेसाठी भाजप नागपूर पाठोपाठ राज्यात महाजनसंपर्क अभियान राबवणार आहे. या माध्यमातून एकाच वेळी शहरातील सर्व कार्यकर्ते घराबाहेर पडून घरोघरी जाऊन संपर्क साधतील. विशेष म्हणजे केंद्र, राज्य पातळीवरील वरिष्ठ मंत्रीही यात सहभागी होऊन कार्यकर्त्यांसोबत गृहसंपर्क साधतील. यात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे देखील यात सहभागी होणार आहेत.

राष्ट्रसंचार परतीचा पाऊस रा

## महाराष्ट्रातून मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू

हवामान



**मुंबई-** उत्तर प्रदेश, गुजरात, मध्य प्रदेश, महाराष्ट्राचा काही भाग आणि उत्तर अरबी समुद्राच्या बहुतांश भागातून मॉन्सूनच्या परतीच्या प्रवासास शनिवारी (ता. ५) सुरुवात झाली आहे. रविवारी (ता. ६) कोकण-गोवा, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी आणि मराठवाडा व विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तवली आहे.

मागील आठवड्यात पावसाने मुंबई व राज्यभरात धुमाकुळ घातला होता. मात्र त्यानंतर पावसाने ओढ दिली आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून राज्यात उकाडा वाढला आहे. वाढत्या आर्द्रतेमुळं उकाड्यात आणखी वाढ होत आहे. पुढील चार ते पाच दिवस मुंबईचे तापमान ३३ ते ३६ अंशापर्यंत जाण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर पुढील दोन ते तीन दिवस पावसाच्या हलक्या सरी बरसू शकतात, अशी शक्यताही प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे.

पुणे व आसपासच्या परिसरात पुढील दोन दिवस तर कोल्हापूर, सातारा, सांगली व सोलापूर येथे तुरळक ठिकाणी पुढील तीन ते चार दिवस मेघगर्जना, विजांच्या कडकडाट व वादळी वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे या जिल्ह्यांना मंगळवारपर्यंत (ता. ८) 'येलो अलर्ट' देण्यात आला आहे.

» Selected

## चिट्ठी लिहून हॉस्टेलमध्येच विद्यार्थ्याने घेतला गळफास



**हिंगोली :** परभणीतील राजे संभाजी गुरुकुलमधील एका विद्यार्थ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. बारावीत शिकणारा हा विद्यार्थी मूळचा हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील हिवरखेडा येथील रहिवासी आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,आत्महत्या करणारा विद्यार्थी मूळचा हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील हिवरखेडा येथील आहे. रामू बळीराम गायकवाड असे या विद्यार्थ्याचे नाव आहे. आज सकाळच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. यावेळी पोलिसांना सुसाइड नोट सापडली आहे. मात्र, त्यातील मजकुरामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

## नंदुरबारमध्ये भरधाव ट्रकच्या धडकेत १०० मेंढ्या चिरडून ठार

**नंदुरबार :** जिल्ह्यातून एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. या ठिकाणी राष्ट्रीय महामार्गावर एका भरधाव ट्रकच्या धडकेत तब्बल



१०० मेंढ्यांचा चिरडून मृत्यू झाला असल्याचे सांगण्यात येत आहे. जिल्ह्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहावर वाहनाच्या कोंडाईबारी घाटात हा अपघात झाला आहे. परिणामी, रस्त्यावर मेंढ्यांच्या मृतदेहांचा खच पडल्याचे पाहायला मिळाले. भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने मेंढ्यांना चिरडल्याच्या या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

# प्रतापगडाच्या संवर्धनाचे 'युनेस्को'कडून कौतुक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**सातारा :** किल्ले प्रतापगडाला 'युनेस्को'च्या पथकाने भेट दिली. या पथकाने किल्ल्यावरील दरवाजा, मुख्य बुरुज, चोरवाटा, तलाव, मंदिर तटबंदी व अन्य संवर्धनाच्या कामांची पाहणी केली. साडेतीनशे वर्षांनंतरही प्रतापगडाची योग्य ती जपणूक केल्याबद्दल, तसेच सण-उत्सवाची परंपरा अबाधित ठेवल्याबद्दल युनेस्कोच्या पथकाने सेवेकऱ्यांचे भरभरून कौतुकही केले.

महाराष्ट्रातील अकरा व तमिळनाडूतील जिंजी किल्ल्याचा समावेश जागतिक वारसास्थळ यादीत करावा, असा प्रस्ताव केंद्र सरकारने 'युनेस्को'ला पाठविला आहे. या यादीत किल्ले प्रतापगडाचा समावेश आहे. या किल्ल्याची पाहणी करण्यासाठी 'युनेस्को'चे पथक पुणे जिल्ह्याचा दौरा आटोपून साताऱ्यात आले. सकाळी हे पथक किल्ल्यावर दाखल झाले. या वेळी दिल्ली व महाराष्ट्र पुरातत्त्व विभागाचे अधिकारी उपस्थित होते. किल्ल्यावरील ऐतिहासिक वास्तूंची पथकाने बारकाईने पाहणी करताना माहितीही जाणून घेतली. त्यानंतर पथकातील अधिकाऱ्यांनी स्थानिक किल्लेदार, पालखीचे भोई, मंदिराचे सेवेकरी, तसेच तरुणांशी संवाद साधून त्यांना काही प्रश्नही विचारले. या प्रश्नांना सर्वांनी समर्पक उत्तरे दिली. येथील तरुणांना कसण्यासाठी शेती नाही. त्यांची रोजी-रोटी पर्यटनावर अवलंबून आहे.

या किल्ल्याचा जागतिक वारसास्थळात समावेश झाल्यास छत्रपती शिवरायांच्या गड-इतिहासाची जगाला नव्याने ओळख होईल. किल्ल्यावर पर्यटन वाढेल, रोजगाराच्या संधी वाढतील. त्यामुळे किल्ल्याचा वारसास्थळ यादीत समावेश करावा, अशी मागणी 'युनेस्को'कडे केली.

## स्वाभिमानी'ची २५ ऑक्टो.ला ऊस परिषद

**सांगली :** स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने चालू वर्षाच्या गळीत हंगामातील २३ वी ऊस परिषद २५ ऑक्टोबर रोजी जयसिंगपूर येथील विक्रमसिंह क्रीडांगणावर आयोजित केली आहे. त्याबरोबरच गत हंगामात तुटलेल्या उसाला दुसरा हप्ता म्हणून प्रतिटन दोनशे रूपये द्यावे आणि मगच कारखान्याची धुराडी पेटवा, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी उदगाव (ता. शिरोळ) येथे झालेल्या कार्यकर्ता मेळाव्यात केली. देशातील व राज्यातील साखर उद्योग स्थिरावला आहे. साखरेसह उपपदार्थाला चांगले दर मिळाले आहेत. मात्र, राज्यातील साखर कारखानदार दुसरा हप्ता देण्यास टाळाटाळ करत आहेत. या कार्यकर्ता मेळाव्यास सावकर मादनाईक, राजेंद्र गड्ड्यान्नावर, वैभव कांबळे, जनार्दन पाटील, विठ्ठल मोरे, आदी उपस्थित होते.

# वाटलेल्या साड्यांची महिलांनी केली होळी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**औरंगाबाद:** आगामी विधानसभेच्या अनुषंगाने मतदारांना आकर्षित करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहे. शिंदे गटाचे नेते आणि मंत्री अब्दुल सत्तार यांनी त्यांच्या मतदारसंघातील महिलांना साडी वाटप केले होते. मात्र या साडया महिलांनी जाळून टाकल्या आहेत. सध्या सोशल मीडियावर याचा एक व्हिडिओ व्हायरल होत आहे. महिला सिल्लोड तालुक्यातील वांगी बुद्रुक गावातील हा व्हायरल व्हिडिओ असल्याचे सांगितले जात आहे. यात काही महिला या रस्त्यावर साड्यांची होळी करताना दिसत आहेत. या साड्यांचे वाटप मंत्री अब्दुल सत्तार यांनी केले होते. मात्र मराठा समाजातील महिला आणि गावकऱ्यांनी मिळून या साड्यांची होळी केली.

दोन दिवसांपूर्वी अब्दुल सत्तार यांनी सिल्लोड तालुक्यातील पालोद, अन्वी, सारोळा, आसडी, रहिमाबाद या गावांमध्ये नवरात्र , दसरा, दिवाळीनिमित्त बहिणींची कृतज्ञता म्हणून लाडक्या बहिणींना साड्या भेट दिल्या होत्या. मात्र या साड्या वाटपावरून वाद निर्माण झाला होता. यामुळे महिलांनी साड्यांची होळी केली आहे.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा दिल्ली दौरा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई:** राज्यात विधानसभा निवडणुकीच्या तारखा अद्याप घोषित झालेल्या नाहीत. दरम्यान, राजकीय पक्षांकडून हालचालींना वेग आला आहे. यातच आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे दिल्ली दौऱ्यावर आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेसुद्धा हजर राहण्याची शक्यता आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहांसोबत त्यांची बैठक होणार आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, केंद्र सरकारकडून नक्षलग्रस्त भागात नक्षलवाद्यांविरोधात मोहिम उघडण्यात आलीय. या मोहिमेत दोनच दिवसांपूर्वी सुरक्षा दलाला मोठं यश मिळालं. ३० पेक्षा जास्त नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला. या पार्श्वभूमीवर नक्षलग्रस्त राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक दिल्लीत बोलावण्यात आली आहे.

# शिवसेना ठाकरे गटाचे जयसिंग घोसाळे शिंदे गटात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**रत्नागिरी:** रत्नागिरीतील कट्टर शिवसैनिक तसेच रत्नागिरीचे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष जयसिंग उर्फ आबा घोसाळे यांनी शनिवारी पालकमंत्री उदय सामंत याच्या उपस्थितीत शिवसेना (ठाकरे) गटाला धक्का देत शिवसेना (शिंदे) गटात प्रवेश केला. त्यांच्या या प्रवेशाने ठाकरेंच्या शिवसेनेला मोठा धक्का असल्याचे बोलले जात आहे.

आबा घोसाळे यांच्या या प्रवेशाबाबत बोलताना पालकमंत्री उदय सामंत म्हणाले की, आबा घोसाळे हे कट्टर शिवसैनिक आहेत. शिवसेनेची नाचणे ही पहिली ग्रामपंचायत त्यांनी निवडून आणली. त्यांनी रत्नागिरी जिल्हा परिषद अध्यक्ष म्हणून काम पाहिले आहे. त्यांच्या या प्रवेशाने शिवसेना शिंदे गटाला फायदाच होणार आहे, असे पालकमंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

पक्ष पक्षप्रवेशाच्या वेळी जयसिंग (आबा) घोसाळे म्हणाले की, आता आम्ही पालकमंत्री उदय सामंत यांच्या खांद्याला खांदा लावून काम करणार आहोत. रत्नागिरी तालुक्यात त्यांना प्रचंड मताने निवडून आणणार असल्याचे यांनी जाहीर केले आहे.

जयसिंग (आबा) घोसाळे यांच्या समवेत त्यांचे भाऊ अनिल घोसाळे, अमोल घोसाळे, विक्रांत घोसाळे, अमित घोसाळे, अक्षय भाटकर, अतुल घोसाळे, गजेंद्र नाईक, उदय नागवेकर, विश्वजित चौगुले, सचिन वायंगणकर, महेश डोंगरे, बाळकृष्ण घोसाळे, संदेश भाटकर, आकाश भाटकर, मंथन भाटकर, आरोही घोसाळे, मंदार घोसाळे, यांनी देखील शिवसेना पक्षात प्रवेश केला. या पक्ष प्रवेशाच्या कार्यक्रमावेळी तालुका प्रमुख बाबू म्हाप, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश रसाळ, रत्नागिरी नगर परिषदेचे माजी नगरसेवक बंटी किर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## साई भक्ति... नवरात्रौत्सव...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**शिर्डी :** एका साईभक्ताने साईचरणी १ किलो ४३४ ग्रॅम वजनाची आकर्षक नक्षीकाम असलेली सोन्याची पंचारती अर्पण केली. या पंचारतीची किंमत जवळपास सुमारे १ कोटी रुपये आहे.



**पंढरपूर :** पंढरपूरचे विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये रुक्मिणी मातेला नवरात्रीच्या चौथ्या दिवशी पारंपारिक सरस्वती माता पोशाखामध्ये अलंकृत करण्यात आले होते

## "सरदार पटेल पुतळा उभा राहिला पण छत्रपतींचा नाही" संभाजीराजे संतप्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१६ मध्ये अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचे जलपूजन केले होते. परंतु अजूनही त्या स्मारकाचे काम सुरु झाले नाही. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज यांचे वशंज आणि स्वराज्य पक्षाचे नेते संभाजीराजे संतप्त झाले आहे. त्यांनी रविवारी अरबी समुद्रात जाऊन स्मारकाची पाहणी करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्रात आणि राज्यात तुमचे सरकार मग स्मारक का होत नाही? सरदार पटेल यांचा पुतळा उभा राहिला पण छत्रपतींचा अजून का उभा राहिला नाही? असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले आहे.

कोणत्याही प्रकल्पाचे पंतप्रधानांच्या हस्ते जलपूजन होते तेव्हा सर्व परवानग्या असणे गरजेचे होते. अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक उभारण्यासाठी करोडो रूपये खर्च केले गेले. मग कुठे आहे हे स्मारक? त्यामुळे आम्ही स्मारकाच्या शोधसाठी मोहीम आम्ही काढली आहे. राज्यातील १३ कोटी जनतेला सरकारने उत्तर द्यावे. आम्ही कायदा हातात घेणार नाही, असे छत्रपती संभाजीराजे यांनी म्हटले.

स्मारकाच्या ठिकाणी असलेले आमचे बोर्ड काढून टाकले आहेत. परंतु महायुतीचे बोर्ड तसेच आहेत. आम्ही समुद्रात स्मारकाच्या पाहणीसाठी जाणार आहोत. परंतु ज्या बोटने जाणार आहोत, त्या बोटवाल्यांना भाजपकडून धमक्या दिल्या जात आहेत. त्यांना परवाना रद्द करण्याची धमकी दिली गेली असल्याचेही संभाजीराजे म्हणाले.

## निवडणूक आयोगाच्या सूचनेनंतर राज्य सरकारचा मोठा निर्णय

# राज्यातील १११ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**मुंबई :** केंद्रीय निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीच्या पूर्व तयारीसाठी 3 दिवसांचा महाराष्ट्र दौरा केला होता. या दौऱ्याच्या शेवटी निवडणूक आयोगाने पत्रकार परिषदेतून 3 वर्षांपेक्षा जास्त सेवा झालेल्या अधिकाऱ्यांच्या ताबडतोब बदल्या करा, अशा सूचना राज्य सरकारला दिल्या होत्या. यानंतर राज्य सरकारने १११ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या केल्या आहेत.

आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर १११ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. यापैकी 11 पोलीस निरीक्षकांची मुंबईत बदली झाली आहे. मुंबईतील वरिष्ठ पोलीस निरीक्षक व पोलीस निरीक्षक यांच्या बदल्या मुंबईबाहेर करण्यात आल्या आहेत.

दरम्यान, लोकसभा निवडणुकीवेळी निवडणूक आयोगाने राज्य सरकारला अधिकाऱ्यांच्या बदल्यांच्या अनुषंगाने सूचना दिल्या होत्या. त्या सूचना राज्य सरकारने पाळल्या नव्हत्या. त्यामुळे काही दिवसांपूर्वी निवडणूक आयोगाने नाराजी व्यक्त केली होती.

केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त राजीव कुमार यांनी लोकसभा निवडणुकीवेळी महाराष्टासह इतर ४ राज्यांच्या मुख्य सचिवांना पत्र लिहिले होते. या पत्रात ३ वर्षांपेक्षा जास्त सेवा झालेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करा, अशा सूचना दिल्या होत्या. ३१ जुलैला दिलेल्या आदेशाचा अनुपालन अहवाल २० ऑगस्टपर्यंत सादर करण्याचे निवडणूक आयोगाचे निर्देश होते. तरी देखील बदल्या करण्यात आल्या नव्हत्या. मुंबईतील १३० पोलीस अधिकाऱ्यांची मध्यावधीत बदली करण्यास गृह खात्याने असमर्थता दर्शवली होती. मध्यावधी बदलीचा पोलीस अधिकाऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होण्याची होती गृह खात्याने वर्तवली होती.

● यापैकी सर्वाधिक अधिकाऱ्यांची ठाणे जिल्ह्यात बदली करण्यात आली आहे. त्यात प्रवीण दत्ताराम राणे, रवींद्र परमेश्वर अडाणे, बळवंत व्यकंट देशमुख, निलेश सिताराम बागुल, संजय सदाशिव मराठे, सुनील दत्ताराम जाधव, रुता शंशाक नेमलेकर, हर्षवर्धन यशवंतराव गुंड, हेमंत सहदेव गुरव, मनिषा अजीत शिर्के, इरफान इब्राहिम शेख, संध्याराणी शिवाजीराव भोसले, मथुरा नितीनकुमार पाटील, उषा अशोक बाबर, गणेश बाळासाहेब पवार, जगदीश पांडुरंग देशमुख, जयवंत श्याम शिंदे यांचा समावेश आहे. याशिवाय राजीव शिवाजीराव चव्हाण, राजेश रामचंद्र शिंदे, संतोष जगन्नाथ माने, अनधा अशोक सातवसे, संजय थानसिंग चव्हाण, तानाजी सहदेव खाडे यांची मुंबई लोहमार्ग पोलीस दलात बदली करण्यात आली आहे.

#रा

## इस्रायलने दिले स्पष्ट संकेत

# हिजबुल्लाहचा खात्मा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**तेल अवीव :** हिजबुल्लाहचा खात्मा केल्याशिवाय इस्रायली सैन्य थांबणार नाही, असे संकेत इस्रायलने दिले. लेबनॉनमधील लष्करी कारवाईत हिजबुल्लाहच्या तळांना लक्ष्य केले जात आहे. याशिवाय बोगद्यांमध्येही मोहीम राबविली जात आहे. इस्रायलच्या लष्कराने म्हटले आहे की, ग्राउंड ऑपरेशन सुरू झाल्यापासून आतापर्यंत त्यांनी हिजबुल्लाहच्या ४४० दहशतवाद्यांचा खात्मा केला आहे.

इस्रायलचे लेफ्टनंट जनरल हर्जी हलेवी यांनी एका निवेदनात म्हटले आहे की, हिजबुल्लाहवरील दबाव कायम राहील. शत्रूचे अधिक नुकसान करण्यासाठी हा दबाव आणखी वाढविण्यात येणार आहे. आम्ही त्यांना कोणताही दिलासा देणार नाही.

इस्रायली लष्कराने हिजबुल्लाहच्या कमांड सेंटरला लक्ष्य केल्याचे म्हटले आहे. कमांड सेंटर दक्षिण लेबनॉनमधील बिंट जेबिल येथे होते. लष्कराच्या म्हणण्यानुसार, या कमांड सेंटरमध्ये दहशतवादी आयडीएफ आणि इस्रायल राज्यांवर दहशतवादी हल्ले करण्याची योजना आखत असत. गुप्तचर माहितीच्या आधारे करण्यात आलेला ड्रोन हल्ला अचूक असल्याचे आयडीएफने म्हटले आहे.

त्याचवेळी उत्तर अरब गावात हिजबुल्लाहच्या रॉकेट हल्ल्यात तीन जण जखमी झाले. त्यांना नहरिया येथील गॅलिली मेडिकल सेंटरमध्ये नेण्यात आले. याशिवाय इतरही अनेक ठिकाणांहून रॉकेट हल्ले होत असल्याची माहिती समोर आली आहे. कार्मिल आणि दीर अल-असूल येथील रॉकेट्समुळे अपार्टमेंट आणि इमारतींचेही नुकसान झाले आहे. हेफा खाडी परिसरात लेबनॉनमधून रॉकेट डागण्यात आले.

इस्रायलने शनिवारी बैरूतच्या दक्षिण उपनगरांवर १२ हवाई हल्ले करत लेबनॉनवरील हल्ले वाढवले. उत्तर लेबनॉनमधील पॅलेस्टिनी निर्वासितांच्या छावणीलाही पहिल्यांदाच लक्ष्य करण्यात आले. उत्तरेकडील त्रिपोली शहराजवळील बेदावी शरणार्थी छावणीवर झालेल्या हल्ल्यात हमासच्या लष्करी सेलचा एक अधिकारी, त्याची पत्नी आणि दोन मुली ठार झाले.

गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये इस्रायल-हमास युद्ध सुरू झाल्यापासून इस्रायलने लेबनॉनमध्ये हमासच्या अनेक अधिकाऱ्यांची हत्या केली आहे. त्याशिवाय हिजबुल्लाहच्या म्होरक्यालाही त्यांनी टिपले आहे.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## मशिदीत घुसून इमामची हत्या

सुरक्षा

**उत्तर प्रदेशातील** मेरठमध्ये मशिदीत घुसून एका तरुणाने इमामची गोळ्या झाडून हत्या केली. यानंतर त्याने पिस्तूल तिथेच फेकून पळ काढला. गोळी झाडण्यात आलेला तरुण हा मतिमंद असल्याचे सांगण्यात येत आहे. गंभीर अवस्थेतील इमामला रुग्णालयात



दाखल करण्यात आले. सकाळी साडेसहाच्या सुमारास घडलेल्या या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. घटनास्थळी उपस्थित लोकांच्या चौकशीत शनिवारी रात्री हा मतिमंद तरुण इमामकडे त्याच्या स्मरणशक्तीच्या उपचारासाठी आला होता. इमामांनी डॉक्टरांकडे जाण्याचा सल्ला दिला आणि उपचार नाकारले. यामुळे आरोपी तरुणाला राग आला आणि त्याने हा प्रकार घडवून आणला. मिळालेल्या माहितीनुसार, मुरलीपुरा येथील रहिवासी मौलाना नईम हे लिसारी गेटयेथील शहजाद कॉलनीतील कासमी मशिदीत इमाम आहेत. शनिवारी रात्री इमाम येथे राहणारा मतिमंद तरुण सरताज स्वत:वर उपचार करण्यासाठी आला होता. सरताज म्हणाला की, त्याची स्मरणशक्ती कमकुवत असून, त्याला काहीच आठवत नाही. इमामांनी उपचार नाकारून डॉक्टरकडे जाण्याचा सल्ला दिला. आरोपी सरताजयाने याबाबत मौलानांना धमकावले होते. मौलाना नईम रविवारी सकाळी नमाजनंतर मशिदीत होते. दरम्यान, आरोपी सरताज पिस्तूल घेऊन आला आणि त्याने मौलानाच्या डोक्यावर गोळ्या झाडल्या. गंभीर अवस्थेत त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेनंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाला.

» Selected

## शोपियानात २० वर्षांनंतर पूजा

**श्रीनगर :** उत्तर काश्मिरमधील शोपियान जिल्ह्यातील प्राचीन अर्धनारीश्वर मंदिरात काश्मिरी पंडितांनी २० वर्षांनंतर शनिवारी पूजा आणि मूर्तीची प्रतिष्ठापना केली. केंद्रशासित प्रदेशातील दुर्गम भागातील भाविक येथील प्राचीन मंदिराच्या ठिकाणी मोठ्या संख्येने जमले होते. तब्बल २० वर्षांनंतर शांततामय वातावरणात हा पूजा सोहळा पार पडला. यात सहभागी होण्यासाठी घटनास्थळी पोहोचलेल्या काश्मिरी पंडितांचे स्थानिक मुस्लिमांनी स्वागत केले, हे विशेष. शोपियानचे उपायुक्त मोहम्मद शाहीद सलीम डार यांनी अर्धनारीश्वर मंदिराला भेट दिली आणि सांगितले की, शांतता आणि समृद्धीचे युग परत आले आहे. या कार्यक्रमाला जिल्हा व उपविभागीय अधिकाऱ्यांसह स्थानिक नागरिक उपस्थित होते. भाविकांना अत्यावश्यक सेवा पुरविणाऱ्या इतर विभागांसह चोख सुरक्षा व्यवस्था करण्यात आली होती.

## खोऱ्यात भाजप किंगमेकर

**नवी दिल्ली :** हरियाणा आणि जम्मू- काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या मतदानोत्तर कल चाचण्या शनिवारी सायंकाळी जाहीर झाल्या. त्यामध्ये हरयाणामध्ये काँग्रेसला कौल दिसत असून, जम्मू- काश्मीरमध्ये सर्वांत मोठा पक्ष बनून भाजप 'किंगमेकर' होईल असा कल समोर आला आहे. हरियाणा विधानसभेच्या एकूण ९० जागांसाठी शनिवारी मतदान झाले. या निवडणुकीमध्ये सत्ताधारी भाजप हॅट्ट्रीक करण्याच्या उद्देशाने उतरला आहे, तर काँग्रेसने सत्ता बदलाचा दावा केला. मतदानोत्तर कल चाचण्यांमध्ये काँग्रेसला कौल मिळत असल्याचे दिसून येत आहे. त्याचप्रमाणे कलम ३७० संपुष्टात आल्यानंतरची जम्मू-काश्मिरची ही पहिलीच विधानसभा निवडणूक होती. यामध्ये भाजप हा सर्वांत मोठा पक्ष ठरत असल्याचा कौल दिसून आला आहे. तसेच कोणालाही स्पष्ट बहुमत नसून, भाजपच्या मदतीशिवाय तेथे सरकार स्थापन होणार नाही.

## गोळीबारात आपचा नेता जखमी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पंजाबमधील फाजिल्का जिल्ह्यात शिरोमणी अकाली दलाच्या नेत्याने केलेल्या गोळीबारात आम आदमी पक्षाचा एक नेता जखमी झाला. मनदीपसिंग बरार याला गोळी लागल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

ही घटना गटविकास आणि पंचायत अधिकारी कार्यालयाबाहेर घडली, जिथे ब्रार यांनी अकाली नेत्यांना एका शाळेशी संबंधित फाइल मंजूर करण्याची विनंती केल्यानंतर धक्काबुक्की केली, जी बीडीपीओने नाकारली. या भांडणादरम्यान बरार यांना गोळी लागल्याचे सांगण्यात येत आहे. जलालाबादचे आपचे आमदार जगदीप कंबोज गोल्डी यांनी माजी खासदार झोरा सिंग मान यांचा मुलगा वरदेव सिंह मान यांच्यावर गोळी झाडल्याचा आरोप केला.

### हरियाणात काँग्रेसचे इच्छुक वाढले

# मुख्यमंत्रीपदाची उत्सुकता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** हरियाणा विधानसभा निवडणूकीच्या मतमोजणीपूर्वी मुख्यमंत्र्यांच्या नावाची चर्चा जोर धरू लागली आहे. सर्व एक्झिट पोलमध्ये हरियाणात काँग्रेसच सरकार स्थापन करेल, असा अंदाज वर्तवला आहे. दरम्यान, काँग्रेसमध्ये मुख्यमंत्रीपदासाठी गटबाजी सुरू झाली असून, काँग्रेसमध्ये अनेक नावांची चर्चा सुरू आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री भूपिंदरसिंह हुड्डा यांनी आमचा पक्ष पूर्ण बहुमताने सरकार स्थापन करेल, असा विश्वास व्यक्त केला असून, पुढचा मुख्यमंत्री कोण असेल, याचा निर्णय पक्षनेतृत्व घेईल, असेही ते म्हणाले.



एक्झिट पोलनुसार काँग्रेसला ९० पैकी ५० ते ५८ जागा मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हरियाणात बहुमतासाठी केवळ ४६ जागांची गरज आहे. त्याचवेळी भाजप येथे विजयाची हॅटट्रिक करण्यापासून दूर जाताना दिसत आहे. भाजपला २० ते २८ जागांवर समाधान मानावे लागू शकते. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपने ४० जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष होण्याचा मान मिळवला होता.

हरियाणात मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत कुमारी शैलजा यांचेही नाव पुढे येत आहे. मुख्यमंत्रिपदावर प्रत्येकाचा हक्क असून, ही लोकशाही आहे. हायकमांड जो निर्णय घेईल तो आम्ही मान्य करू, असेही भूपिंदरसिंह हुड्डा यांनी सांगितले.

पाच वेळा खासदार राहिलेल्या कुमारी शैलजा यांनी मुख्यमंत्रीपदासाठी त्यांच्या नावाचा विचार केला जाण्याची शक्यता असल्याचे संकेत दिले आहेत. मुख्यमंत्रीपदासाठी ज्या नावांची चर्चा होईल, त्यात मीही एक असेन, असे मला वाटते. कोणताही निर्णय घेण्यापूर्वी हायकमांड ज्येष्ठता आणि पक्षातील योगदान विचारात घेईल, असे शैलजा यांनी सांगितले.

हरयाणातील सर्व ९० विधानसभा मतदारसंघांसाठी शनिवारी मतदान झाले. भाजपने १० वर्षांची सत्ता पुन्हा मिळवण्याचे ध्येय ठेवले आहे.

# कोलकाता प्रकरणी बेमुदत उपोषण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोलकाता :** कोलकात्यातील आरजी कार रुग्णालयात निवासी डॉक्टरवर बलात्कार करून तिची हत्या केल्याच्या निषेधार्थ निदर्शने सुरूच आहेत. या प्रकरणी कनिष्ठ डॉक्टरांनी शनिवारी सायंकाळी बेमुदत उपोषण सुरू केले. पश्चिम बंगाल सरकारने त्यांच्या मागण्या पूर्ण केल्या नसल्याचा आरोप त्यांनी केला. कोलकात्याच्या मध्यवर्ती भागातील धर्मतला भागातील डोरिना क्रॉसिंगवर



शुक्रवारी डॉक्टर उपोषणाला बसले आहेत.

बंगाल सरकारने मुदतीत आमच्या मागण्या मान्य केल्या नाहीत, त्यामुळे मागण्या मान्य होईपर्यंत आम्ही बेमुदत उपोषण करणार आहोत, असे कनिष्ठ डॉक्टरांनी सांगितले. पारदर्शकता राखण्यासाठी आमचे सहकारी ज्या व्यासपीठावर उपोषण करणार आहेत, त्या व्यासपीठावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत. आम्ही आश्वासनाप्रमाणे ड्युटीवर जाऊ पण आम्ही काहीही खाणार नाही. सध्या ६ डॉक्टर उपोषण करत आहेत. यामध्ये कोलकाता मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलच्या स्निग्धा हाजरा, तान्या पंजा आणि अनुस्तुप मुखोपाध्याय, एसएसकेएमचे अर्णब मुखोपाध्याय, एनआरएस एन.आर.एस. मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलच्या पुलस्थ आचार्य आणि केपीसी मेडिकल कॉलेजच्या सायंतनी घोष हाजरा यांचा सहभाग आहे.

उपोषणादरम्यान एखादा डॉक्टर आजारी पडला तर त्याला राज्य सरकार जबाबदार असेल, असे कनिष्ठ डॉक्टरांनी सांगितले. आम्हाला जनतेचा पाठिंबा आहे आणि म्हणूनच प्रशासनाच्या कोणत्याही अडथळ्याला आम्ही घाबरत नाही, असे ते म्हणाले.

### काँग्रेसी नेत्यावर गंभीर आरोप

# पदाचा गैरवापर केला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** संसदेच्या लोकलेखा समितीचे (पीएसी) सदस्य निशिकांत दुबे यांनी समितीचे अध्यक्ष आणि काँग्रेसचे खासदार केसी वेणुगोपाल यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. वेणुगोपाल केंद्र सरकारला बदनाम करण्यासाठी आणि देशाची आर्थिक रचना आणि अर्थव्यवस्था अस्थिर करण्यासाठी निरर्थक मुद्दे उपस्थित करत आहेत, असा आरोप त्यांनी केला आहे.

दुबे यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना लिहिलेल्या पत्रात वेणुगोपाल यांच्यावर पदाचा गैरवापर केल्याचा आरोप केला आहे. तसेच देशाच्या अर्थव्यवस्थेला हानी पोहोचवण्यासाठी ते 'टूल किट'चा भाग म्हणून काम करत आहेत, असे नमूद केले आहे. समिती सेबीच्या अध्यक्षा माधवी पुरी बुच यांना समन्स बजावू शकते, ज्यांच्यावर अमेरिकेतील हिंडेनबर्ग रिसर्चने व्यावसायिक अनियमिततेचा आरोप केला आहे.

सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया आणि टेलिकॉम रेग्युलेटरी अथॉरिटी ऑफ इंडियाच्या प्रमुखांना २४ ऑक्टोबर रोजी समन्स बजावण्यात आले आहे. वेणुगोपाल यांच्या घटनाबाह्य वर्तनाविरोधात दुबे यांनी बिर्ला यांना पत्र लिहिले आहे. पीएसीने ४ ऑक्टोबर रोजी बुच यांना २४ ऑक्टोबर रोजी जबाब नोंदवण्यासाठी समन्स बजावण्याचा निर्णय घेतला. सत्ताधारी रालोआने वेणुगोपाल यांच्या हेतूला विरोध राहिल, असे स्पष्ट केले आहे.

## हमासला धक्का

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**बेका :** उत्तर लेबनॉनमधील निर्वासितांच्या छावणीवर इस्रायलने केलेल्या हल्ल्यात हमासचा कमांडर सईद अतल्ला अली आणि त्याचे कुटुंबीय ठार झाले. लेबनॉनच्या पूर्व बेका खोऱ्यात इस्रायलने ही कारवाई केली.

## ट्रम्प यांच्या प्रचारात एलन मस्क यांचा नाच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** अमेरिकेतील पेन्सिल्व्हेनियातील बटलर येथे भरलेल्या निवडणूक रॅलीत एलन मस्क यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्यासमवेत व्यासपीठ सामायिक केले. यावेळी त्यांनी ट्रम्प यांच्यासाठी जोरदार प्रचार केला. त्याचबरोबर त्यांनी नाचही केला. ट्रम्प यांना मतदान करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. ट्रम्प यांच्या हत्येच्या प्रयत्नात ज्या ठिकाणी गोळीबार करण्यात आला, त्याच ठिकाणी या सभेचे आयोजन करण्यात आले होते. ट्रम्प यांनी सर्वप्रथम उपस्थितांना संबोधित केले.

# गाझामधील मशिदीवर इस्रायलचा हल्ला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**दीर अल-बला :** मध्य गाझामध्ये रविवारी पहाटे इस्रायलने केलेल्या हवाई हल्ल्यात किमान २१ जण ठार झाले. दीर अल-बला शहरातील अल-अक्सा हुतात्मा रुग्णालयाजवळ विस्थापितांना आश्रय देणाऱ्या मशिदीवर हा हल्ला करण्यात आला. इस्रायलच्या लष्कराने एका निवेदनात



म्हटले आहे की, मशिदीतील कमांड अँड कंट्रोल सेंटरमध्ये कार्यरत असलेल्या हमासच्या दहशतवाद्यांवर त्यांनी अचूक हल्ला केला. ताज्या हल्ल्यांमुळे गाझामधील पॅलेस्टिनी मृतांचा आकडा ४२,००० च्या जवळ पोहोचला आहे.

इस्रायलने शनिवारी लेबनॉनवर बॉम्बहल्ला करून हिजबुल्लाह आणि हमास या दोन्ही दहशतवाद्यांना लक्ष्य केल्यानंतर रविवारी पहाटे हा हल्ला करण्यात आला. गाझामधील युद्ध सुरू झाल्याच्या वर्धापनदिनानिमित्त जगभरात रॅली काढण्यात आल्या. इस्रायलच्या लष्कराने बेरूतच्या दक्षिण किनाऱ्यावरील शिया बहुल उपनगरे असलेल्या दहियेमधील भाग रिकामा करण्याचे आवाहन केल्यानंतर शनिवारी मध्यरात्रीपासून सुरू झालेले हे जोरदार स्फोट रविवारपर्यंत सुरू होते.

# एक्झिट पोल अमान्यच...

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री आणि नॅशनल कॉन्फरन्सचे उपाध्यक्ष ओमर अब्दुल्ला यांनी एक्झिट पोलचे अंदाज फेटाळून लावले असून, काँग्रेस वगळता जवळपास सर्वच राजकीय नेत्यांनी हे कल नाकारले आहेत.

या एक्झिट पोलवर माझा विश्वास नाही, असे जम्मू-काश्मिरचे ज्येष्ठ नेते डॉ. फारुख अब्दुल्ला यांनी स्पष्ट केले.

तसेच प्रत्यक्ष निकालादिवशी जे चित्र समोर येईल, त्याचीच आपण प्रतिक्षा करत असल्याचे त्यांनी सांगितले. ८ तारखेला मतमोजणी होणार असून, निकाल जाहीर होणार आहेत.

विशेष म्हणजे एक्झिट पोलने जाहीर केलेल्या अंदाजावर विश्वास व्यक्त करणारा काँग्रेस हा एकमेव राजकीय पक्ष आहे.

### बिहारमध्ये पाच वर्षांपासून होते वास्तव्य

# बांगला घुसखोराला अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** बिहारमधील अररिया येथे गेल्या पाच वर्षांपासून लपून बसलेल्या एका बांगलादेशी नागरिकाला पोलिसांनी अटक केली आहे. भारतीय पासपोर्ट मिळवण्याच्या प्रयत्नात असलेल्या नवाब नावाच्या व्यक्तीला अटक करण्यात आली असून, पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

नगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील रामपूरकोडकट्टी पंचायतीमध्ये ही घटना घडली. नवाब रामपूरकोडकट्टी पंचायतीच्या प्रभाग क्रमांक ११ मध्ये राहत होता.



पासपोर्टसंदर्भातील प्रक्रियेसाठी नगर पोलिस ठाण्यात गेले असता या व्यक्तीच्या संशयास्पद हालचाली उघडकीस आल्या, अशी माहिती पंचायत अध्यक्षा पम्मी देवी यांनी दिली.

आवश्यक कागदपत्रांची मागणी केली असता नवाबच्या ओळखीबाबत शंका निर्माण झाल्याने अधिकाऱ्यांनी चौकशी सुरू केली. या भागात पाच वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या नवाबने वडिलांच्या नावाऐवजी पत्नीच्या नावाचे मतदार ओळखपत्र सादर केल्याचे उघडकीस आल्याने, त्याच्या खऱ्या ओळखीबाबत संशय निर्माण झाला आहे.

नवाबने सांगितले की, तो पाच वर्षांपूर्वी बांगलादेशातील चापई नवाबगंज येथून भारतात दाखल झाला होता. नंतर अररियायेथे स्थायिक झाला होता. धक्कादायक बाब म्हणजे पैसे भरल्यानंतर व्यक्तींच्या मदतीने नगर नदी ओलांडून भारतात आल्याची कबुली त्याने दिली.

### तामिळनाडूच्या मुख्यमंत्र्यांनी दिली माहिती

# चेन्नई मेट्रोला केंद्र सरकारचा निधी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चेन्नई :** चेन्नई मेट्रो रेल्वे प्रकल्प टप्पा-२ च्या अंदाजित खर्चाच्या सुमारे ६५ टक्के खर्च केंद्र सरकारने उचलण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने नुकतीच चेन्नई मेट्रो रेल्वे प्रकल्प टप्पा २ ला मान्यता दिली. ६३ हजार २४६ कोटी रुपयांच्या अंदाजित खर्चाच्या ६५ टक्के निधी केंद्र सरकार देणार आहे. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. आतापर्यंत हा प्रकल्प राज्य क्षेत्रातील प्रकल्प म्हणून राबविण्यात येत होता आणि प्रकल्प निधीची जबाबदारी प्रामुख्याने तामिळनाडू सरकारकडे होती, जी अंदाजित प्रकल्प खर्चाच्या सुमारे ९० टक्के होती.

मेट्रो रेल्वे धोरण २०१७ नुसार जमीन खर्च व इतर काही बाबी वगळून प्रकल्प खर्चाच्या १० टक्के निधी देण्याची केंद्र सरकारची भूमिका होती. द्विपक्षीय आणि बहुपक्षीय संस्थांकडून थेट ३२,५४८ कोटी रुपयांचे कर्ज उभे करण्यासाठी केंद्र सरकारने राज्य सरकारला मदत केली आहे. त्यापैकी आतापर्यंत सुमारे ६,१०० कोटी रुपये वापरण्यात आले आहेत. नुकत्याच झालेल्या मंजुरीमुळे केंद्र सरकार आता चेन्नई मेट्रो फेज २ च्या अंदाजित खर्चाच्या सुमारे ६५ टक्के निधी देणार आहे. या फायनान्सिंगमध्ये ७,४२५ कोटी रुपयांच्या इक्विटी आणि सबऑर्डिनेट डेटसह ३३,५९३ कोटी रुपयांच्या संपूर्ण आवश्यक कर्जाचा समावेश असेल. उर्वरित ३५ टक्के अंदाजित खर्चाचा निधी राज्य सरकार देणार आहे.

मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांनी चेन्नई मेट्रो रेल्वे प्रकल्प टप्पा - २ मंजूर केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले. केंद्र सरकार ज्या प्रकारे तामिळनाडूला निधी देत आहे, त्याचा राजकीय अर्थ काढला जात आहे. केंद्र आणि तामिळनाडू यांच्यातील दीर्घकाळापासून सुरू असलेला गतिरोध संपुष्टात आणण्याचा प्रयत्न म्हणून मोदी सरकारच्या या निर्णयाकडे पाहिले जाते. तसेच त्यामागे एक राजकीय संदेश असू शकतो, असे मानले जाते. या निर्णयामुळे द्रमुक सरकारसोबत तणाव कमी झाला आहे, असे भाजपच्या नेत्यांचे मत आहे. संघाच्या एका नेत्याने केंद्राचे हे पाऊल धोरणात्मक असल्याचे म्हटले आहे. विरोधी पक्षशासित राज्यांमध्येही भाजपला सहकार्य असल्याचे दाखवणे हा यामागचा उद्देश आहे. यामुळे द्रमुकशी चांगले संबंध निर्माण होण्यास मदत होईल. शिवाय रालोआच्या मित्रपक्षांना संदेश असा असेल की, इंडिया आघाडीतही आमचे मित्र आहेत. आम्ही सर्वांच्या मागण्यांकडे लक्ष देतो. त्यामुळे केंद्राची स्थिती मजबूत होईल, याकडे या नेत्याने लक्ष वेधले.

#रा



"मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे मराठी मनाला अभिमान वाटतो. हा सन्मान आपल्या संस्कृतीच्या योगदानाला दिलेली ओळख आहे. बरोबरच असमिया, बंगाली, पाली, आणि प्राकृत या भाषांनाही हा सन्मान मिळाल्याबद्दल अभिनंदन! — सचिन तेंडुलकर

"आम्ही दोन दिवस सराव करताना विकेट्स आम्हाला संथ वाटत नाहीत. ट्वेंटी-२० सामन्यासाठी विकेट्स चांगल्या आहेत आणि येथे चांगला खेळ होईल." — सुर्यकुमार यादव



## टीम इंडियाने गुणतालिकेत उघडलं खातं : अरुंधती रेड्डीचे ३ बळी

# भारताने पाकिस्तानला हरविले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारतीय महिला संघाने महिला ट्वेंटी-२० वर्ल्ड कप स्पर्धेत दुसऱ्या सामन्यात पाकिस्तानला पराभूत केले. १०६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना टीम इंडियाला कमी षटकांत विजय मिळवणे गरजेचा होता. उपांत्य फेरीच्या शर्यतीत कायम राहण्यासाठी भारतीय महिला संघाला Net Run Rate मध्ये सुधारणा आवश्यक आहे. ती संधी हरमनप्रीत कौर अँड टीमने गमावली. पाकिस्तानला पराभूत केलं असलं तरी पुढचं गणित जुळता जुळेना... अशी अवस्था टीम इंडियाची झाली आहे.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय पाकिस्तानला अडचणीत आणणारा ठरला. संथ खेळपट्टीवर भारतीय गोलंदाजांनी अचूक मारा करून पाकिस्तानी फलंदाजांना भांबवून सोडले. रेणुका सिंगने पहिल्याच षटकात धक्का दिल्यानंतर अन्य गोलंदाजांनी टप्प्याटप्प्याने विकेट्सचे सत्र सुरू ठेवले. अरुंधती रेड्डीने ३ व श्रेयांका पाटीटने २, तर रेणुका सिंग, दीप्ती शर्मा व आशा सोभना यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.

विकेट पडत राहिल्यानं पाकिस्तानच्या फलंदाजांवर दडपण वाढत होते आणि त्यांना चौकारही मिळणे अवघड झाले होते. कर्णधार हरमनप्रीत कौरने गोलंदाजीत वारंवार बदल करून पाकिस्तानी खेळाडूंना सेट होऊ दिले नाही. अनुभवी खेळाडू निदा दारने सर्वाधिक २८ धावा केल्या. मुनीबा अली ( १७), सायेदा शाह ( १४) व कर्णधार फातिमा सना ( १३ ) यांनी योगदान दिले. पण, भारतीय गोलंदाजांनी पाकिस्तानला २० षटकांत ८ बाद १०५ धावांवर रोखले.

स्मृती मानधना ( ७) ला दुसऱ्या सामन्यातही लय सापडली नाही. सादिया इक्बालने पाचव्या षटकात ही विकेट मिळवली. पण, शफाली वर्मा व जेमिमा रॉड्रीग्ज यांनी चांगली फटकेबाजी केली. भारताला उपांत्य फेरीच्या शर्यतीत राहण्यासाठी हा सामना मोठ्या फरकाने जिंकण्याची गरज आहे, हे लक्षात ठेवूनच दोघी खेळत होत्या. पण, १२ व्या षटकात शफाली माघारी परतली. शफालीने ३ चौकारांच्या मदतीने ३२ धावा केल्या. जेमिमा व हरमनप्रीत कौर विजय मिळवून देतील असे वाटले होते. पण, फातिमा सनाने बाजी उलटवली.. जेमिमा ( २३) व रिचा घोष ( ०) यांना माघारी पाठवून सामना चुरशीचा बनवला.

हरमनप्रीत कौर ( २९) आणि दीप्ती शर्मा ( ७ ) यांनी भारताला विजयाच्या उंबरठ्यावर बसवले. २४ चेंडू २२ धावांवरून या दोघींनी सामना १२ चेंडूंत ४ धावा असा एकतर्फी केला आणि भारताने ६ विकेट्स ही मॅच जिंकली. हरमनप्रीत २९ धावांवर दुखापतीमुळे रिटायर्ड हर्ट होऊन माघारी परतली. विजयासाठी २ धावांची गरज असताना हरमनप्रीत माघारी गेली आणि सजीवन संजनाने चौकार मारून विजय पक्का केला. भारताने १८.५ षटकांत ४ बाद १०८ धावा केल्या.

## उस्मान खानने झळकावले वेगवान द्विशतक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पाकिस्तानचा फलंदाज उस्मान खान याने देशाच्या लिस्ट ए क्रिकेट इतिहासातील सर्वात वेगवान द्विशतकाचा विक्रम नावावर केला. त्याने एसएनजीपीएल विरुद्ध एहसाल असोसिएट्ससाठी प्रेसिडेंट चषक सामन्यात १३१ चेंडूंत द्विशतकाचा टप्पा ओलांडला.

हा विक्रम नोंदवल्यानंतर उस्मान खान पुढच्याच चेंडूवर रिटायर्ट हर्ट झाला. सर्वात वेगवान २०० धावा करण्याचा यापूर्वीचा विक्रम शरजील खानच्या नावावर होता, ज्याने हा टप्पा गाठण्यासाठी १३३ चेंडू खेळले होते. उस्मानने आतापर्यंत खेळलेल्या १० लिस्ट ए मॅचेसमध्ये ८१.५ च्या सरासरीने ६५२ धावा केल्या आहेत.

फखर जमान, आबिद अली, मोहम्मद अली, शर्जील खान, कामरान अकमल आणि खालिद लतीफ यांच्यानंतर पाकिस्तानकडून लिस्ट ए क्रिकेटमध्ये दिव्शतक झळकावणारा उस्मान आता सातवा पाकिस्तानी क्रिकेटपटू आहे.

## नवरात्र उत्सव उपवास रेसिपी

### उपवासाची ब्राऊनी

**साहित्य :** 3/4 कप भगर पीठ
1/4 कप साबुदाणा पीठ
1/2cup Condensed मिल्क
100gm चॉकलेट
1/4cup तूप किंवा लोणी
1tsp बेकिंग पावडर
किंचित बेकिंग सोडा
smashed केळी.

**कृति :** प्रथम एका बाऊल मध्ये साबुदाणा पीठ व भगर पीठ घेऊन त्यात condensed मिल्क ani melted चॉकलेट घालून मिक्स करून घ्या. नंतर त्यात तूप किंवा लोणी घाला व पुन्हा चांगले मिक्स करा. मिश्रण ek जीव झाल्यावर त्यात mashed केळी add kara. ईथे लागल्यास थोडे दुध अॅड करू शकता .म्हणजे मिश्रण एका fine consistency मध्ये yeil. मग बेकिंग पावडर व बेकिंग सोडा घाला. Microwave oven 3min 180o preheat करा . मग त्यात Brownie बेटर एका greased pan मध्ये घालून पुन्हा 180o सेट करून 20 ते 30 min bake करून घ्या. आपली ब्राऊनी रेडी...
Serve करताना ड्राय फ्रूट ने सजवा .




-माधवी हुल्याळ

## सारथ्य फाऊंडेशन तर्फे ऑलिंपिक खेळाडूंच्या प्रशिक्षकांचा सत्कार

**पुणे :** 'सारथ्य फाऊंडेशन'च्या वतीने निवडक ऑलिम्पिकपटू, पॅरालिंपिकपटू, तसेच अर्जुन व छत्रपती पुरस्कार विजेत्या खेळाडूंच्या प्रशिक्षकांचा सत्कार करण्यात येणार आहे. निधी संकलनाच्या उपक्रमांचा एक भाग म्हणून 'सारथ्य फाऊंडेशन'च्या ज्येष्ठ गायिका उषा मंगेशकर यांच्या गाण्यांचा आणि मुलाखतीचा समावेश असलेला 'रंग उषेचे' हा कार्यक्रम येत्या १० ऑक्टोबर २०२४ रोजी रात्री ९-३० वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरूड येथे आयोजित करण्यात आला आहे. यावेळी याविषयी अधिक माहिती देताना सारथ्य फाऊंडेशनचे प्रसन्न कुलकर्णी यांनी सांगितले की, 'तसेच, या कार्यक्रमात भारतीय नेमबाजी संघाच्या प्रशिक्षक दीपाली देशपांडे, अंजली भागवत आणि पॅरालिंपिक सुवर्णविजेते मुरलीकांत पेटकर यांचा सत्कार केंद्रीय मंत्री मलीधर मोहोळ आणि राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. काही खेळाडूंचा सत्कार होणार आहे. जास्तीत जास्त खेळाडूंनी अशा प्रकारे यश मिळवावे आणि हे यशस्वप्न प्रत्यक्षात यावे, याकरिता आम्ही प्रयत्नशील आहोत. सारथ्य फाऊंडेशन' ही संस्था क्रीडाक्षेत्रातील गुणवान खेळाडूंना अधिक यशस्वी आणि सक्षम होण्यासाठी सर्वतोपरी साहाय्य करते.

## तब्बल दहा हजार धावपटूंचा सहभाग

# पुनित बालन ग्रुप आयोजित 'आपला पुणे मॅरेथॉन सीझन-4'

**पुणे :** पुनित बालन ग्रुपकडून आयोजित करण्यात येत असलेल्या 'आपल पुणे मॅरेथॉन सीझन-४' मॅरेथॉनसाठी तब्बल दहा हजार स्पर्धकांनी नोंदणी केली आहे. पुणेकरांनी दाखविलेल्या या उस्फूर्त प्रतिसादामुळे 'आपल पुणे मॅरेथॉन' ही शहरातील सर्वात प्रतिष्ठित धावण्याच्या स्पर्धांपैकी एक बनली आहे. पुणे पोलिस, पिंपरी चिंचवड पोलिस, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका, पीएमपीएमएल आणि नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो (एनसीबी) यांच्या संयुक्त विद्यमाने या मेरॉथन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. पुण्यातील तरुणांनी तंदुरस्त रहावे आणि सकारात्मक जीवनशैली जगण्यासाठी प्रेरित करणे हा यामागचा उद्देश आहे. से नो टू ड्रग्स, येस टू रन' हे मॅरेथॉनचे ब्रीदवाक्य आहे. खेळ आणि तंदुरुस्तीच्या माध्यमातून निरोगी जीवनशैलीला चालना देणे आणि अंमली पदार्थ मुक्त जीवनाविषयी जागरुकता वाढवणे हे त्याचे उद्दिष्ट आहे.

» २० ऑक्टोंबरला होणार स्पर्धा
» से नो टू ड्रग्स, येस टू रन' हे मॅरेथॉनचे ब्रीदवाक्य
» अंमली पदार्थ मुक्त जीवनाविषयी जागरुकता




### १८ लाख रुपयांची आकर्षक बक्षिसे

● अॅथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडियाने (AFI) मान्यता दिल्याने आपल पुणे मॅरेथॉनची विश्वासार्हता वाढली आहे. या मॅरेथॉनमध्ये १८ लाख रुपयांची आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. हे देशातील सर्वोत्तम धावपटूंना आकर्षित करेल आणि उच्चस्तरीय स्पर्धेसाठी वातावरण तयार करेल.

### मेरॉथॉन स्पर्धेचे नियोजन

● श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे, बालेवाडी येथे रविवार, २० ऑक्टोबर २०२४ रोजी पहाटे ४ ते सकाळी १० या वेळेत आपल पुणे मॅरेथॉन ही स्पर्धा होणार आहे. या मॅरेथॉनमध्ये ४२ किमी पूर्ण मॅरेथॉन, २१ किमी अर्ध मॅरेथॉन, १० किमी रन आणि ५ किमी जॉय रन अशा अनेक श्रेणी आहेत. यामुळे अनुभवी खेळाडूंपासून ते नवीन धावपटूंपर्यंत सर्वांना सहभागी होण्याची संधी मिळेल. सहभागीं स्पर्धकांना शनिवार, १९ ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे बिब वितरण आणि मॅरेथॉन एक्स्पोसाठी आमंत्रित करण्यात आले आहे.

'आपल पुणे मॅरेथॉन'ला प्रोत्साहन देणे म्हणजे केवळ धावण्याच्या स्पर्धेला प्रोत्साहन देणे नाही. हे एक निरोगी समाज निर्माण करण्याच्या दिशेने आणि पुण्यातील तरुणांना फिटनेसबद्दल उत्साही बनवण्याच्या दिशेने एक पाऊल आहे. पुणेकरांनी या स्पर्धेसाठी दाखविलेला प्रचंड प्रतिसाद आमचा उत्साह वाढविणारा आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून स्पर्धकानां सर्वोत्तम सुविधा देण्याचा आमचा प्रयत्न असेल.




-पुनीत बालन, अध्यक्ष, पुनीत बालन ग्रुप व मुख्य प्रायोजक.

## रोहीत, बलराज, पुरूषोत्तम, स्वरूप, कार्तिक यांचे विजय !

**पुणे :** पुणे जिल्हा बिलीयडर्स आणि स्नुकर संघटना (पीडीबीएसए) तर्फे आयोजित राज्य निवड चाचणी स्नुकर स्पर्धेत रोहीत लोणकर, बलराज सिंग, पुरूषोत्तम पांडे,





स्वरूप पोकळे आणि कार्तिक व्दिवेदी यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून संघर्षपूर्ण विजय नोंदविला. कॉर्नर्र पॉकेट (कँप), द क्यु कल्चर (वानवडी), क्यु क्लब (अ.नगर रस्ता) आणि रोड हाऊस क्लब (येरवडा) या चार क्लबमध्ये ही राज्य निवड चाचणी ६-रेड स्नुकर स्पर्धा आजपासून सुरू झाली. स्नुकर प्लॅनेट क्लबच्या रोहीत लोणकर याने नामांकित खेळाडू आणि क्यु क्लबच्या पिनाक अनाप याचा ४४-३०, ४०-०४, ४१-१४ असा सरळ फ्रेममध्ये पराभव करून स्पर्धेत अनपेक्षित निकाल नोंदविला. दुसऱ्या झालेल्या सामन्यामध्ये रोहीत लोणकर याने शुभम सिंग याच्यावर २७-१८, ४४-००, १५-३०, ०२-३६, २९-२१ असा संघर्षपूर्ण विजय मिळवून आगेकूच केली. रोड हाऊस स्नुकर क्लबच्या बलराज सिंग याने क्यु कल्चर क्लबच्या रोहीत रावत याचा ४४-१७, ३८-२४, १५-४०, ३२-४१, ४२-३५ असा संघर्षपूर्ण पराभव करून आणखी एक सनसनाटी निकाल नोंदविला. पुरूषोत्तम पांडे याने अमर राईकर याचा ३७-२२, ३८-१०, १८-२६, ६६-३७, ३६-२९ असा संघर्षपूर्ण पराभव केला.

## पूर्व विभागाला सलामीला बरोबरीवर समाधान

**पुणे :** ५३व्या अखिल भारतीय एफएसआय आंतर विभागीय फुटबॉल स्पर्धेच्या उद्घाटनीय लढतीत पूर्व विभाग आणि मुख्यालय यांच्यात १-१ अशी बरोबरी झाली. मात्र, उत्तर विभागाने पश्चिम विभागावर सहज विजय मिळवला. श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी येथे शुक्रवारपासून सुरू झालेल्या स्पर्धेत अजय बिश्तने (२७' - स्वयंगोल) पिछाडीवर पडलेल्या पूर्व विभागाला तारले आणि एक गुण मिळवून दिला. तथापि, यशराज थापाने (१३') मुख्यालयाला खेळाच्या सुरुवातीलाच आघाडीवर नेले होते. त्यानंतर, उत्तर विभागाने पश्चिम विभागावर ३-० असा सहज विजय मिळवला. पीयुष भंडारीने (२') पेनल्टी किकवर गोल करत उत्तर विभागाचे लवकर खाते उघडले. त्यानंतर मध्यंतरापर्यंत आघाडी कायम राखली. उत्तरार्धात कमल सिंग (५६') आणि हिमांशू रायने (६८') गोल करत आघाडी वाढवली. अखिल भारतीय एफएसआय आंतर विभागीय फुटबॉल स्पर्धेचे पुण्यात प्रथमच आयोजन करण्यात आले आहे. एकूण सहभागी सहा संघांची दोन गटात विभागणी करण्यात आली आहे. अ गटामध्ये पूर्व विभाग, दक्षिण विभाग आणि मुख्यालय तर ब गटामध्ये उत्तर विभाग, उत्तर-पूर्व आणि पश्चिम विभाग असे संघ आहेत. साखळी (लीग) वजा बाद पद्धतीने खेळल्या जाणाऱ्या स्पर्धेत दोन्ही गटांतील अव्वल दोन संघ उपांत्य फेरीत पोहोचतील. त्यातील विजेते अंतिम फेरीत एकमेकांशी भिडतील.

## 'ग्रेसिया करंडक' २०२४ खुली आंतर-क्लब टेव्न्टी-२० क्रिकेट स्पर्धा

# एमईएस क्लब, यशवी क्रिकेट अॅकॅडमी संघांची विजयी सलामी !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** ग्रेसिया क्रिकेट अॅकॅडमी तर्फे आयोजित 'ग्रेसिया करंडक' २०२४ खुली आंतर-क्लब टेव्न्टी-२० क्रिकेट स्पर्धेत एमईएस क्लब आणि यशवी क्रिकेट अॅकॅडमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेत विजयी सलामी दिली.

मुंढवा येथील लिजंड्स स्पोटर्स क्लब येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत रोहन वाघसरे याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर एमईएस क्लबने सेन्चुरी क्रिकेट अॅकॅडमीचा ५ गडी राखून सहज पराभव केला. सेन्चुरी क्रिकेट अॅकॅडमीला पहिल्यांदा फलंदाजी करताना ११३ धावा धावफलकावर लावता आल्या. एमईएस संघाच्या रोहन याने १८ धावात ४ गडी बाद करून सेन्चुरी संघाची धावसंख्येला वेसण घातले. हे लक्ष्य एमईएस क्लबने यशराज खाडे (२७ धावा), अजित गव्हाणे (१८ धावा) आणि रोहीत खरात (नाबाद १८ धावा) यांच्या फलंदाजीमुळे १८.२ षटकात पूर्ण केले.

या स्पर्धेच्या १९ वर्षाखालील गटात महेश्वर वाघ याच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर यशवी क्रिकेट अॅकॅडमीने लिजंड्स क्रिकेट अॅकॅडमीचा ४ गडी राखून पराभव केला. महेश्वर याने ३० धावा देताना ४ गडी टिपले.

**सामन्याचा संक्षिप्त निकालः गटसाखळी फेरीः खुला गटः**

सेन्चुरी क्रिकेट अॅकॅडमीः १८.३ षटकात १० गडी बाद ११३ धावा (अभिनव एस. ३१, हर्ष ओस्वाल १५, रोशन वाघसरे ४-१८, ऋषीकेश काटकडे २-११, सुजित उबाळे २-१८) पराभूत वि. एमईएस क्लबः १८.२ षटकात ५ गडी बाद ११५ धावा (यशराज खाडे २७, अजित गव्हाणे १८, रोहीत खरात नाबाद १८, गौरव खैरे २-१४); सामनावीरः रोहन वाघसरे;

**१९ वर्षाखालील गटः (२५ षटकांचा सामना)ः**

लिजंड्स क्रिकेट अॅकॅडमीः २३.४ षटकात १० गडी बाद १११ धावा (तन्मय वाघरे ३७, अयान शेख २२, महेश्वर वाघ ४-३०, आदित्य हिरे ३-२३) पराभूत वि. यशवी क्रिकेट अॅकॅडमीः २३ षटकात ६ गडी बाद ११२ धावा (ओम एस. नाबाद २९, यशवी पी. नाबाद १७, प्रणव झागडे २-११); सामनावीरः महेश्वर वाघ.

## अभिषेक शर्मा, संजू सॅमसन ओपनिंग करणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** बांगलादेशविरुद्ध ट्वेंटी-२० मालिकेसाठी कर्णधार सूर्यकुमार यादवने भारतीय संघाची सलामीजोडी जाहीर केली आहे. अभिषेक शर्मासोबत संजू सॅमसन ओपनिंग करेल असे कर्णधार सूर्यकुमार यादवने सांगितले. बांगलादेशविरुद्ध पहिल्या ट्वेंटी-२० सामन्याची रणनिती ठरली असून भारतीय संघ ग्वालियरमधील दोन दिवसांच्या सरावानंतर पहिल्या सामन्यासाठी सज्ज झाला आहे. कसोटी मालिकेनंतर टीम इंडिया ट्वेंटी-२० मालिकेत बांगलादेशला नमवण्यासाठी सज्ज झाली आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली युवा जोश असलेला भारतीय संघ उद्या बांगलादेशविरुद्ध मालिकेतील पहिला सामना खेळणार आहे. ग्वालियरच्या माधवराव सिंधिया क्रिकेट स्टेडियमवर ही मॅच होणार आहे.

ग्वालियरच्या नवीन ठिकाणी होणारा हा पहिला आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना आहे. दोन दिवसांच्या सरावानंतर सूर्यकुमार यादवला ट्वेंटी-२० सामन्यासाठी येथील खेळपट्टी योग्य वाटली. "आम्ही दोन दिवस सराव केरताना विकेट्स आम्हाला संथ वाटत नाहीत. ट्वेंटी-२० सामन्यासाठी विकेट्स चांगल्या आहेत आणि येथे चांगला खेळ होईल." सूर्यकुमार यादव म्हणाला.

## तिसरी 'स्पोटर्सफिल्ड मान्सुन लीग' अजिंक्यपद १४ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धा

# स्पेशलाईज्ड क्रिकेट क्लबची विजयी आगेकूच !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्पोटर्सफिल्ड मॅनेजमेंट तर्फे आयोजित तिसऱ्या 'स्पोटर्सफिल्ड मान्सुन लीग' अजिंक्यपद १४ वर्षाखालील ३०-३० षटकांच्या क्रिकेट स्पर्धेत स्पेशलाईज्ड क्रिकेट क्लबने स्पार्क क्रिकेट अॅकॅडमीचा ७ गडी राखून सहज पराभव करून विजयी आगेकूच केली.

सातारा रोड येथील टेंभेकर फार्मस् क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत पहिल्यांदा खेळताना स्पार्क क्रिकेट अॅकॅडमीने



३० षटकामध्ये १४० धावांचे लक्ष्य उभे केले. इशान गुप्ता (२० धावा) आणि आर्यन गुजर (२० धावा) यांनी संघासाठी धावा जमविल्या. स्पेशलाईज्ड क्रिकेट क्लबने २८.२ षटकात व ३ गडी गमावून हे लक्ष्य गाठले. शौर्य जाधव याने ७३ चेंडूत ८ चौकारांसह ६४ धावांची खेळी केली. तसेच आर्दश चोरघडे याने २९ धावा जमविल्या. स्पेशलाईज्ड संघाचा स्पर्धेतील हा तिसरा विजय ठरला. स्पेशलाईज्ड क्रिकेट क्लब आणि हेमंत किणीकर क्रिकेट अॅकॅडमी यांच्यामधील दुसरा सामना अपुऱ्या प्रकाशाने पूर्ण होऊ शकला नाही आणि दोन्ही संघांना प्रत्येकी एकेक गुण देण्यात आला.

**सामन्याचा संक्षिप्त निकालः गटसाखळी फेरीः**

● स्पार्क क्रिकेट अॅकॅडमीः ३० षटकात १० गडी बाद १४० धावा (इशान गुप्ता २०, आर्यन गुजर २०, अनुप जाधव २-१७, स्टिफन शिरोडकर २-३०) पराभूत वि. स्पेशलाईज्ड क्रिकेट क्लबः २८.२ षटकात ३ गडी बाद १४१ धावा (शौर्य जाधव ६४ (७३, ८ चौकार), आर्दश चोरघडे २९); सामनावीरः शौर्य जाधव;

● स्पेशलाईज्ड क्रिकेट क्लबः २६ षटकात १० गडी बाद १५६ धावा (अमर कामत ३८, आयुष कुंभारकर १८, इशान शेळके ४-२६, अरिन सातपुते २-३८) वि. हेमंत किणीकर क्रिकेट अॅकॅडमीः ३० षटकात १० गडी बाद १४० धावा (रीहान छाजेड ३१, ऋषभ जोशी १६, स्टिफन शिरोडकर १-११, शर्विल शेवाळे १-२१); सामनावीरः अमर कामत.

#रा